CMYK




सोलापूर
SOLAPUR TARUN BHARAT
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित
आसमंतसह

लातूर | रविवार, १ फेब्रुवारी २०२६ । वर्ष ३ रे अंक ३३२ । पाने १२+८ । किंमत रु. ६/- ■ RNI No. MAHMAR/2023/86477 ■ Postal Regd No. SLP/32/2024-2026.
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

# उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार

- लोकभवनात पार पडला शपथविधी; शरद पवार, सुप्रिया सुळेंची अनुपस्थिती
- राज्याला मिळाल्या पहिल्या महिला उपमुख्यमंत्री पण अर्थखाते त्यांच्याकडे नाही
- अजितदादा अमर रहेच्या घोषणा; पटेल, तटकरे, भुजबळांची रणनीती यशस्वी



**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि. ३१ जानेवारी-**

अजित पवार यांच्या अपघाती निधनामुळे रिक्त झालेल्या महायुतीतील राष्ट्रवादी काँग्रेसच्या कोट्यातील उपमुख्यमंत्री पदावर सुनेत्रा पवार यांनी शनिवारी शपथ घेतली. राज्याचे प्रभारी राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी त्यांना पदाची आणि गोपनीयतेची शपथ दिली. राज्यातील पहिल्याच महिला व पतीनंतर या पदावर विराजमान होण्याऱ्यालोकभवनात झालेल्या या साध्या समारंभ सोहळ्याला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रमुख नेते उपस्थित होते.

अतिशय भावपूर्ण वातावरणात झालेल्या या सोहळ्यावेळी उपस्थित आमदार, पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी 'अजित दादा अमर रहे', 'एकच वादा अजित दादा', 'वहिनी आप आगे बढो, हम तुम्हारे साथ है', 'महाराष्ट्राचा एकच दादा, अजित दादा' अशा घोषणा दिल्या. बुधवारी सकाळी बाराम तीत झालेल्या दुर्दैवी विमान अपघातात उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या मृत्यू झाला.गुरुवारी त्यांच्यावर अंत्यसंस्कार झाल्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेसच्या वरिष्ठ नेते खा. प्रफुल्ल पटेल, प्रदेशाध्यक्ष खा. सुनील तटकरे, मंत्री छगन भुजबळ यांनी तातडीने हालचाली करीत अजित दादाच्या राजकीय वारसदार या त्यांच्या पत्नी सुनेत्रा पवार असतील, या दृष्टीने प्रयत्न केले. शुक्रवारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन चर्चा केल्यानंतर आज राष्ट्रवादीच्या विधीमंडळ सदस्यांची विधानभवनात बैठक झाली. त्यामध्ये राष्ट्रवादीच्या गटनेतेपदी सुनेत्रा पवार यांची एकमताने नियुक्ती करण्यात आली. त्याबाबतचा प्रस्ताव ज्येष्ठ नेते व मंत्री छगन भुजबळ यांनी मांडला, तर दिलीप वळसे-पाटील यांनी त्यास अनुम ोदन दिले. त्यानंतर त्यांनी उपमुख्यमंत्री पदाची शपथ घेतली.

त्यानंतर त्यांनी देवगिरी बंगल्यावर जाऊन अजित पवार यांच्या प्रतिमेला अभिवादन केले. पुढील दहा दिवस त्या बारामतीत राहणार असल्याचे सांगण्यात आले. सुनेत्रा पवार यांना खासदारकीचा राजीनामा द्यावा लागला असून त्या जागेवर त्यांचे पुत्र पार्थ पवार यांना पाठवले जाईल, असेही सांगण्यात येत आहे.

### झारीतील शुक्राचार्य आणि शुक्राचार्यांचा वापर करणाऱ्यांचा करणार बंदोबस्त

अजित पवार यांच्या निधनानंतर चौथ्या दिवशी सुनेत्रा पवार यांनी उपमुख्यमंत्री पदाची शपथ घेतली. मात्र त्याबाबत जेष्ठ नेते शरद पवार यांनी सकाळी पत्रकार परिषद घेऊन या विषयाबाबत चर्चा केली नसल्याचे सांगत नाराजी दर्शविली होती. त्यामुळे ते खा. सुप्रिया सुळे, आ. रोहित पवार व त्यांच्या गटाचा कोणताही नेता शपथ विधी सोहळ्याला उपस्थित नव्हता. शरद पवारांच्या डोळ्यादेखत त्यांनी स्थापन केलेल्या राष्ट्रवादीची सर्व सूत्रे पवार कुटुंबाबाहेरचे लोक फिरवू लागल्याचा धक्का निश्चितच पवारांच्या जिव्हारी लागला असणार, त्यामुळे जखमी पवारांची पुढील रणिणिती काय असणार याकडे महाराष्ट्राचे लक्ष लागले आहे. सुनेत्रा पवारांच्या आडून पवारांच्या कुटुंबात राजकारण खेळणारे झारीतील शुक्राचार्य आणि त्यांचा वापर करणारे पडद्यामागील चाणक्य कोण, शुक्राचार्यांचा बंदोबस्त पवार कसा नक्की करतील अशीही चर्चा पवार निष्टावंतामध्ये सुरु होती.

### अजितदादांकडील अर्थ खाते सुनेत्रा पवारांकडे नाही

सुनेत्रा पवार यांनी उपमुख्यमंत्री पदाची शपथ घेतल्यानंतर काही वेळातच त्यांच्याकडे अजित पवार यांच्याकडे असलेल्या चार खात्यापैकी अर्थ खाते वगळून अन्य तीन खात्याचा कारभार सोपविण्यात आला आहे. राज्य उत्पादन शुल्क, अल्पसंख्यांक विकास आणि क्रीडा खाते देण्यात आले आहे. अर्थ खाते काम सद्या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस पहात आहेत.

### पवारांच्या राष्ट्रवादीची सूत्रे प्रथमच कुटुंबाबाहेर

दरम्यान, अजित पवारांच्या अपघाती मृत्यूला तीन दिवस होताच शपथ घेण्याच्या घाईवरून आरोप-प्रत्यारोपाचे राजकारण सुरु झाले आहे. तर राजकीय धुरंधर शरद पवारांच्या राष्ट्रवादीची सूत्रे अखेर अजित राष्ट्रवादीचे नेते प्रफ्फुल पटेल, सुनिल तटकरे, छगन भुजबळ, धनंजय मुंडे यांच्या हाती गेल्याची चर्चा रंगली होती. राष्ट्रवादीकडील महत्वाचे अर्थखाते सुनेत्रा पवार यांना न मिळाल्याने पटेल, तटकरेंनी पडद्यामागे काय राजकारण खेळले याचीही चर्चा होती.



## अजितदादांचा लोकाभिमुख वारसा पुढे नेत कर्तव्य भावनेने सज्ज : सुनेत्रा पवार

**मुंबई दि.३१ जानेवारी -**

आदरणीय अजितदादांनी आयुष्यभर शेतकरी, कष्टकरी, महिला, युवक आणि समाजातील वंचित घटकांसाठी जगण्याचा मंत्र दिला. त्यांच्या विचारांचा आणि कार्याचा वारसा पुढे नेताना'शिव-शाहू-फुले-आंबेडकर' यांच्या विचारांवर निष्ठा ठेवून कर्तव्यभावनेने ही जबाबदारी स्वीकारत असल्याची भावना उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी व्यक्त केल्या आहेत. शपथविधी झाल्यानंतर त्यांनी पत्रक काढून आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत.

त्यात म्हटले आहे की दादांच्या अकाली जाण्याने वैयक्तिक आयुष्यातच नव्हे, तर संपूर्ण म हाराष्ट्राच्या मनावर दुःखाचा मोठा डोंगर कोसळला आहे. मात्र त्यांनी दिलेली कर्तव्यनिष्ठा, संघर्षाची ताकद आणि जनतेप्रतीची प्रामाणिक बांधिलकी हाच माझा खरा आधार आहे. त्यांच्या स्वप्नातील न्यायप्रिय, समताधिष्ठित आणि विकसित महाराष्ट्र घडवण्यासाठी अखंड प्रामाणिकपणे, पारदर्शकतेने आणि लोकाभिमुखतेने काम करत राहीन असा विश्वास आहे. या कठीण काळात महाराष्ट्रातील जनतेने दिलेले प्रेम, विश्वास आणि पाठिंबा हेच माझे सर्वात मोठे बळ आहे. आपल्या विश्वासाच्या जोरावर, दादांच्या विचारांना उजाळा देत, नव्या आशेने आणि नव्या ऊर्जे ने पुढे चालत राहीन. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 'विकसित भारत २०४७' या संकल्पनेला बळ देण्यासाठी तसेच देशाचे गृह व सहकारमंत्री अमित शाह यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्राचा सर्वांगीण विकास साधण्यास राज्य शासन सदैव तत्पर राहणार असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

# निर्मला सीतारामन् आज नवव्यांदा सादर करणार अर्थसंकल्प

## पी. चिदम्बरम् यांच्या विक्रमाची बरोबरी

**तभा वृत्तसेवा,**
**नवी दिल्ली, ३१ जानेवारी -**

केंद्रीय अर्थत्री निर्मला सीतारामन् रविवारी मोदी सरकारच्या तिसऱ्या कार्यकाळातील दुसरा पूर्ण अर्थसंकल्प संसदेत सादर करणार आहे. सीतारामन् रविवारी सकाळी ११ वाजता लोकसभेत विक्रमी म्हणजे नवव्यांदा हा अर्थसंकल्प सादर करणार आहे. नऊ अर्थसंकल्प सादर करणाऱ्या सीतारामन सर्वाधिक अर्थसंकल्प सादर करणाऱ्या आतापर्यंच्या देशातील सर्व अर्थत्र्यांत दुसऱ्या स्थानावर आहे, तर महिला अर्थत्री म्हणून एकमेव आहेत. देशात सर्वाधिक वेळा अर्थसंकल्प सादर करण्याचा विक्रम मोरारजी देसाई यांच्या नावावर आहे. त्यांनी दहा वेळा संसदेत अर्थसंकल्प सादर केला. त्यांनी सादर केलेल्यांपैकी आठ अर्थसंकल्प पूर्ण, तर दोन अंतरिम होते. नंतर जनता पक्षाच्या सरकारमध्ये पंतप्रधान झालेल्या मोरारजी देसाई यांनी पंडित जवाहरलाल नेहरू, लालबहादूर शास्त्री तसेच इंदिरा गांधी अशा तीन पंतप्रधानांच्या सरकारम ध्ये अर्थत्री असताना अर्थसंकल्प सादर केले.



१९६९ मध्ये इंदिरा गांधींच्या सरकारमधून राजीनामा दिल्यामुळे अकराव्यांदा अर्थसंकल्प सादर करण्याची मोरारजी देसाई यांची संधी हुकली. त्यावर्षी पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी अर्थसंकल्प सादर केला होता. मोरारजी देसाई यांच्या खालोखाल पी. चिदम्बरम् यांनी नऊ वेळा अर्थत्री म्हणून संसदेत अर्थसंकल्प सादर केला. चिदम्बरम् यांनी दोन वेळा एच. डी. देवेगौडा यांच्या सरकारमध्ये तर, सात वेळा डॉ. मनमोहनसिंग यांच्या नेतृत्वातील सरकारमध्ये अर्थसंकल्प सादर केला. निर्मला सीतारामन् यावेळी नवव्यांदा अर्थसंकल्प सादर करत पी. चिदम्बरम् यांच्या नऊ वेळा अर्थसंकल्प सादर करण्याच्या विक्रमाची बरोबरी करणार आहे.

विशेष म्हणजे, सीतारामन् यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सरकारमधील अर्थत्री म्हणून आठ अर्थसंकल्प सादर केले. यावर्षीचा त्यांचा नववा अर्थसंकल्प आहे. पुढील वर्षी अर्थसंकल्प सादर करण्याची संधी मिळाली तर, सीतारामन् चिदम्बरम् यांचा नऊ वेळा अर्थसंकल्प सादर करण्याचा विक्रम मोडत मोरारजी दसाई यांच्या दहा वेळा अर्थसंकल्प सादर करण्याच्या विक्रमाची बरोबरी करू शकतात. अर्थत्री प्रणव मुखर्जी यांनी आठ वेळा अर्थसंकल्प सादर केला. मखर्जी यांनी इंदिरा गांधी आणि नंतर डॉ. मनमोहनसिंग यांच्या सरकारमध्ये अर्थसंकल्प सादर केला. सात वेळा अर्थसंकल्प सादर करण्याचा विक्रम यशवंत सिन्हा यांच्या नावावर आहे. यशवंत सिन्हा अटलबिहारी वाजपेयी सरकारमध्ये अर्थत्री होते. डॉ. सी. डी. देशमुख यांनीही सात वेळा अर्थसंकल्प सादर केला होता. डॉ. मनमोहनसिंग यांनी पी. व्ही. नरसिंहराव यांच्या सरकारचे अर्थत्री म्हणून सलग पाच वेळा अर्थसंकल्प सादर केला. मोरारजी देसाई यांच्याप्रमाणे डॉ. मनमोहनसिंगही नंतर पंतप्रधान झाले.


## स्वदेशी 'चिप' घेणार जवानांच्या हृदयाची काळजी

**नवी दिल्ली, ३१ जानेवारी -**

सीमेवर तैनात असलेल्या जवानांच्या हृदयाचे रक्षण करण्यासाठी, भारतीय शास्त्रज्ञांच्या एका पथकाने एक स्वदेशी चिप तयार केली. ती त्यांना हृदयविकाराच्या झटक्यापूर्वी सतर्क करते. दिल्लीतील मिरांडा हाऊस कॉलेज, डीआरडीओने संयुक्तपणे ही जैविक चिप विकसित केली.

देशाच्या सीमांचे रक्षण करण्यास लष्कराचे जवान नेहमीच तत्पर असतात. कडाक्याची थंडी असो किंवा कडक ऊन, घनदाट जंगल किंवा उंच पर्वत असो, आपले जवान प्रत्येक परिस्थितीत टिकून राहतात. त्यांचे कर्तव्य केवळ शारीरिकदृष्ट्या आव्हानात्मक नाही तर, मानसिकदृष्ट्या देखील आव्हानात्मक आहे. शून्याखालील तापमान आणि प्रतिकूल परिस्थिती जवानांच्या आरोग्यावर अनेक प्रकारे नकारात्मक परिणाम करते. भारतीय जवानांना उच्च ताण, तीव्र हवामान, कमी तापमान आणि कठीण कर्तव्यांळे हृदयविकाराचा धोका जास्त असतो, अशी चिंता अनेक अहवालांधून व्यक्त करण्यात आली आहे. सैन्यात हृदयविकाराच्या झटक्यांळे होणाऱ्या मृत्यूंबद्दल विशिष्ट माहिती सार्वजनिकरीत्या उपलब्ध नसली तरी, प्रत्येक एक लाख जवानांपैकी जवळपास १० जवानांना अचानक हृदयविकाराचा झटका येतो.

ट्रस्ट रजि. नं.: ए. ६८० दि. २४/०९/१९७०
**श्री सदगुरू प्रभाकर स्वामी महाराज मंदिर सार्वजनिक ट्रस्ट**
बुधवारी पेठ, सम्राट चौक, सोलापूर



श्री सदगुरू प्रभाकर स्वामी महाराज ६९ व्या पुण्यतिथी महोत्सव
माघ वद्य प्रतिपदा (गुरू प्रतिपदा)
सोमवार दिनांक २ फेब्रुवारी २०२६
रात्रौ १०:४५ मि. **गुलाल सोहळा**

मंगळवार दिनांक ३ फेब्रुवारी २०२६
रोजी दुपारी १२ ते ३ **लाडू प्रसाद वाटप**
हस्ते : मा. डॉ. अश्विनी पी. पाटील
पोलीस उप-आयुक्त (गुन्हे/वि.शा.) सोलापूर शहर

बुधवार दिनांक ४ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ११ ते रात्रौ ९ पर्यंत
**पालखी व रथ मिरवणूक**
हस्ते : मा. श्री. एम. राज कुमार (पोलीस आयुक्त, सोलापूर)

सदर कार्यक्रमास आपली उपस्थिती प्रार्थनिय आहे.

श्री. मोहन रा. बोड्डू – चिफ ट्रस्टी | श्री. बाळकृष्ण लि. शिंगाडे – मॅनेजिंग ट्रस्टी | श्री. उदय अ. वैद्य – ट्रस्टी
श्री. वसंत शे. बंडगर – ट्रस्टी | श्री. वामन रा. वाघचौरे – ट्रस्टी

टिप : गुलालाचा कार्यक्रम इन सोलापूर केबलवर दाखविण्यात येईल.
बुधवारी दिनांक ४ फेब्रुवारी रोजी हैद्राबाद रोड-विडी घरकुल, पुर्व विभाग-गेंट्याल टॉकीज, विजयपूर रोड-हॉटेल सैफुल व श्री सिध्देश्वर साखर कारखान्यापर्यंत बसची सोय करण्यात आली आहे.



CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



## महत्वाचे...



### पालिकेच्या वतीने महात्मा गांधी यांना अभिवादन

**सोलापूर, दि. ३१ जानेवारी-**

सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने परम पूज्य महात्मा गांधी यांच्या पुण्यतिथी निमित्त रेल्वे स्टेशन चौक येथील महात्मा गांधी यांच्या पुतळ्यास अतिरिक्त आयुक्त वीणा पवार यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी कामगार कल्याण व जनसंपर्क अधिकारी अजितकुमार खानसोळे व मनपाचे सेवक उपस्थित होते. तसेच महानगरपालिकेमध्ये कौन्सिल हॉल येथील महापौर कार्यालय येथे सकाळी परमपूज्य महात्मा गांधी यांच्या प्रतिमेस अतिरिक्त आयुक्त वीणा पवार यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी कामगार कल्याण व जनसंपर्क अधिकारी अजितकुमार खानसोळे, अशोक खडके उपस्थित होते.



### पी.बी. ग्रुपतर्फे मिठाई वाटप

**सोलापूर, दि. ३१ जानेवारी-**

प्रजासत्ताक दिनानिमित्त प्रबुद्ध भारत तरुण मंडळ (पी.बी. ग्रुप) यांच्या वतीने श्राविका चौक, बुधवार पेठ येथे ध्वजारोहण व विद्यार्थ्यांना मिठाई वाटप कार्यक्रम पार पडला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पी.बी. ग्रुपचे प्रमुख मार्गदर्शक आनंद चंदनशिवे व माजी नगरसेवक गणेश पुजारी यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. त्यानंतर आनंद चंदनशिवे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. कार्यक्रमास पी.बी. ग्रुपचे प्रमुख गौतम चंदनशिवे, श्रीमंत जाधव, उमाबाई श्राविका प्रशालेचे सुहास छंचुरे, दिगंबर जैन गुरुकुलचे सुहास पंडित, सुखदेव इंगळे, ॲड. विशाल मस्के, ॲड. स्वाती मस्के, हृदयनाथ मोकाशी, पी.बी. ग्रुपचे अध्यक्ष बाबा गायकवाड, प्रतिक चंदनशिवे, कमलेश पुजारी, ज्योतिर्लिंग कारंडे, औदुंबर तीर्थकर, आदित्य चंदनशिवे, धम्मपाल मैंदर्गीकर, उमेश रणदिवे, अमित माने, रवी काकडे, इंद्रजीत बागले, शंकर कांबळे, अक्षय मस्के, सिद्धांत तळभंडारे, शिरीष गायकवाड, प्रथमेश सुरवसे, बंटी माने, अजय इंगळे, संदीप कापुरे, अमर इंगळे, मनीष साळवे, रंगा वाघमारे, नाना कापुरे, अमोल कदम, शुभम कांबळे, विनायक क्षीरसागर, सागर देडे, कैलास वाघमारे, संतोष चंदनशिवे, सुरज जगताप, मनोज थोरात, बंटी सरवदे, जयराज सांगे, रोहन तळभंडारे उपस्थित होते.

### झेनिथ ब्लॅक एडिशनच्या सुरुवातीची घोषणा

**सोलापूर, दि. ३१ जानेवारी-**

भारताच्या प्रीमियम व्हिस्की विभागातील अग्रेसर असलेल्या ब्लेंडर्स प्राइडने, ब्लेंडर्स प्राइड झेनिथ ब्लॅक एडिशनच्या सुरुवातीची घोषणा केली आहे. ही एक मर्यादित-एडिशन असून,यात आकर्षक काळ्या रंगाची स्टाइल आणि आकर्षक ब्लेंडर्स प्राइडचे मिश्रण असून त्याआधारे एक खरोखरच वैशिष्ट्यपूर्ण अनुभव निर्माण करण्यात आला आहे.उत्तम आरामदायीपणा आणि वेगळेपणाचे प्रतीक असलेल्या आकर्षक काळ्या डिझाइनमध्ये सादर केलेली, झेनिथ ब्लॅक एडिशन विशेषतः अशा व्यक्तींसाठी तयार करण्यात आली आहे. जी व्हिस्कीची जाणकार असून-लाखात एक असेल. पर्नोड रिकार्ड इंडियाच्या सीएमओ देवश्री दासगुप्ता म्हणाल्या, ब्लेंडर्स प्राइड भारतात प्रीमियम व्हिस्कीचे बेंचमार्क सातत्याने नवनवीन पद्धतीने तयार करत असते. झेनिथ ब्लॅक एडिशनच्या सुरुवातीमुळे हा ब्रँडचा आतापर्यंतचा सर्वात उत्कृष्ट आविष्कार समोर आला आहे.

# ग्रामीण अर्थव्यवस्था बळकट करण्याचा मानस

## माजी आमदार राऊत; छत्रपती आत्मनिर्भर कृषी व ग्राम विकास प्रबोधन यात्रेचा शुभारंभ

**तभा वृत्तसेवा,**
**वैराग, दि. ३१ जानेवारी-**

गाव पातळीवर कृषी आणि ग्रामविकास यांचा समन्वय साधून ग्रामीण अर्थव्यवस्था बळकट करण्याचा मानस माजी आमदार राजाभाऊ राऊत यांनी व्यक्त केला.



बार्शी तालुक्यातील शेतकऱ्यांना आधुनिक आणि नैसर्गिक शेतीची जोड देऊन त्यांना स्वावलंबी बनवण्यासाठी, नमो नैसर्गिक व आत्मनिर्भर कृषी व ग्राम विकास प्रबोधिनी, बळेवाडी यांच्या वतीने आयोजित 'छत्रपती आत्मनिर्भर कृषी व ग्राम विकास प्रबोधन यात्रा' उत्साहात सुरू झाली. बळेवाडी येथील श्री स्वामी समर्थ मंदिर परिसरात माजी आमदार राजाभाऊ राऊत यांच्या हस्ते या यात्रेचा शुभारंभ करण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी या प्रकल्पाचे संस्थापक आणि सेवानिवृत्त डी.वाय.एस.पी. नानासाहेब कदम होते.

यावेळी बोलताना नानासाहेब कदम यांनी सांगितले की, या प्रबोधन यात्रेचा मुख्य उद्देश बार्शी तालुक्यातील गावागावात जाऊन शेतकऱ्यांना 'छत्रपती आत्मनिर्भर कृषी तंत्रज्ञान' शिकवणे हा आहे. अत्यंत कमी खर्चात शास्त्रीय पद्धतीने शेती करून शेतकऱ्यांचे उत्पादन दुप्पट कसे होईल, याचे थेट प्रशिक्षण या यात्रेदरम्यान दिले जाईल.

ही प्रबोधन यात्रा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या पी.एम. प्रणाम आत्मनिर्भर कृषी योजना' आणि महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या 'मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान' या दोन्ही महत्त्वाकांक्षी योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी अत्यंत उपयुक्त ठरणार आहे. ही यात्रा बार्शी तालुक्यातील सर्व गावांमध्ये फिरून शेतकऱ्यांचे प्रबोधन करणार आहे.

या यात्रेचा भव्य समारोप १९ फेब्रुवारी २०२६ रोजी 'छत्रपती शिवाजी महाराज जयंती' दिनी होणार आहे. शेतकरी आत्मनिर्भर झाला तरच गाव समृद्ध होईल. नानासाहेब कदम यांनी राबवलेला हा उपक्रम कौतुकास्पद असून या यात्रेच्या समारोप प्रसंगी मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस आणि ग्रामविकास मंत्री तथा पालकमंत्री जयकुमार गोरे उपस्थित राहणार आहेत.

बळेवाडी येथील 'छत्रपती कृषी ज्ञान मंदिर' हे आता बार्शीच्या कृषी क्रांतीचे केंद्र ठरणार असल्याचा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

### भारतरत्न इंदिरा गांधी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या प्राचार्यांचा अभिनव शोध; पेटंट प्रकाशित

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३१ जानेवारी-**



भारत रत्न इंदिरा गांधी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, सोलापूर येथील प्राचार्य डॉ. अनिल देशमाने यांच्या संशोधन कार्याला उल्लेखनीय यश मिळाले असून, मायक्रोस्कोपमधील प्रतिमा थेट भिंतीवर प्रोजेक्ट करण्यासाठीच्या अभिनव मॉडेलवर कॉपीराइट विषयक पेटंट प्रकाशित झाले आहे. हे संशोधन मॉडेल शैक्षणिक व संशोधन क्षेत्रासाठी अत्यंत उपयुक्त ठरणारे असून, प्रयोगशाळांमधील अध्यापन अधिक प्रभावी आणि आधुनिक पद्धतीने सादर करण्यास मदत करणारे आहे. पारंपरिक मायक्रोस्कोपमध्ये प्रतिमा एकाच वेळी सर्व विद्यार्थ्यांना दिसत नसल्यामुळे अध्यापनात मर्यादा येत होत्या. मात्र डॉ. देशमाने यांनी विकसित केलेल्या या मॉडेलमुळे मायक्रोस्कोपमधील प्रतिमा मोठ्या आकारात भिंतीवर प्रोजेक्ट करता येणार असून, संपूर्ण वर्गाला ती स्पष्टपणे पाहता येणार आहे. या उल्लेखनीय यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष रविंद्रजी गायकवाड, सचिवा सौ अनामिका गायकवाड मॅडम यांनी डॉ. अनिल देशमाने सर यांचे अभिनंदन करून त्यांच्या संशोधनात्मक कार्याचे कौतुक केले. तसेच या पेटंटमुळे महाविद्यालयाच्या संशोधन संस्कृतीला चालना मिळाल्याचे मत त्यांनी व्यक्त केले. प्राध्यापकवर्ग व विद्यार्थ्यांनीही डॉ. देशमाने यांचे अभिनंदन केले असून, या यशामुळे भारत रत्न इंदिरा गांधी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, सोलापूरच्या शैक्षणिक व संशोधन क्षेत्रातील प्रतिष्ठेत भर पडली आहे.



### गुळवंची येथे अजित पवारांना श्रध्दांजली

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३१ जानेवारी-**

उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचे बारामती येथे झालेल्या विमान अपघातात त्यांच्यासह सहाजणांचा मृत्यू झाल्याची माहिती समजताच सर्वत्र शोककळा पसरली असून वातावरण शोकमय झाले आहे. या दुःखद घटनेनंतर गुरुवारी उत्तर सोलापूर गुळवंची येथे एकत्र येऊन अजितदादा पवार यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आले होते. याप्रसंगी एकत्पव फाउंडेशनचे प्रमुख दीपक करकी, शुभम जाधव, शहाबाज मकानदार, ऋषिकेश हरसुरे, किरण सरवळे, चेतन झाडे यावेळी उपस्थित होते.

### वैष्णवी धस हिच्या कवितेतून स्त्री प्रश्नांच्या दाहकतेचे प्रकटीकरण

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ३१ जानेवारी-**



तुकडे होतात रोज हजारदा मनाचे तरीही निःस्तब्ध बोल जनांचे या कवितेतील ओळी स्त्री समस्येची रीघ ओढतात. बी.एस्सी. भाग- २ मधील विद्यार्थीनी वैष्णवी धस हिने शिवरायांच्या विचारांची गरज आहे. या कवितेचे वाचन करुन स्त्री प्रश्नांची दाहकता प्रस्तुत केली. राष्ट्रीय बालिका दिन व बेटी बचाव, बेटी पढाव या योजनेच्या दशकपूर्तीनिमित्त श्री शिवाजी महाविद्यालयात २१ व्या शतकात स्त्रीचे स्थान, अस्तित्व व वाटचाल या विषयावर काव्यवाचन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कवी जयंत महामात्रा व कवी आघा शाहीद अली यांच्या हंगर व द रिअल इमेज या कवितांमधील मतितार्थ काव्यरचनेस कारणीभूत ठरला.



### डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा अवमान; मंत्री महाजन यांच्यावर कारवाईची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३१ जानेवारी-**

प्रजासत्ताक दिनाच्या शासकीय कार्यक्रमात भारतीय संविधानाचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जाणीवपूर्वक अवमान केल्याचा आरोप करत राज्याचे ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन यांच्यावर अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंध) अधिनियम, १९८९ अंतर्गत गुन्हा दाखल करावा तसेच त्यांनी नैतिक जबाबदारी स्वीकारून मंत्रीपदाचा तात्काळ राजीनामा द्यावा, अशी ठाम मागणी सोलापूर शहर काँग्रेस कमिटी व भीमसंघर्ष तरुण मित्र मंडळाच्या वतीने करण्यात आली आहे. या मागणीसंदर्भात सोलापूर शहर काँग्रेसचे उपाध्यक्ष व भीमसंघर्ष तरुण मित्र मंडळाचे संस्थापक संजय गायकवाड यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने निवासी उपजिल्हाधिकारी अभिजित पाटील यांना निवेदन सादर केले. यावेळी विवेक कन्ना, भीमराव शिंदे, सागर गायकवाड, मयूर जगताप, पवन सग्गम व वेंकटेश बोम्मेन उपस्थित होते.

### पालिकेत वीर हुतात्म्यांना केले अभिवादन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३१ जानेवारी-**

देशाच्या स्वातंत्र्यलढ्यात, संरक्षणात आणि संयुक्त महाराष्ट्र निर्मितीच्या संघर्षात आपल्या प्राणांची आहुती देणाऱ्या वीर हुतात्म्यांना ३० जानेवारी हुतात्मा दिनी सोलापूर महापालिकेच्या वतीने हुतात्म्यांना अभिवादन करण्यात आले. दोन मिनिटे मौन पाळून आपापल्या कार्यालयात उभे राहून कर्मचाऱ्यांनी आदरांजली वाहिली. त्यांच्या त्यागाचे स्मरण करण्यात आले. सर्व हुतात्म्यांच्या स्मरणार्थ आदर व्यक्त करण्यासाठी पालिकेच्या वतीने इंद्रभूवन आवारात सकाळी ११ वाजता अग्निशामक दलाच्या गाडी मार्फत २ मिनिटे सायरन वाजविण्यात आला. त्यावेळी पालिकेच्या सर्व विभागातील कार्यालयात सर्व अधिकारी/ कर्मचारी यांनी आपल्या आपल्या कार्यालयातील जागी उभे राहून आदरांजली वाहिली. यावेळी महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे ,अतिरिक्त आयुक्त वीणा पवार, संदीप कारंजे, उपायुक्त आशिष लोकरे , सहाय्यक आयुक्त शशिकांत भोसले, नगरचना सहसंचालक मनीष भिष्णूरकर यांच्यासह विविध विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

## दामाजी कारखान्यावर प्रजासत्ताक दिन साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि.३१ जानेवारी-**

श्री संत दामाजी साखरी साखर कारखाना कार्यस्थळावर प्रजासत्ताक दिन साजरा करण्यात आला. प्रजासत्ताक दिनाच्या निमीत्ताने चेअरमन शिवानंद पाटील यांचे हस्ते ध्वजारोहन कार्यक्रम संपन्न झाला.

याप्रसंगी सुरुवातीला राष्ट्रपिता महात्मा गांधी यांचे प्रतिमेचे पूजन चेअरमन शिवानंद पाटील, व्हा. चेअरमन तानाजी खरात यांच्या हस्ते संपन्न झाले. प्रास्तावीक प्र. कार्यकारी संचालक रमेश जायभाय यांनी केले. कार्यक्रम प्रसंगी कारखान्याचे कार्यकारी संचालक रमेश जायभाय यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी विलासराव देशमुख हायस्कूलच्या शालेय विद्यार्थ्यांनी भाषणे व कवायत संचलन झाले. याप्रसंगी व्हाईस चेअरमन तानाजी खरात, संचालक मुरलीधर दत्तू, गौरीशंकर बुरकूल, गोपाळ भगरे, राजेंद्र पाटील, भारत बेदरे, दयानंद सोनगे, औदुंबर वाडदेकर, रेवणसिध्द् लिगाडे, भिवा दोलतडे, बसवराज पाटील, गौडाप्पा बिराजदार, दिगंबर भाकरे, महादेव लुगडे, तानाजी कांबळे, प्रथमेश पाटील, तानाजी काकडे, सुरेश कोळेकर, विलासराव देशमुख उपस्थित होते.



सूत्रसंचालन कार्यालय अधिक्षक दगडू फटे यांनी केले.

### गणेश नाईक विद्यामंदिर शाळेत प्रजासत्ताक दिन

**सोलापूर, दि. ३१ जानेवारी-**

जुळे सोलापूर येथील रत्न मंजिरी सोसायटी परिसरातील गणेश नाईक विद्यामंदिर शाळेत प्रजासत्ताक दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रबोधनकार क्रीडा व शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव ॲड. राजशेखर बिराजदार-पाटील हे होते. या सोहळ्याला प्रमुख पाहुणे म्हणून सोलापूर येथील रघोजी किडनी हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटरच्या डॉ. निहारिका रघोजी आणि दैनिक बाळकडूचे पश्चिम महाराष्ट्र विभाग प्रमुख साहेबराव परबत यांची उपस्थिती होती. या सोहळ्यास शाळेच्या मुख्याध्यापिका सुरेखा बिराजदार व मातोश्री मलकव्वा हणमंतप्पा बिराजदार-पाटील, मुख्याध्यापिका ज्योती आळगी यांची प्रमुख उपस्थिती होती.

# डॉ. हेडगेवार व संघाचे स्वातंत्र्यसंग्रामातील योगदान

**मला समजलेला राष्ट्रीय स्वयंसेवक संघ भाग – १९**

**– डॉ. सचिन लादे, पंढरपूर**
**पुणे विभाग सहप्रचार प्रमुख रा.स्व.संघ.**
**मो.क्र.७५८८२१६५२६**

संघ हा जातीयवादी आहे अशी भ्रामक कल्पना समाजात ज्या पद्धतीने पसरवण्यात आली आहे, त्याच पद्धतीने संघाने स्वातंत्र्यसंग्रामात कधीच भाग घेतला नाही अशीही गैरसमजुत पसरवली जात आहे. परंतु प्रत्यक्षात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे संस्थापक डॉ.केशव बळीराम हेडगेवार हे जन्मजात देशभक्त असल्यामुळे या देशावर असणारे इंग्रजांचे राज्य घालविण्यासाठी त्यांनी अगदी बालवयातच प्रयत्न केल्याचे त्यांच्या चरित्रातून दिसून येते. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची स्थापना होण्यापूर्वी डॉ. हेडगेवार यांनी स्वातंत्र्य आंदोलनामध्ये कशाप्रकारे सहभाग घेतला होता याचे अनेक पुरावे काँग्रेस पक्षाच्या इतिहासात तसेच अनेक कागदपत्रातून दिसून येतात. त्याची यादी खूप मोठी आहे. डॉ.हेडगेवार यांच्या चरित्रामध्ये या गोष्टींचे संदर्भ सापडतात.

संघ स्थापन होण्यापूर्वी डॉ.हेडगेवार यांनी स्वातंत्र्यसंग्रामात कसा सहभाग घेतला होता याची काही ठळक उदाहरणे पाहूयात -

१) सन २०१० मध्ये कोलकत्ता येथे वैद्यकीय शिक्षण घेत असताना अनुशीलन समिती या क्रांतिकारक संघटनेचे डॉ.हेडगेवार सक्रिय व प्रमुख सदस्य होते. कोकेन या नावाने ते क्रांतिकार्य करत होते.

२) ३० डिसेंबर १९११ ते ८ जानेवारी १९१२ या कालखंडात पंचम जॉर्ज हे कोलकत्ता येथे वास्तवाला होते, त्या कालखंडामध्ये पंचम जॉर्ज यांच्या विरोधात क्रांतिकारकांनी आंदोलन करू नये यासाठी डॉ.हेडगेवार यांना अटक करण्यात आली होती.

३)सन १९१२ मध्ये सुभाषचंद्र बोस यांनी कोलकत्यात आयोजित केलेल्या स्वदेशी प्रदर्शनीय मेळाव्यामध्ये डॉ. हेडगेवार यांनी स्वयंसेवक म्हणून काम केले होते.

४) डिसेंबर १९१३ मध्ये व्हाईसरॉय लॉर्ड हार्डिंग यांच्या कोलकत्ता भेटीच्या प्रसंगी डॉ.हेडगेवार यांना लाल बाजार पोलीस चौकीमध्ये अटक करून ठेवण्यात आले होते. व्हाईसरायची भेट समाप्त झाल्यानंतर त्यांची सुटका करण्यात आली.

५)काँग्रेसच्या राष्ट्रीय राजकारणामध्ये राष्ट्रीय नेते म्हणून काम करणाऱ्या लोकमान्य टिळकांची सन १९१६ मध्ये भेट घेऊन त्यांच्यासोबत तीन दिवस यांनी वास्तव्य केले.

६)सन १९१७ मध्ये मध्य प्रांतातील होमरूल लीगमध्ये प्रवेश करून सभा व परिषदांमध्ये त्यांनी भाषणे केली.

७)स्वयंसेवकांच्या अभावी सार्वजनिक कामे थांबू नयेत यासाठी जानेवारी १९२० मध्ये भारत स्वयंसेवक मंडळाची डॉ.हेडगेवार यांनी स्थापना केली, यामध्ये त्यांनी कार्यवाह म्हणून काम केले.

८) मे १९२० मध्ये नागपूर येथे होणाऱ्या काँग्रेस अधिवेशनाच्या पूर्वतयारीसाठी त्यांनी मध्य प्रांतात प्रचार दौरा केला.

९) ११ ते १८ ऑगस्ट १९२० या काळात नागपुरात असहकार सप्ताह पाळणाऱ्या नॉन को ऑपरेशन बोर्डाचे कार्यवाह म्हणून त्यांनी काम केले.

१०) १ ऑगस्ट १९२० रोजी लोकमान्य टिळकांच्या निधनाने निर्माण झालेली पोकळी भरून काढण्यासाठी राजकारणात पुन्हा यावे अशी योगी अरविंद यांना विनंती करण्यासाठी डॉ.हेडगेवार यांनी पॉण्डेचरीचा प्रवास केला.

११)डिसेंबर १९२० मध्ये भरणाऱ्या नागपूर काँग्रेस अधिवेशनापूर्वी प्रांतिक काँग्रेस समितीने नेमलेल्या असहकार मंडळाचे कार्यवाह म्हणून त्यांनी काम केले.

१२) २६ ते ३१ डिसेंबर १९२० या कालावधीत नागपूर येथे भरलेल्या काँग्रेस अधिवेशनामध्ये आरोग्य विभागाचे अध्यक्ष म्हणून देखील हेडगेवार यांनी काम पाहिले.

१३) काँग्रेसच्या असहकार आंदोलनात जानेवारी १९२१ मध्ये सहभागी होण्याचा निर्णय डॉ.हेडगेवार यांनी घेऊन मध्य प्रांतातील अनेक गावांमध्ये सरकारविरोधी जहाल भाषणे केली. जवळपास दोन महिने जहाल भाषणे करत फिरणाऱ्या डॉ.हेडगेवार यांच्यावर २३ फेब्रुवारी १९२१ रोजी प्रकट भाषण करण्यास एक महिन्यांसाठी निर्बंध घालणारी जिल्हाधिकाऱ्यांनी आज्ञा केली.

१४) भाषण बंदीचे उल्लंघन केले म्हणून डॉ.हेडगेवार यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला व १९ ऑगस्ट १९२१ रोजी एक वर्षाची सश्रम कारावासाची शिक्षा त्यांना देण्यात आली, या शिक्षेचे त्यांनी हसतमुखाने स्वागत केले, कारावासातून मुक्तता झाल्यानंतर काँग्रेसच्या कामाला त्यांनी वाहून घेतले.

१५) ऑगस्ट १९२२ मध्ये प्रांतिक काँग्रेसच्या संयुक्त कार्यवाहपदी डॉ. हेडगेवार यांची निवड करण्यात आली.

१६) १९२२ साली कोलकत्ता येथे झालेल्या क्रांतिकारकांच्या गुप्त बैठकीला डॉ.हेडगेवार उपस्थित होते.

१७) सन १९२३ मध्ये वर्धा सेवक परिषदेत त्यांची उपस्थिती होती.

१८) फेब्रुवारी १९२४ मध्ये वर्धा येथे महात्मा गांधीजींनी भेट दिली, त्यावेळेस त्यांच्या व्यवस्थेमध्ये काम पाहिले.

१९) जानेवारी १९२५ मध्ये मध्य प्रांताच्या अनेक सभांमध्ये त्यांनी सहभाग घेतला, अनेक ठिकाणी सभेचे अध्यक्षपदही भूषविले.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची स्थापना विजयादशमी, २७ सप्टेंबर १९२५ साली झाली, तत्पूर्वी डॉ.हेडगेवार हे देशाच्या स्वातंत्र्याच्या आंदोलनात नेतृत्व करणाऱ्या काँग्रेस पक्षाच्या कामांमध्ये सक्रिय होते, तसेच क्रांतिकारकांना देखील सातत्याने मदत करण्यात त्यांचा पुढाकार होता. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या स्थापनेनंतर संघाचा व स्वयंसेवकांचा देखील स्वातंत्र्यसंग्रामात मोठ्या प्रमाणावर सहभाग राहिला आहे, ते देखील आपण पाहणार आहोत.

**राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा भारतीय स्वातंत्र्यसंग्रामातील सहभाग**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने भारताच्या स्वातंत्र्यसंग्रामात योगदान दिले नाही अथवा सहभाग घेतला नाही याबाबत सातत्याने भ्रम पसरवला जातो, परंतु राष्ट्रीय स्वयंसेवक संघ सुरू होण्यापूर्वी म्हणजेच सन १९२५ पूर्वी संघाचे संस्थापक डॉ.केशव बळीराम हेडगेवार यांनी काँग्रेसच्या कामामध्ये जबाबदारी घेऊन सक्रियपणे काम केले, क्रांतीकारकांच्या कार्यामध्ये सहभाग नोंदवला व भारताच्या स्वातंत्र्याच्या आंदोलनात प्रसंगी तुरुंगवासही भोगला.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची स्थापना झाल्यानंतर संघ हा लगेचच संपूर्ण देशभर विस्तारलेला नव्हता. नागपूर व विदर्भातील काही जिल्ह्यात तसेच पुणे, मुंबई, कोल्हापूर यासारख्या मोठ्या शहरात संघ सुरुवातीच्या काळात अत्यंत अल्प स्वरूपात अस्तित्वात होता. आणखी काही वर्षानंतर भारताच्या विविध प्रांतातील प्रमुख शहरांमध्ये संघाचे काम सुरू झाले. परंतु संघाचा जीव अत्यंत लहान होता म्हणजेच संघाची ताकद अत्यंत अल्प होती, तरीही संघ व संघ स्वयंसेवकांनी प्रत्येक गावामध्ये स्वातंत्र्यसंग्रामात कोणत्या ना कोणत्या स्वरूपात भाग घेतल्याचे अनेक पुरावे सापडतात. सन १९३० मध्ये काँग्रेसने संपूर्ण स्वातंत्र्याचा ठराव पास केल्यानंतर संघाच्या सर्व शाखांनी काँग्रेसच्या आवाहनानुसार २६ जानेवारी हा दिवस स्वातंत्र्य दिन म्हणून साजरा केला व काँग्रेसने स्वातंत्र्याच्या ध्येयाचा स्वीकार केल्याबद्दल काँग्रेसचे अभिनंदन संघाच्या सर्व शाखांनी केले. काँग्रेसने जंगल सत्याग्रह करण्याचा निर्णय घेतल्यानंतर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने व स्वयंसेवकांनी या सत्याग्रहात भाग घेण्याचे ठरविले. वेगवेगळ्या गावातील स्वयंसेवकांनी त्या - त्या परिसरात होणाऱ्या सत्याग्रहात सक्रिय सहभाग नोंदविला. डॉ. हेडगेवार यांनी यवतमाळ जिल्ह्यातील धामणगाव मार्गावर असलेल्या लोहारा जंगलात सत्याग्रह केला.२१ जुलै १९३० रोजी त्यांना अटक करण्यात आली व त्यांच्यावर खटला दाखल होऊन त्यांना सहा महिने सश्रम कारावास अशी शिक्षा ठोठावण्यात आली व अकोला कारागृहात त्यांची रवानगी करण्यात आली. डॉ.हेडगेवार यांना सहा महिन्यांची सश्रम कारावासाची जशी शिक्षा झाली त्याच प्रमाणे अनेक स्वयंसेवकांना देखील शिक्षा झाल्या. डॉ हेडगेवार यांनी शिक्षा भोगून आल्यानंतर लगेचच स्वातंत्र्यसंग्राम चळवळीला व संघाच्या कार्याला सुरुवात केली. डॉ. हेडगेवार हयात होते,तोपर्यंत म्हणजेच सन १९४० पर्यंत तसेच डॉक्टरांच्या पश्चात श्री.माधव सदाशिव गोळवळकर गुरुजी सरसंघचालक झाल्यानंतर देखील संघ व संघ स्वयंसेवकांनी सातत्याने स्वातंत्र्याच्या आंदोलनात सहभाग नोंदविल्याचे अनेक पुरावे सापडतात. त्या काळातील क्रांतिकार्याला देखील स्वयंसेवकांनी उघडपणे मदत केली. अनेक क्रांतिकारकांना भूमिगत ठेवण्यासाठी तसेच त्यांच्या कुटुंबियांना सांभाळण्यासाठी इंग्रजांचा रोष पत्करून स्वयंसेवकांनी कार्य केले. श्री.सुभाषचंद्र बोस यांनी डॉ. हेडगेवार यांच्याकडून अनेकदा मार्गदर्शन घेतल्याचे देखील पुरावे सापडतात. डॉ.हेडगेवार यांना भेटण्यासाठी नागपूरमध्ये श्री.सुभाषचंद्र बोस २० जून १९४० रोजी आले, परंतु डॉक्टरांची तब्येत अत्यवस्थ असल्यामुळे त्यांची भेट होऊ शकली नाही व दुसऱ्याच दिवशी डॉक्टरांचे निधन झाले. स्वातंत्र्याच्या आंदोलनातील संघाचा व स्वयंसेवकांचा सहभाग हा लपून राहणारा नाही, परंतु संघाबद्दलची भ्रामक कल्पना पसरवण्यासाठी सातत्याने जो अपप्रचार केला जातो तो मात्र अत्यंत चुकीचा आहे. संघ अथवा संघाचे स्वयंसेवक अपप्रचाराला कधीही टीकात्मक उत्तर देत नाहीत तसेच प्रसिद्धीपासून ते सतत दूर राहत असतात, त्यामुळेच या विषयावर फारसे प्रसिद्धीला येत नाही म्हणूनच संघावर घेतला जाणारा आक्षेप लोकांना खरा वाटतो. परंतु वास्तविक परिस्थिती निश्चितच वेगळी आहे. संघ व स्वयंसेवकांनी देशाच्या स्वातंत्र्याच्या आंदोलनात सक्रिय सहभाग घेतला होता हे मात्र सूर्यप्रकाशाएवढे स्पष्ट आहे, सत्य आहे.

सोलापूर तरुण भारत
SOLAPUR TARUN BHARAT
न मे कर्मफले स्पृहा

रविवार, १ फेब्रुवारी २०२६



# ‘बीएलए’च्या हल्ल्यात २० पाकिस्तानी सैनिक ठार

## ४१ नागरिकांच्या हत्येचा घेतला बदला ● कारवाईसाठी लष्कर-वायुदल तैनात

◆ **क्वेटा, ३१ जानेवारी**

बलुचिस्तानमध्ये दहशतवादी गटाशी संबंध असल्याचा आरोप करीत पाकिस्तानी लष्कराने ४१ बलुच नागरिकांची गुरुवारी रात्री गोळ्या घालून हत्या केली. यानंतर या भागात पाकिस्तानी सरकारविरोधात तीव्र निदर्शने सुरू असताना बलुचिस्तान लिबरेशन आर्मी अर्थात् बीएलने शुक्रवारी रात्री लष्कराच्या तळावर हल्ले चढवले. यात २० जवान ठार, तर ३० पेक्षा अधिक जखमी झाले. यानंतर पाकिस्तानी लष्कर आणि बलुचमध्ये अनेक भागात संघर्ष सुरू आहे. काही ठिकाणी पाकिस्तानी सैनिक पोस्ट सोडून पळाल्याचे वृत्त आहे.

बीएलएच्या सशस्त्र दलाने राजधानी क्वेटासह बलुचिस्तानमधील १२ शहरांमध्ये भयंकर प्रतिहल्ला सुरू केला आहे. बलुचच्या हल्ल्याला प्रत्युत्तर देण्यासाठी पाकिस्तानी लष्करासह वायुदलाला या भागात तैनात करण्यात आले. बलुचिस्तान लिबरेशन आर्मीचे प्रवक्ते झियांद बशीर झेब यांनी निवेदनात म्हटले की, पाकिस्तानी लष्कराने बलुचिस्तानातील निष्पाप नागरिकांची हत्या केली. याचा सूड घेण्यासाठी आमच्या जवानांनी लष्करी तळावर हल्ले चढविले. यात त्यांचे २० पेक्षा अधिक जवान ठार झाले, तर ३० जखमी आहे.

बलुचिस्तान प्रातांतील अनेक भागात आमचे जवान तैनात असून, पाकिस्तानच्या कोणत्याही कृतीला प्रत्युत्तर देण्यासाठी सज्ज आहे. नोशकी भागात झालेल्या चकमकीत आम्ही आठ पाकिस्तानी सैनिक मारले. बलुचिस्तानातील तुरुंगावर ताबा मिळविण्यात यश आहे. पाकिस्तानी लष्कराने या भागातून माघार घेतली आहे आणि आता त्यांच्याकडून हेलिकॉप्टरचा वापर करून हल्ले केले जात आहे.

**नागरिकांना मदतीचे आवाहन**

बलुचने पाकिस्तानी लष्कराविरोधात ऑपरेशन हेरोफचा दुसरा टप्पा सुरू केला आहे. बीएलए प्रमुख बशीर झेब यांनी जनतेला बीएलए सैनिकांना मदत करण्याचे आवाहन करताना म्हटले की, ही कारवाई त्यांच्या मातृभूमीचे रक्षण करण्यासाठी सुरू करण्यात आली आहे. बलुचिस्तानला पाकिस्तानच्या ताब्यातून मुक्त करण्यासाठी हा निर्णायक संघर्ष आहे आणि त्यासाठी सर्व नागरिकांनी एकजूटता दाखवावी. ◀(वृत्तसंस्था)



### बीएलएचे ऑपरेशन हेरोफ काय आहे?

ऑगस्ट २०२४ मध्ये बलुचने पहिल्यांदा ऑपरेशन हारोफ सुरू केले होते. ते बलुचिस्तान परत मिळवण्यासाठी राबवण्यात आले. पहिल्या टप्प्यात बीएलएने १३० पाकिस्तानी सैनिकांना ठार मारल्याचा दावा त्यांनी केला होता. लष्करी तळासह प्रमुख महामार्ग आणि शासकीय प्रतिष्ठाने ताब्यात घेतल्याचा दावा त्यांनी केला होता. बलुचने चीनला ग्वादर आणि बलुचिस्तानपासून दूर राहण्याचा इशारा दिला आहे. ■

### रेल्वे वाहतूक ठप्प, आणिबाणी जाहीर

क्वेटा शहराच्या सीमेवर बलुच आणि पाकिस्तानी लष्करात तीव्र संघर्ष सुरू आहे. बलुचिस्तानमधील युद्धसदृश्य परिस्थिती पाहता या मार्गावरील सर्व रेल्वे वाहतूक बंद करण्यात आली तसेच सरकारने आणिबाणी जाहीर केली आहे. वैद्यकीय कर्मचाऱ्यांच्या सुट्या रद्द करण्यात आल्या. आपत्कालीन परिस्थितीसाठी सज्ज राहण्याचा निर्देश प्रशासनाला देण्यात आला. बलुच जवानांनी अनेक पोलिस ठाणी आपल्या ताब्यात घेतली आणि आरोपींना मुक्त केले. ■



नॉर्दन आर्मी कमांडर लेफ्टनंट जनरल प्रतीक शर्मा यांनी शनिवारी जम्मू-काश्मीरच्या किश्तवाड जिल्ह्यात लष्करी सज्जता आणि दहशतवादविरोधी यंत्रणेचा आढावा घेत जवानांशी संवाद साधला

### कंटेनरची दोन ऑटोंना धडक, पाच प्रवाशांचा मृत्यू

◆ **आग्रा, ३१ जानेवारी**

उत्तरप्रदेशातील आग्रा जिल्ह्यातील खंडौली पोलिस ठाणे परिसरात शनिवारी सकाळी भरधाव कंटेनरने दोन ऑटोला जोरदार धटक दिली. या उपघातात पाच प्रवाशांचा जागीच मृत्यू झाला, तर तीन जण जखमी आहे. सर्व मृतक सहपौचे गावातील रहिवासी आहेत.

जगन्नमाथ पुरीच्या यात्रेवरून ऑटोने गावी परत जात असताना मागून भरधाव कंटेनर दोन ऑटोंना चिरडत समोर निघून गेला. अपघाताची माहिती मिळताच पोलिस घटनास्थळी पोहोचले आणि अपघातग्रस्तांना तातडीने रुग्णवाहिकेच्या मदतीने जवळच्या रुग्णालयात हलविले. ◀(वृत्तसंस्था)

# अमेरिकेत पुन्हा ‘शटडाऊन’

**ट्रम्पच्या धोरणांमुळे निधी विधेयक रखडले**

◆ **वॉशिंग्टन, ३१ जानेवारी**

काँग्रेसमध्ये विरोधी पक्षाने निधी विधेयकाला पाठिंबा देण्यास विरोध केल्याने अमेरिकेत पुन्हा एकदा शटडाऊनची परिस्थिती उद्‌भवली. राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचे व्यापार व कठोर इमिग्रेशन धोरण आणि व्हेनेझुएलावर केलेल्या हल्ल्याला विरोध करीत विरोधी पक्ष डेमाक्रॅट्सने शुक्रवारी काँग्रेसमध्ये सादर करण्यात आलेल्या निधी विधेयकाला पाठिंबा देण्यास नकार दिला. पर्यायाने निधी विधेयक मंजूर न झाल्याने सरकारी खर्च थांबला आहे.

रिपब्लिकन हाऊस स्पीकर माईक जॉन्सन म्हणाले की, सोमवारी काँग्रेसमध्ये पुन्हा निधी विधेयक सादर करून मतदान घेतले जाईल.



डेमाक्रॅटच्या सिनेटरने शासकीय कर्मचाऱ्यांना वेठीस धरू नये, त्यांनी आक्षेपांवर राष्ट्राध्यक्षांसोबत चर्चा करावी. शटडाऊनच्या परिस्थितीसाठी डेमाक्रॅट जबाबदार असून, अमेरिकेचे नागरिक त्यांना माफ करणार नाही. देशाचे आर्थिक नुकसान आणि बदनामी करण्याचा त्यांचा प्रयत्न आहे आणि त्यांना यशस्वी होऊ देणार नाही.

हे पूर्ण शटडाऊन नाही तर, केवळ आंशिक आहे. काही विभागातील कर्मचारी कार्यरत राहतील आणि काही सरकारी सेवा सध्या बंद करण्यात आल्या आहे. विशेष असे की, तीन महिन्यांपूर्वीच अमेरिकेवर शटडाऊनची नामुष्की ओढवली होती. इतिहासातील सर्वांत मोठा शटडाऊन गेल्यावर्षी नोव्हेंबरमध्ये संपला. ◀(वृत्तसंस्था)

### मागण्यांकडे दुर्लक्ष करणे भोवले

शुक्रवारी सिनेटने गृह सुरक्षा विभागातील कर्मचाऱ्यांच्या पगारासाठी एक खर्च विधेयक मंजूर केले. अलिकडच्या काळात डेमोक्रॅट्सनी इमिग्रेशन अंमलबजावणीत बदल करण्याची मागणी केली होती. सरकारने मागण्यांकडे दुर्लक्ष केल्यास निधी विधेयकाला पाठिंबा देणार नसल्याचा इशारा दिला होता. शटडाऊनमुळे सरकारी सेवांमध्ये व्यत्यय आल्याने काही विभागाचे थांबले आहे. पर्यायाने सरकारी कर्मचाऱ्यांना पगाराशिवाय सुटीवर पाठवण्यात आले. सुरक्षा संस्थेशी संबंधित कर्मचारी मात्र कामावर आहते. ■

## चित्रपट वार्ता

### ‘बॉर्डर-२’ने कमावले २३० कोटींपेक्षा जास्त

**मुंबई** : सनी देओलच्या ‘बॉर्डर-२’ चित्रपटाने अवघ्या आठ दिवसांत २३० कोटी रुपयांपेक्षा जास्त कमाई केली. चित्रपटाने एका आठवड्यात जगभरात ३०० कोटींचा टप्पा ओलांडला. ‘बॉर्डर-२’ने आठव्या दिवशी म्हणजेच दुसऱ्या शुक्रवारी भारतात ११ कोटी रुपयांची कमाई केली. अशा प्रकारे भारतात चित्रपटाची एकूण निव्वळ कमाई २३५.२५ कोटी रुपये झाली आहे. जगभरातील कलेक्शनबद्दल बोलायचे झाल्यास, भारतातून एकूण कमाई २८१.५ कोटी रुपये आहे. विदेशातून चित्रपटाने सुमारे ४१ कोटी रुपये कमावले आहेत. अशा प्रकारे एकूण जगभरातील कलेक्शन ३२२.५ कोटी रुपयांपर्यंत पोहोचले आहे. ■



### आलियाला करायचेय् समाज माध्यम खाते डिलीट

**मुंबई** : एका मुलाखतीत आलिया भट्टने समाज माध्यम खाते डिलीट करायचे आहे, असे सांगितले. असे अनेक दिवस असतात जेव्हा उठून विचार करते की, बस समाज माध्यम खाते डिलीट करून केवळ अभिनय करावा. वारंवार या चर्चेचा भाग बनू इच्छित नाही, पण हे देखील माहीत आहे की, असे केल्याने ज्या लोकांनी सुरुवातीपासून मला साथ दिली आहे, त्यांच्याशी संपर्क तुटून जाईल. मला असे नको आहे, असे ती म्हणाली. माहितीनुसार, आलिया भट्ट ही देशातील सर्वाधिक फॉलो केल्या जाणाऱ्या अभिनेत्रींपैकी एक आहे आणि इन्स्टाग्रामवर तिचे ८५ दशलक्षाहून अधिक फॉलोअर्स आहेत. ■



### ‘वाराणसी’च्या प्रदर्शनाची तारीख जाहीर

**मुंबई** : एस. एस. राजामौली यांचा ‘वाराणसी’ हा चित्रपट एक महाकाव्य चित्रपट असणार आहे. यामध्ये महेश बाबू एका जगप्रवासी व्यक्तीची भूमिका साकारणार आहेत. ‘वाराणसी’ हा चित्रपट ‘उगादी’ या तेलुगू लोकांच्या सणाच्या दिवशी म्हणजेच ७ एप्रिल २०२७ ला प्रदर्शित होणार आहे. राजामौली यांनी त्यांच्या चित्रपटाचे नवीन पोस्टर शेअर करून प्रदर्शनाची तारीख जाहीर केली. या चित्रपटाचे बजेट १३०० करोड रुपये असणार आहे. या चित्रपटात तेलगू सुपरस्टार महेश बाबू, ग्लोबल स्टार प्रियांका चोप्रा आणि मल्याळम् स्टार पृथ्वीराज सुकुमारन काम करीत आहेत. ■




### इराणी अणुस्थळांवर हालचाली वाढल्या

**अमेरिकेकडून उपग्रह प्रतिमा प्रसारित**

◆ **तेहरान, ३१ जानेवारी**

इराणमधील सरकारविरोधी निदर्शने आणि अमेरिकेसोबत वाढत्या तणावादरम्यान, काही उपग्रह प्रतिमांमुळे तणाव आणखी वाढला आहे. या प्रतिमांमध्ये दोन इराणी अणुस्थळांवर सुरू असलेल्या हालचाली दिसून येत असल्याचे अमेरिकेच्या लष्कराने समाज माध्यमावरील पोस्टमध्ये म्हटले आहे.

जूनमध्ये इस्रायलशी झालेल्या १२ दिवसांच्या युद्धादरम्यान अमेरिकेच्या हल्ल्यात दोन्ही अणुस्थळे नष्ट झाली होती. त्याचवेळी इराणने अणुकार्यक्रमाबद्दल कोणतीही माहिती सार्वजनिक केलेली नव्हती. अशातच उग्रहांच्या प्रतिमांमुळे हल्ला झाल्यास इराण अण्वस्त्राचा वापर करू शकते अशी शंका आहे. उपग्रह प्रतिमांत फोर्डो आणि नतान्झ अणुस्थळांच्या ठिकाणी ढिगाऱ्यांवर छप्पर बांधले जात आहेत. हल्ल्याचा परिणाम युरेनियम साठ्यांवर होऊ नये यासाठी त्यांना जमिनीत खोलवर गाडले जात असावे, अशी शक्यता अमेरिकेच्या लष्कराने व्यक्त केली.

दरम्यान, पेंटागॉनने विध्वंसक, बॉम्बर आणि लढाऊ विमानांसह अमेरिकन अब्राहम लिंकन विमानवाहू जहाज इराणजवळ तैनात केले आहे. ◀(वृत्तसंस्था)



जम्मू-काश्मिरात कडाक्याची थंडी पडली आहे. या पृष्ठभूमीवर शनिवारी सकाळी भाजीबाजारात एक वृद्ध पारंपरिक ‘कांगडी’चा वापर करून ऊब घेताना. कांगडी ही एक प्रकारची शेगडीच असते

# अमेरिकी नागरिकांनी बांगलादेशचा प्रवास टाळवा

**ट्रम्प प्रशासनाचे दिशानिर्देश**

◆ **वॉशिंग्टन, ३१ जानेवारी**

बांगलादेशात फेब्रुवारी महिन्यात होणाऱ्या सार्वत्रिक निवडणुकांदरम्यान हिंसाचाराच्या शक्यता व्यक्त करीत अमेरिकेच्या परराष्ट्र मंत्रालयाने नागरिकांना बांगलादेशचा प्रवास टाळण्याचे निर्देश दिले आहे.

ढाका येथील अमेरिकन दूतावासाने अमेरिकन नागरिकांना सतर्क राहण्याचा संदेश दिला. अमेरिकन नागरिकांसाठी सात कलमी मार्गदर्शक तत्त्वेही जारी करण्यात आली. यामध्ये निवडणुकीपूर्वी आणि निवडणुकीदरम्यान घ्यावयाच्या खबरदारीसंदर्भातील सूचनांचा समावेश आहे. निवडणुकीदरम्यान हिंसा होण्याची शक्यता असल्याने पुढील सूचना मिळेपर्यंत नागरिकांनी बांगलादेशचा प्रवास टाळावा, असे परराष्ट्र मंत्रालयाने म्हटले आहे. काही गट धार्मिक स्थळांना लक्ष्य करू शकतात. या बाबी लक्षात घेता, बांगलादेशातील अमेरिकन नागरिकांनी सतर्क राहावे. ◀(वृत्तसंस्था)

# जगभर कर्जासाठी झोळी पसरताना लाज वाटते

**पाकिस्तानच्या पंतप्रधानांची कबुली**

**आर्थिक संकटामुळे अपमान सहन करावा लागतो**

◆ **इस्लामाबाद, ३१ जानेवारी**

पाकिस्तानला अनेक देशांसमोर कर्जासाठी पदर पसरावा लागला असून, आर्थिक हतबलतेमुळे स्वाभिमान विसरून अपमान सहन करावा लागत आहे. आम्ही कोणकोणत्या देशांकडे जाऊन कर्जासाठी विनंती केली, हे मी तुम्हाला शब्दांत सांगू शकत नाही. त्या देशांनी आम्हाला कधी निराश केले नाही, हे खरे असले तरी कर्ज घेणाऱ्याची मान नेहमी झुकलेली असते, हेच कटू सत्य असल्याची जाहीर कबुली पाकिस्तानचे पंतप्रधान शाहबाज शरीफ यांनी दिली.



इस्लामाबाद येथे उद्योजकांना संबोधित करताना शरीफ म्हणाले, कर्ज मिळविण्यासाठी भिकाऱ्यासारखी झोळी पसरावी लागत आहे. देशातील आर्थिक संकटामुळे आम्हाला मान्य नसलेल्या जाचक अटी स्वीकाराव्या लागल्या. या अटींचे ओझे पेलणे अनेकदा अशक्य होऊन बसते.

आंतरराष्ट्रीय नाणेनिधी अर्थात् आयएमएफकडून अब्जावधी डॉलर्सची मदत मिळावी यासाठी अनेक अधिकाऱ्यांसह विविध देशांचे दौरे केले. कर्जासाठी गळ घातली, काही देशांनी आम्हाला अपमानित केले. मात्र, देशासाठी आम्हाला तिरस्कार सहन करावा लागत आहे. पाकिस्तान गेल्या अनेक वर्षांपासून कर्जावरच अवलंबून आहे. यावेळी आयएमएफने कर्ज देताना अत्यंत कडक अटी लादल्या. त्याचा थेट फटका सर्वसामान्य जनतेला बसत आहे. ◀(वृत्तसंस्था)

### विदेशात जाऊन कर्ज मागावे लागले

देशाच्या बिकट आर्थिक परिस्थितीमुळे वारंवार विदेशात जाऊन कर्ज मागावे लागले. मी तुम्हाला स्पष्टपणे सांगू इच्छितो की, जेव्हा फील्ड मार्शल असीम मुनीर आणि मी जगभरात पैसे मागायला जातो, तेव्हा आम्हाला लाज वाटते. कर्ज घेणे हे आमच्या आत्मसन्मानावर खूप मोठे ओझे आहे. यातून मार्ग काढण्यासाठी आता पर्यायी आर्थिक मार्ग शोधण्याची गरज आहे.

### मूलभूत गरजांसाठीही संघर्ष करावा लागतो

जनतेला पीठ-डाळीसारख्या मूलभूत गरजांसाठीही संघर्ष करावा लागत आहे, याची जाणीव असली तरी, आम्ही हतबल आहे. पाकिस्तानवरील विदेशी कर्जाचा बोजा ५२.३६६ अब्ज डॉलर्स इतका झाला आहे. डिसेंबरपर्यंत विदेशी चलन साठा २० अब्ज डॉलर्सच्या विक्रमी पातळीवर पोहोचला.

# महाराष्ट्राच्या चित्ररथाला पुरस्कार प्रदान

**प्रजासत्ताक दिनाच्या परेडमध्ये पटकावला पहिला क्रमांक**

◆ **नवी दिल्ली, ३० जानेवारी**

प्रजासत्ताक दिन २०२६ च्या निमित्ताने कर्तव्यपथावर महाराष्ट्राच्या संस्कृतीचे आणि परंपरेचे दिमाखदार दर्शन घडवणाऱ्या ‘गणेशोत्सव: आत्मनिर्भरतेचे प्रतीक’ या चित्ररथाला केंद्र सरकारचा प्रथम क्रमांकाचा मानाचा पुरस्कार केंद्रीय संरक्षण राज्यमंत्री संजय शेठ यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

राज्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार यांच्या मार्गदर्शनाखाली आणि संकल्पनेतून साकारलेल्या या चित्ररथाने कल्पक सादरीकरणातून संपूर्ण देशाचे लक्ष वेधून घेतले. नवी दिल्लीतील राष्ट्रीय रंगशाळा कॅम्पमध्ये संरक्षण मंत्रालयाच्या वतीने आयोजित विशेष समारंभात राज्याच्या वतीने सांस्कृतिक कार्य विभागाचे सहायक संचालक श्रीराम पांडे, कार्यक्रमाधिकारी निलेश धुमाळ आणि चित्ररथ साकारणारे मुख्य कलाकार तुषार प्रधान, रोशन इंगोले, कृष्णा सालवटकर, श्रीपाद भोंगाडे, चंद्रकांत पाटील व पंकज इंगळे यांनी हा करंडक आणि सन्मानपत्र स्वीकारले. यंदाच्या प्रजासत्ताक दिन संचलनात देशभरातील १७ राज्ये आणि १३ केंद्र सरकारच्या विभागांचे असे एकूण ३० चित्ररथ सहभागी झाले होते. यामध्ये ‘वंदे मातरम्’ आणि ‘आत्मनिर्भर भारत’ ही मुख्य संकल्पना ठेवण्यात आली होती. या चुरशीच्या स्पर्धेत महाराष्ट्राने आपल्या कल्पक सादरीकरणाने तज्ज्ञ समिती आणि लोकपसंती अशा दोन्ही स्तरांवर बाजी मारली. या स्पर्धेत जम्मू-काश्मीरच्या चित्ररथाला द्वितीय, तर केरळच्या चित्ररथाला तृतीय क्रमांकाचा पुरस्कार मिळाला.

सादरीकरणातील नावीन्य, सामाजिक संदेश आणि दृश्यात्मक आकर्षण या सर्व निकषांवर महाराष्ट्राचा चित्ररथ देशात सर्वोत्कृष्ट ठरला आहे. या विजयात सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे संचालक विभीषण चवरे यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरली. चित्ररथाची मूळ संकल्पना आणि संचलनादरम्यान सादर करण्यात आलेले श्री गणेशाचे गाणे विभीषण चवरे यांनी स्वतः तयार केले होते. त्यांच्या कल्पकतेतून उतरलेले हे गीत आणि चित्ररथाची मांडणी यामुळे महाराष्ट्राच्या सादरीकरणाला एक वेगळी उंची प्राप्त झाली. ◀(वृत्तसंस्था)




### आर्थिक, समाजिक सक्षमीकरणावर आधारित रथ

महाराष्ट्राच्या चित्ररथाचा विषय केवळ धार्मिक नसून, तो आर्थिक आणि सामाजिक सक्षमीकरणावर आधारित होता. लोकमान्य टिळकांनी सुरू केलेल्या सार्वजनिक गणेशोत्सवातून झालेली समाजजागृती, अष्टविनायकांच्या विलोभनीय प्रतिकृती आणि शाडूच्या मातीपासून तयार होणाऱ्या पर्यावरणपूरक मूर्तींच्या माध्यमातून निर्माण होणारी नवी अर्थव्यवस्था या चित्ररथात प्रभावीपणे दाखवण्यात आली होती. ■

रोखठोक

दिनेश गुणे

# राजकारण कधी थांबत नाही

राजकारण हे काळासारखे असते. काळ कोणासाठी कधी थांबत नाही असे म्हणतात. राजकारणही तसेच असते. ते कोणासाठी कधी थांबत नाही. 'याल तर बरोबर, नाही तर तुम्हाला सोडून, तुमच्याशिवाय' असा खाक्या असलेले राजकारणही कधी थांबत नाही. ते काळासारखे पुढेच जात असते. त्यामुळे, राजकारणात वावरणाऱ्या प्रत्येकाला एक गोष्ट कायम लक्षात ठेवावी लागते. राजकारणाचे बोट धरून पुढे चालायचे आणि ते बोट सुटू द्यायचे नाही, याचे भान प्रत्येकास जपावे लागते. एकदा ते बोट सुटले, की त्याला पुन्हा पुढे जाऊन राजकारण गाठता येत नाही. म्हणूनच, राजकारण अनाकलनीय असते, असेही म्हणतात. त्याला संवेदना नसतात, असेही दिसून येते. त्याच्याविषयी अनेक प्रवाद, चर्चा, समजुती, अफवा वगैरे आहेतच! थोडक्यात, राजकारण हे हत्ती आणि चार आंधळे या गोष्टीसारखे असते. राजकारणाबाबत ज्याचा जसा अनुभव, तसे ते त्यास दिसते आणि ते तसेच असते असा त्याचा ठाम विश्वास असतो. काहींना ते वाळूसारखे दिसते. ही वाळू मुठीत पकडली, तरी निसटून जाण्याचा प्रयत्न करत असते. काहींना ते पायाखालच्या वाळूसारखे भासते. त्यावर स्थिर उभे राहणे ही मोठी कसरत असते. पायाखालची वाळू सरकू नये यासाठी ती कसरत करणे भागच पडते, तसेच राजकारणातही करावे लागते. काहींना राजकारण म्हणजे घोडेस्वारी वाटते. घोड्यावर पक्की मांड ठोकता आली नाही, तर अवखळ घोडा पाठीवरल्या स्वाराला झुगारून देतो आणि स्वैर उधळतो. तसेच राजकारणात ज्याला पक्की मांड ठोकता आली नाही, तो जायबंदीदेखील होऊ शकतो. काहींच्या बाबतीत, राजकारण म्हणजे अळवावरच्या पाण्यासारखे असते. समोर असेपर्यंत अळवावरच्या पाण्याचा थेंब मोत्यासारखा चकाकत भुरळ घालतो, म्हणून तो बोटात पकडण्याचा मोह अनावर होऊन हात घालावा, तर अचानक गळून जमिनीवर पडतो व बघता बघता मातीत मुरूनही जातो. काहींच्या बाबतीत राजकारण हे सट्ट्यासारखे असते. नशिबाने साथ दिली, तर अचानक लॉटरी लागते आणि बघता बघता रंकाचा राव होऊन जातो, तर अनेक जण रावाचे रंकदेखील होऊन जातात. सट्ट्याचा नाद वाईट असतो. त्यामध्ये हार पत्करावी लागली, तर जिद्द जागी होते आणि गमावलेले सारे काही पुन्हा मिळविण्याच्या ईर्ष्येने पुन्हा पुन्हा आपले डाव नव्याने खेळताना आणखीनच काही गमावण्याचीही वेळ येते. जवळचे सारे काही संपल्यानंतरही, सट्टा खेळण्याचे व्यसन स्वस्थ बसू देत नाही. राजकारणातही तसे काही जण दिसतात. काहींना वारसा मिळूनदेखील नशीब साथ देत नाही, तर काहींना मिळालेल्या वारशाची पुण्याई फळाला येत नाही. काही जण या पुण्याईचे तुणतुणे वाजवत राजकारणाच्या वेगासोबत पळण्याचा प्रयत्न करतात आणि काही जणांना दमछाक होऊनही पळणे थांबविताच येत नाही. काही जण ही स्पर्धा मध्येच सोडून देतात, तर काही जणांना राजकारणच स्पर्धेतून बाद करून टाकते. असे कितीतरी जण राजकारणाच्या स्पर्धेतून बाद होऊन गेले आहेत. राजकारणाचा हा हत्ती आपल्या चालीने पुढेच जात असतो, म्हणूनच ते अनेकांना अनाकलनीय वाटत असते. काळ पुढे सरकतो, तसे राजकारणही पुढे सरकत असले, तरी ते घड्याळासारखे असते. घड्याळाचे काटे पुढे सरकत असले, तरी फिरून प्रत्येक ठरावीक काळानंतर तीच वेळ पुन्हा दाखवतात. म्हणून घड्याळाचे काटे मागे फिरवता येत नसतानाही, कालची वेळ पुन्हा येऊ शकते, हे राजकारणाचे वैशिष्ट्य असते. या प्रत्येक अनुभवातून राजकारणात उतरलेला कोणी ना कोणी सातत्याने जातच असतो.

गेल्या काही दशकांतील देशाच्या आणि महाराष्ट्राच्या राजकारणाचे हे सारे रंग अनुभवले आहेत. शोभादर्शक जितक्या वेळा फिरवावा, तेवढ्या वेळा त्यामध्ये आकर्षक चित्ररंग दिसतात. प्रत्येक चित्र नवे, पहिल्याहून वेगळे असते. पण कधीतरी मात्र, एखादे अगोदरचे चित्र पुन्हा उमटते. तसे क्वचितच होत असले, तरी तसे होते. राजकारणातही तसे दिसते. एखादे चित्र नव्याने पाहत असल्यासारखे वाटत असले, तरी तीच चित्रे अगोदर कधीतरी दिसलेली असतात. असा अनुभव प्रत्यक्षातही कधीतरी येतो. एखादी घटना डोळ्यांसमोर घडते, तेव्हा तशीच घटना पूर्वी कधीतरी, प्रत्यक्षात किंवा ऐकिवात घडल्याची जाणीव होते आणि हे सारे आपण अनुभवलेले आहे, हेही जाणवते. गेल्या काही दिवसांत राजकारणात घडत गेलेल्या घडामोडी पाहता, असेच काहीसे अनुभवास येऊ लागले आहे. ते अनाकलनीय असले, तरी तसे घडणे नवे नाही. राजकारण कोणासाठी थांबत नसले, तरी एखाद्याचे बोट सुटल्यानंतर दुसरे कोणीतरी ते बोट पकडून राजकारणासोबत पुढे चालत राहतो. राजकारणाच्या अलिकडच्या इतिहासात तसे अनेकदा घडले आहे. काही वेळा, राजकारणाचे बोट रिकामे राहू नये यासाठी त्यासोबत धावणारे अनेक जण अन्य कोणास बरोबर घेतात आणि सामुदायिकरीत्या राजकारणासोबत पुढची वाटचाल सुरू होते. नव्याने राजकारणाचे बोट धरणारा कधीतरी पुढच्या वाटचालीत अडखळतो. त्याला अशा वाटचालीची सवयही नसते. तो भांबावतो. तसे होणे अनपेक्षित नसते. उलट, तसाच नवखा कोणी पुढच्या वाटचालीत सोबत आला, तर अनेकांस आनंदही होतो. तो अर्ध्यावर बोट सोडेल, थकेल, पुढची वाट चालण्याआधीच थांबेल आणि पुन्हा कोणी नवखा नवे बोट पकडून सोबत येईल, अशा अपेक्षेने पुढची वाटचाल सुरू होते. प्रत्यक्षात मात्र, राजकारणाच्या पुढच्या चालीमध्ये असे सहसा होत नाही. एखादे बोट सुटलेच, तर ते बोट पकडून पुढे वाटचाल करणारा गडी नव्या दमाचा असेल, तर त्याची वाटचाल अधिक दमदारही होते आणि ज्या अपेक्षेने त्याला सोबत घेण्याची धडपड होते, तोच धोबीपछाडही देतो, याची जाणीव ठेवावी लागते. गेल्या काही दशकांत असे घडले आहे. हा इतिहास फार जुना नाही. तो विस्मरणातही गेलेला नाही. तो आठवणींच्या कप्प्यात घट्ट रुतून राहिलेला आहे. फक्त तो वारंवार समोर येत नाही. जेव्हा समोर येतो, तेव्हा त्याला घासूनपुसून स्वच्छ करावे लागते.



महाराष्ट्राच्या अलिकडच्या घडामोडी पाहता, राजकारणातील आठवणींचा तो कप्पा पुन्हा उघडला जात असल्याचे दिसते. राज्याच्या विधिमंडळाचे अर्थसंकल्पीय अधिवेशन येत्या १८ तारखेपासून सुरू होत आहे. राज्याचा नवा अर्थसंकल्प या अधिवेशनात मांडला जाईल. देवेंद्र फडणवीस सरकारमध्ये अर्थमंत्री असलेले राष्ट्रवादी काँग्रेसचे अजितदादा पवार यांच्या दुर्दैवी अपघाती निधनामुळे अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या तोंडावर रिक्त झालेल्या पदामुळे राजकारणातील घडामोडींच्या इतिहासाचे ते जुने रंग नव्याने दिसू लागले आहेत. अजितदादांचे निधन हा पवार कुटुंबावरील मोठा आघात आहे. महाराष्ट्रालाही तो अनपेक्षित धक्का आहे. या धक्क्यातून सावरण्याआधीच त्यांच्या रिक्त पदावरील नव्या नियुक्तीची चर्चा सुरू झाली. ते साहजिकही होते. कारण राजकारण कधी कोणासाठी थांबत नसते. अजितदादांचे बोट सुटल्यावर ते बोट धरणारे नवा हात लगेचच येणार हे गृहीतच होते. आता नव्या राजकारणाची सुरुवात झाली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसकडे असलेल्या उपमुख्यमंत्रिपदावर अजितदादांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांचा शपथविधी होऊन राजकारणाची पुढची वाटचाल सुरू झाली आहे. गेल्या जेमतेम चार दिवसांतील या घडामोडी भावनिकदृष्ट्या काहीशा असंवेदनशील वाटत असल्या, तरी राजकारणात संवेदनशीलतेपेक्षा व्यवहार्यतेला अधिक महत्त्व असते. सरकारमधील रिक्त पदावर सुनेत्रा पवार यांची नियुक्ती होणार हे स्पष्ट झाल्यानंतर समाजात काही नापसंतीचे सूर उमटले. निधनानंतर दोन-तीन दिवसांतच नव्या राजकीय रणनीतीला वेग आला. अजितदादांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेस आणि शरद पवार यांचा गट यांच्यात याच दरम्यान विलीनीकरणाची चर्चा सुरू असल्याच्या बातम्या सुरू झाल्या होत्या. येत्या १२ फेब्रुवारीस विलीनीकरणाची प्रक्रिया पूर्ण करण्याचे ठरले होते, असे शरद पवार गटातील नेत्यांचे म्हणणे होते. सुनेत्रा पवार यांनी उपमुख्यमंत्रिपद स्वीकारण्यास संमती दिल्याने, शरद पवार गट आणि राष्ट्रवादी काँग्रेस यांच्या विलीनीकरणाची प्रक्रिया थांबल्याचे मानले जात आहे. या प्रक्रियेस खीळ बसल्याने, शरद पवार यांच्या गटास राजकीय शह मिळाल्याचीही चर्चा होत आहे. कदाचित त्यामुळेच, अजित पवार यांच्या निधनानंतर रिक्त झालेल्या मंत्रिपदावरील नियुक्तीचा निर्णय तातडीने झाल्याचे दुःख व्यक्त होत असावे. राजकारण कोणासाठी थांबत नसते, हा इतिहासाचा दाखला पुन्हा एकदा सिद्ध झाला आहे. राजकारणाच्या वेगासोबत धावणे जमले नाही, तर ज्याने राजकारणाचे बोट अगोदर पकडले, त्याला सोबत घेऊनच ते पुढे चालत असते, हे पुन्हा एकदा स्पष्ट झाले आहे. अजितदादांच्या निधनाचा आघात असह्य आहे, हे खरेच आहे. त्यांच्या निधनामुळे राजकारणाचे आडाखेही बदलले आहेत, समीकरणे बिघडली आहेत, हेही खरे आहे. पण नव्या समीकरणांची मांडणी करून त्याप्रमाणे राजकारणाची दिशा ठरविणे हे एक कौशल्य असते. त्याचीही पुन्हा एकदा प्रचीती आल्याने, इतिहासातील दाखले पुन्हा एकदा लख्खपणे समोर आले आहेत.

अजित पवार यांच्या निधनानंतर काही तास उलटण्याआधीच नव्या उपमुख्यमंत्र्याच्या नावाची चर्चा सुरू झाल्यावर, अनेकांनी नापसंती व्यक्त केली. सत्तेच्या राजकारणातील एखादा बिनीचा मोहरा अनपेक्षितपणे काळाच्या पडद्याआड गेला, तर त्यामुळे निर्माण होणारी पोकळी फार काळ तशीच ठेवता येत नाही. ती लवकरात लवकर भरून काढली गेली नाही, तर अनागोंदी माजण्याचीच शक्यता अधिक असते, हेही काही जुन्या घडामोडींवरून स्पष्ट झाले आहे. कारण राजकारण हा अत्यंत गतिमान खेळ असतो. भावनेला यामध्ये महत्त्वाचे स्थान नसते. या खेळाच्या गतीसोबत जुळवून घेता आले नाही, तर मागे पडावेच लागते. गेल्या शतकात, ३१ ऑक्टोबर १९८४ या दिवशी सकाळी देशावर असाच एक अनपेक्षित आघात झाला होता. त्या दिवशी सकाळी साडेनऊच्या सुमारास पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्यावर त्यांच्या सुरक्षा पथकातील मारेकऱ्यांनी गोळ्या झाडल्या. त्यांना गंभीर अवस्थेत तातडीने एम्स इस्पितळात हलविण्यात आले, पण दुपारी अडीचच्या सुमारास त्यांच्या निधनाची वार्ता अधिकृतपणे घोषित केली गेली. लगेचच काँग्रेस कार्यकारिणीची तातडीची बैठक झाली आणि त्याच दिवशी संध्याकाळी पावणेसात वाजता, इंदिरा गांधी यांचे पुत्र राजीव गांधी यांनी पंतप्रधानपदाची शपथ घेतली. आईचा देह शवागारात असताना, तोवर राजकारणापासून दूरच राहिलेल्या पोटच्या मुलास या अवघड जबाबदारीचा भार शिरावर घ्यावा लागला. इंदिरा गांधींच्या निधनानंतर, तीन दिवसांनी त्यांच्या पार्थिवावर पंतप्रधान राजीव गांधी यांनी अन्त्यसंस्कार केला. आजच मृत्यू झाला, त्यांचा अन्त्यसंस्कारही झाला नाही, लगेच नेतृत्वाच्या चर्चा कशाला, वगैरे चर्चांना तेथे स्थान नव्हते. राजकारणाच्या इतिहासातील अशा घटनांमध्ये, सत्तेच्या केंद्रस्थानी असलेल्या प्रभावशाली नेत्याच्या अनपेक्षित निधनामुळे राजकारणाची दिशा पूर्णपणे बदलली आहे.

अशा घटनांमुळे केवळ नेतृत्वच बदलले नाही, तर अनेकदा नवी धोरणे, नवी समीकरणे आणि नव्या राजकारणाला जन्म दिला आहे. इंदिरा गांधी यांच्या निधनाआधी १९६६ मध्ये पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांनी ताश्कंदमध्ये करारावर स्वाक्षऱ्या केल्याची बातमी देशात पोहोचली आणि पाठोपाठ त्यांच्या आकस्मिक निधनाच्या बातमीने देश हादरला. त्यांच्या निधनामुळे काँग्रेसमध्ये नेतृत्वाचा मोठा पेच निर्माण झाला आणि इंदिरा गांधींच्या नेतृत्वाचा उदय झाला. पण यामुळेच काँग्रेसमध्ये संघर्ष सुरू झाला. जुने नेते आणि तरुण पिढीमध्ये धुमसलेल्या वादातून १९६९ मध्ये काँग्रेस दुभंगली. राजीव गांधींच्या हत्यनेनंतरही देशाच्या आणि काँग्रेसच्या राजकारणाला अशीच कलाटणी मिळाली. निवडणुकीच्या तोंडावर घडलेल्या या दुर्दैवी घटनेमुळे निकालाचे पारडे फिरले आणि पी. व्ही. नरसिंह राव यांच्या नेतृत्वाखालील सरकार स्थापन झाले. या घडामोडीनंतर देशाच्या राजकारणाचा चेहरामोहरा बदलला. गांधी-नेहरूंच्या प्रतिमेपलीकडील काँग्रेसच्या उदयाचा प्रारंभ झाला. राजकारण कोणासाठी थांबत नाही, हे पुन्हा स्पष्ट झाले.

अशा अनेक घडामोडींनी भारताचे राजकारण रंगलेले आहे. आंध्र प्रदेशात २००९ मध्ये वाय. एस. राजशेखर रेड्डी यांचे, मुख्यमंत्री असताना हेलिकॉप्टर अपघातात निधन झाले आणि आंध्र प्रदेशात राजकीय अस्थिरता जागली. तेलंगणा राज्यनिर्मितीच्या हालचालींना त्यातूनच वेग आला आणि आंध्र प्रदेशाचेच विभाजन झाले. वायएसआर यांचे पुत्र जगनमोहन रेड्डी यांनी काँग्रेस सोडून स्वतःचा पक्ष स्थापन केला. तामिळनाडूत जयललिता यांच्या निधनानंतरही तेथील राजकारण असेच अनपेक्षितपणे बदलले. त्यांच्या अखिल भारतीय अण्णाद्रमुक पक्षात मोठी फूट पडली आणि तामिळनाडूच्या राजकारणातील एक 'बलाढ्य पर्व' संपुष्टात आले. ही पोकळी भरून काढण्यासाठी भाजप आणि इतर राजकीय पक्षांना वाव मिळाला.

राजकारणातील एखाद्या व्यक्तीचे जाणे हा केवळ एखाद्या कुटुंबावरील आघात असतोच, पण राजकारणाच्या दृष्टीने राजकीय व्यवस्थेचाच तो एक टर्निंग पॉईंटदेखील ठरतो. इतिहासातील अशा घडामोडींमुळे पक्ष फुटले, नवी समीकरणे तयार झाली, नवे नेतृत्व निर्माण झाले आणि सामाजिक स्तरावरही काही उलथापालथ झाली. शास्त्रीजींच्या निधनानंतर, राजकारणातील साधेपणा हरवल्याची सामाजिक भावना होती. त्यांनी दिलेला 'जय जवान जय किसान' हा नारा पुढे हरित क्रांतीचा प्रणेता ठरला आणि हरित क्रांती यशस्वी करण्याची प्रेरणा शेतकऱ्यामध्ये रुजली. इंदिरा गांधींच्या पदग्रहणानंतर देशाने स्त्री नेतृत्वाचा स्वीकार केला आणि भारतीय स्त्रियांच्या मानसिकतेत आत्मविश्वास रुजत गेला. महिलांच्या कर्तृत्व आणि नेतृत्वशैलीवर मान्यतेची मोहर उमटली. राजीव गांधींच्या निधनानंतर मध्यमवर्गात मोठी स्थित्यंतरे घडताना दिसू लागली. समाज एका परिवर्तनाच्या उंबरठ्यावर दाखल झाला. महाराष्ट्राच्या राजकारणातही, सामाजिक आणि राजकीय घडी बदलून टाकणाऱ्या अशा अनेक घडामोडी घडल्या आहेत. घराणेशाहीचा उदय, प्रस्थापित कौटुंबिक राजकारणापासून दूर गेलेले सत्ताप्रवाह, जातीय ध्रुवीकरणे, असे काही बदल महाराष्ट्राने अनुभवले आहेत. राजकारण कोणासाठी थांबत नाही, ते प्रवाही असते, हेच त्याचे कारण आहे.

dineshgune@gmail.com

रविवारची पत्रे

## कित्तूरची राणी चेन्नम्मा स्मृतिदिन



इंग्रजांनी आपल्या देशावर दीडशे वर्षांपेक्षा जास्त राज्य केले. या काळात त्यांनी आपल्यावर अनेक अन्याय, अत्याचार केले. इंग्रजांच्या अत्याचाराच्या विरोधात लाखो ज्ञात-अज्ञात देशभक्तांनी लढा दिला. त्यात काही रणरागिणीही होत्या. बऱ्याच महिला स्वातंत्र्य सैनिकांची किंवा देशासाठी प्राणाची आहुती देणाऱ्या महिलांची इतिहासकारांनी नोंदच ठेवली नाही. काही बोटावर मोजण्या इतक्याच वीरांगना आपल्याला माहीत आहेत. त्यापैकी एक स्वातंत्र्य सेनानी म्हणजे कित्तूरची राणी चेन्नम्मा. राणी चेन्नम्मांचा जन्म कर्नाटकातील बेळगाव जिल्ह्यातील काकती किल्ल्यावर २३ ऑक्टोबर १७७८ मध्ये झाला. ती अतिशय सुंदर होती. राणी चेन्नम्मा बालपणापासूनच घोडेस्वारी, तलवारबाजी, भालाफेक अशा युद्धशास्त्रांत निपुण होत्या. वयाच्या पंधराव्या वर्षी त्यांचा विवाह कित्तूरचे राजे मल्लराज यांच्याशी झाला. कित्तूरची राणी चेन्नम्मा भारताची शूर स्वातंत्र्य सेनानी होती. राणी लक्ष्मीबाईच्या नेतृत्वाखाली १८५७ च्या बंडाच्या पूर्वी ३३ वर्ष आधी तिने ब्रिटिश राजवटीला आपल्या शौर्याने आव्हान दिले होते. भारतातील ब्रिटिश जुलमी राजवटीविरुद्ध लढा देणारी ती रणरागिणी पहिली महिला स्वातंत्र्य सेनानी बनली. १८२४ मध्ये पतीचे आणि मुलाचे निधन झाले. त्या दुःखाच्या क्षणी राज्यात अस्थिरता निर्माण झाली. त्याचा लाभ घेण्यासाठी इंग्रजांनी कित्तूरवर आक्रमण केले आणि राज्य वाचवण्यासाठी राणी चेन्नम्माने एक पुत्र दत्तक घेतला.

वारसदार म्हणून दत्तक पुत्राला इंग्रजांनी नकार दिला. दत्तक विधान नाकारत ते राज्य खालसा करून तिथे ब्रिटिश अंमल सुरू करण्याचा निर्णय इंग्रजांनी घेतला होता. इंग्रजांनी कित्तूरचा खजिना लुटण्याचा प्रयत्न केला. मात्र चेन्नम्मा यांनी इंग्रज सैन्याशी निकराचा लढा दिला. आणि इंग्रज सैन्याचा पराभव केला. या विजयाने राणीने आपल्या सैनिकांमध्ये स्फूर्ती निर्माण केली आणि तिचे सैन्य इंग्रजांशी शर्तीने लढले. तिने काही इंग्रज अधिकाऱ्यांना बंदी बनवले आणि युद्धबंदी करण्याच्या अटीवरच या अधिकाऱ्यांची सुटका करण्यात आली. परंतु युद्धबंदीचा करार करून इंग्रजांनी तो पाळला नाही. मात्र बैल होगल किल्ल्यात राणी चेन्नम्मा पकडल्या गेल्या. २ फेब्रुवारी १८२९ मध्ये इंग्रजांच्या कैदेतच राणी चेन्नम्मा यांचे निधन झाले. राणी चेन्नम्माचे शौर्य बघून इंग्रज अधिकाऱ्यांनाही कौतुक वाटले. राणी चेन्नम्मा यांची शौर्यगाथा ही इतिहासातील स्फूर्तिदायक सुवर्ण अध्याय आहे. आजच्या तरुण पिढीला राणीचे हे शौर्य माहीत व्हावे यासाठी त्यांची जयंती व स्मृतिदिन आपण साजरे केले पाहिजेत. अशा या शूर वीरांगनेला कोटी कोटी नमन.

**माधवी पत्की**/नागपूर

●● ●●

## विद्यार्थ्यांमध्ये मूल्ये रुजविण्याची गरज

आजचे युग हे स्पर्धा, तंत्रज्ञान आणि झपाट्याने बदलणाऱ्या जीवनशैलीचे आहे. या प्रवाहात विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होण्यासाठी शैक्षणिक यशाइतकेच मूल्यशिक्षण महत्त्वाचे ठरते. केवळ गुणांची शर्यत जिंकणारे विद्यार्थी घडवणे पुरेसे नसून, संवेदनशील, जबाबदार आणि मूल्यनिष्ठ नागरिक घडवणे ही आजच्या शिक्षणाची खरी गरज आहे.

मूल्य म्हणजे नेमके काय? प्रामाणिकपणा, सहानुभूती, शिस्त, कर्तव्यनिष्ठा, परिश्रम, सहकार्य, सामाजिक बांधिलकी आणि देशप्रेम इत्यादी गुण म्हणजेच मूल्ये. ही मूल्ये पुस्तकी अभ्यासातून शिकवता येतात. मात्र, ती विद्यार्थ्यांच्या वर्तनात उतरवण्यासाठी अनुभव, अनुकरण आणि सकारात्मक वातावरण अधिक प्रभावी ठरते. अनेकदा असे दिसून येते की, विद्यार्थी गुण मिळवण्यात पुढे असतात. परंतु, सामाजिक भान, नैतिकता आणि माणुसकी याबाबतीत ते मागे पडतात. याचे मुख्य कारण म्हणजे शिक्षणपद्धतीत मूल्यशिक्षणाला दिले जाणारे दुय्यम स्थान. परीक्षाकेंद्रित शिक्षणामुळे यश, स्पर्धा आणि स्वार्थ यालाच प्राधान्य दिले जाते. त्यामुळे मूल्यवर्धनासाठी मूल्यांची पायाभरणी शालेय वयातच होणे अत्यावश्यक आहे. शाळा ही केवळ ज्ञानदानाची जागा नसून संस्कारांची प्रयोगशाळा आहे. शिक्षक हे विद्यार्थ्यांचे मार्गदर्शक आणि आदर्श असतात. शिक्षकांचे बोलणे, वागणे, निर्णयक्षमता आणि मूल्यनिष्ठा यांचा विद्यार्थ्यांच्या जडणघडणीवर खोल परिणाम होतो. तेव्हा, शिक्षकांनी स्वतः मूल्यांचा आदर्श घालून देणे हेच खरे मूल्यशिक्षण ठरते.

पालकांची भूमिकाही तितकीच महत्त्वाची आहे. विशेषतः संयुक्त कुटुंब पद्धतीत आजी-आजोबा ही मूल्यसंस्कारांची जिवंत शाळाच असते. त्यांच्या अनुभवातून मिळणारी शहाणपणाची शिकवण, प्रेमळ शिस्त, कथा-कहाण्यांतून दिले जाणारे संस्कार आणि जीवनातील चढउतारांना सामोरे जाण्याची दृष्टी विद्यार्थ्यांच्या भावनिक विकासाला भक्कम आधार देते. पालक, आजी-आजोबा आणि शिक्षकांनी एकत्रितपणे मूल्यसंस्कारांची दिशा ठरवली तर, विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्त्व अधिक समतोल आणि सुदृढ घडते.

मूल्यशिक्षण हे केवळ भाषणापुरते मर्यादित न ठेवता विविध उपक्रमांद्वारे रुजवले पाहिजे. समाजसेवा, श्रमदान, पर्यावरण संवर्धन, राष्ट्रीय सणांचे साजरीकरण, समूहकार्य, वादविवाद, नाट्यप्रयोग यामधून विद्यार्थ्यांमध्ये मूल्यांची जाणीव आणि जबाबदारीची भावना निर्माण होते. मूल्यवर्धन म्हणजे केवळ व्यक्तीचा विकास नव्हे तर, समाज आणि राष्ट्राचाही विकास होय. मूल्यांशिवाय मिळवलेले ज्ञान अपूर्ण असते. म्हणूनच आजच्या शिक्षणव्यवस्थेने 'यशस्वी विद्यार्थी' नव्हे तर, सुसंस्कृत आणि जबाबदार माणूस घडवण्यावर भर देणे काळाची गरज आहे.

**संगीता जितेंद्रसिंह चव्हाण**/८८३०७७३२४२

●● ●●

## परीक्षेविषयी जागरूकता

फेब्रुवारी महिना म्हटलं की दहावी व बारावीच्या परीक्षेचे दिवस. परंतु खरं तर टेन्शन असतं पाल्यांच्या आई-वडिलांना, त्यासोबत विद्यार्थ्यांना देखील. नवीन शैक्षणिक धोरणानुसार शिक्षण क्षेत्रातील आमूलाग्र बदल घडून येत आहे. हा बदल केवळ विद्यार्थ्यांच्या बाबतीत नाही तर शिक्षकांच्या बाबतीत सुद्धा होत आहे. हल्ली विद्यार्थ्यांनी आपले संपूर्ण लक्ष अभ्यासाकडे केंद्रित करण्याची गरज आहे. जी मुले इंजिनीयर, डॉक्टर या प्रवेशाकरिता वेगवेगळे क्लासेस लावतात ते फक्त प्रवेश परीक्षेच्या तयारीकडे लक्ष घालतात. परंतु हे देखील महत्त्वाचे आहे की बारावीच्या परीक्षेमध्ये देखील जवळपास ७५ टक्के गुण प्राप्त करणे महत्त्वाचे ठरते. तेव्हा प्रवेश परीक्षेच्या बरोबरीने देखील बारावीच्या परीक्षेत गुण मिळवणे आवश्यक ठरते. अन्यथा आपला प्रवेश इंजिनीयरिंग किंवा डॉक्टर होण्याकरिता नाकारला जाऊ शकतो. तेव्हा सर्व दहावी व बारावीच्या विद्यार्थ्यांनी मोबाईलच्या आहारी न जाता शिक्षणाकडे लक्ष देणे गरजेचे आहे. ही वेळ आपल्या जीवनाची अत्यंत महत्त्वाची आहे. एक गेलेला क्षण आयुष्यात पुन्हा परत येणार नाही. दहावी व बारावी आपल्या आयुष्यातील टर्निंग पॉईंट मानले जातात. तेव्हा वेळ वाया न घालवता अभ्यासाकडे लक्ष केंद्रित करावे तेव्हा सर्व दहावी व बारावीच्या विद्यार्थ्यांना हार्दिक शुभेच्छा.

**प्रा. प्रशांत पंत**/मूर्तिजापूर

●● ●●

## फूट पाडा, राज्य करा हेच यूजीसीचे धोरण

यूजीसी ही स्वायत्त संस्था आहे आणि डाव्या विचारसरणीचे लोक गेली अनेक दशके या संस्थेत आपले विखारी मनसुबे पूर्ण करत आहेत. ज्याप्रमाणे निवडणूक आयोगात सरकार ढवळाढवळ करू शकत नाही तशीच यूजीसीमधेही करू शकत नाही. गेले अनेक वर्षे डावे पुरोगामी पुढच्या पिढ्या नासवण्यासाठी आणि हिंदूंमध्ये फूट पाडण्यासाठी शिक्षणसंस्थांत आपली इकोसिस्टिम उभारत असताना झोपलेले किंवा झोपेचे सोंग घेतलेले आता कारण नाही हे माहीत असूनही मोदी सरकारला शिव्या शाप देत आहेत आणि नेहेमीप्रमाणेच सुज्ञ (?) सुशिक्षित जनता कसलीही माहिती न काढता या भावनिक जाळ्यात अडकते आहे.

आता कळते आहे केंद्र सरकारने यूजीसी पूर्णपणे बंद करायचा निर्णय घेतलेला आहे आणि पूर्ण सरकारी नियंत्रण असलेली 'विकसित भारत शिक्षा अधिनियम बोर्ड' (व्हीबीएसएबी) नावाची एका नवीन, एकमेव नियामक संस्था तयार केली जात आहे. ही संस्था यूजीसी, एआयसीटीई आणि एनसीटीई यांची कार्ये एकाच छत्राखाली एकत्रित करून उच्च शिक्षणाचे नियमन, मान्यता आणि मानके निश्चित करण्याची प्रक्रिया सुलभ करेल. या संस्थेवर डाव्या पुरोगाम्यांचे नियंत्रण नसणार असल्याने जाता जाता वाट लावून जायची या अतिशय विकृत मानसिकतेने यूजीसीने हा निर्णय घेतलेला होता. सर्वोच्च न्यायालयाने त्यांच्या या विकृत कटाच्या चिंध्या केल्या आहेत आणि मोदी सरकार लवकरच तोडगा काढून हा अन्यायकारी आदेश रद्द करेल.

चान्स पे डान्स बिरादरीला मात्र यानिमित्ताने मोदी सरकार विरोधात नागिनडान्स करायला मिळाला. शेळ्यामेंढ्या हाकल्या जातात त्याहीपेक्षा सहजरीत्या सुज्ञ सुशिक्षित जनता स्वतःचे डोके अजिबात न वापरता हाकली जाते ही फार वेदना देणारी गोष्ट आहे. यावेळी मोदी आणि सरकारवर केवळ टीका होत नाही, तर एक सुनियोजित राजकीय- वैचारिक कट रचला जात आहे, जे कारस्थान आता समजून घेणे आवश्यक झाले आहे. उत्तर प्रदेश आणि देशातील आगामी निवडणुकांपूर्वी एक निश्चित नमुना स्पष्टपणे दिसून येत आहे. सरकारच्या प्रत्येक निर्णयाचा विपर्यास करणे, नरेंद्र मोदींची प्रतिमा सतत संशय, भीती, द्वेषाखाली आणणे आणि देश चुकीच्या दिशेने नेला जात आहे असा भ्रम लोकांच्या मनात निर्माण करणे. यात केवळ विरोधी पक्ष नाही तर देशविरोधी विचार, डाव्या विचारसरणीच्या संस्था, परदेशी निधी, सत्तेबाहेरील स्वार्थी टोळ्या एकत्र काम करत आहे. अशी कट-कारस्थाने लक्षात येतात तेव्हा तेव्हा सरकार राष्ट्रहितासाठी कठोर निर्णय घेते - मग तो दहशतवाद असो, अर्थव्यवस्था असो, संस्कृती असो, कायदा आणि सुव्यवस्था असो किंवा राष्ट्रीय सुरक्षा असो. अशी पावले सरकारने उचलली की अचानक अफवा, खोट्या बातम्या, जातीय विष आणि 'हुकूमशाही'चा आवाज सुरू होतो. हा योगायोग नाही, ही एक रणनीती आहे.

कारण या लोकांना माहीत आहे की, मोदींवर थेट हल्ला केल्यास काम होणार नाही. त्यामुळे संभ्रम पसरवा, विश्वासघात करा आणि समाजाला आपापसात भांडायला लावा हे त्यांचे धोरण आहे. आज आपल्याला सावधगिरी बाळगण्याची आणि प्रश्न विचारण्याची गरज आहे. पण कोणाच्याही अजेंड्याचे साधन बनू नका. तुमच्याकडे सरकारच्या विरोधात तक्रार असल्यास, तर उपाय देखील लोकशाही पद्धतीने असेल, देश कमकुवत करून नाही. लक्षात ठेवा आपल्या एका चुकीमुळे जर राष्ट्र आणि केंद्र सरकार कमकुवत झाले तर इतिहासही सुद्धा आपल्याला माफ करणार नाही.

**रवी वाघमारे**/नागपूर

●● ●●

## विघ्नसंतोषींना चपराक

महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचा विमान अपघातात झालेला मृत्यू अकाली, दुर्दैवी आणि वेदनादायक आहे. मोठ्यांच्या मृत्यूची चर्चा अधिक होणे स्वाभाविक असले तरी अशा दुःखद प्रसंगी काही महाभाग अकलेचे तारे तोडतात. ममता बॅनर्जी, ओमर अब्दुल्ला यांच्यासारख्या नेत्यांनी केलेली विधाने टवाळखोरांनाही लाजवतील अशी आहेत. विमान अपघात होऊन मृत्यू होणे ही बाब नवीन नाही. संजय गांधी, आंध्रचे मुख्यमंत्री असलेले वाय. एस. राजशेखर रेड्डी, अरुणाचलचे मुख्यमंत्री असलेले दोरजी खंडू, सरसेनाध्यक्ष (तिन्ही संरक्षण दलाचे प्रमुख) बिपीन रावत यांचाही मृत्यू विमान अपघातात झाला होता. प्रत्येक विमान अपघातानंतर त्याची चौकशी केली जाते आणि भविष्यात चुकीची पुनरावृत्ती होऊ नये याची दक्षता घेतली जाते. वावड्यांची संख्या वाढल्यावर ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी माध्यमांशी संवाद साधून बारामती येथील विमान अपघात हा अपघातच होता आणि त्यामागे दुसरी कोणतीही शक्यता नाही असे स्पष्ट केले. दुःख भावनांना आवर घालून शरद पवार यांनी वेळीच खुलासा केल्याने शरद पवार यांची परिपक्वता दिसून आली आणि विघ्नसंतोषी तोंडावर आपटले.

**हेमंत पुरुषोत्तम कद्रे**/९४२२२१५३४३

●● ●●

## संत रविदासांची शिकवण

संत रविदास (रोहिदास) जयंती दरवर्षी माघ पौर्णिमेला साजरी केली जाते. संत रविदास यांचा जन्म वाराणसी जवळील गोवर्धनपूर गावात माघ पौर्णिमेच्या पवित्र दिवशी झाला. संत रविदास हे मध्ययुगीन भक्ती चळवळीतील महान संत, कवी आणि समाजसुधारक होते. त्या काळात समाजात खोलवर रुजलेले जातिभेद, विषमता आणि अंधश्रद्धा यांचा त्यांनी विरोध केला. धर्म हा माणसाला माणसाशी जोडण्यासाठी आहे, तोडण्यासाठी नाही, अशी त्यांची शिकवण होती. संत रविदास हे निर्गुण पंथाचे उपासक होते. त्यांनी 'रविदासिया' या पंथाची स्थापना केली. त्यांच्या रचना सामाजिक समता, बंधुता, प्रेम आणि ऐक्याचा संदेश देणाऱ्या होत्या. तसेच त्यांनी रचलेल्या अभंगांच्या माध्यमातून भक्तीची खरी व्याख्या सर्वसामान्यांपर्यंत पोहोचली.

''मन चंगा तो कठौती में गंगा'' ही त्यांची अतिशय प्रसिद्ध आणि अर्थपूर्ण उक्ती आहे. याचा अर्थ असा की, जर मन पवित्र असेल, तर देवाची भक्ती करण्यासाठी गंगा स्नानाची गरज नाही. देवाची भक्ती करण्यासाठी अंतःकरण शुद्ध, पवित्र, निर्मळ असायला हवे. शुद्ध अंतःकरणातच भगवंताचा वास असतो अशी शिकवण देणारे संत रविदास यांच्या चरणी कोटी कोटी नमन!

**प्रिया बागडदेव**/छिंदवाडा

●● ●●

## पहिली महिला अंतराळवीर कल्पना चावला

आज १ फेब्रुवारी, भारतीय वंशाची अमेरिकन अंतराळवीर कल्पना चावला यांचा स्मृतिदिन. २३ वर्षांपूर्वी त्यांच्या कोलंबिया या यानाला पृथ्वीवर परत येत असताना अपघात होऊन त्यात त्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. त्यांच्या सोबत सहा अंतराळवीर देखील होते. त्यांचा देखील या अपघातात दुर्दैवी अंत झाला. कल्पना या अंतराळात जाणाऱ्या भारतीय वंशाच्या पहिल्या महिला अंतराळवीर होत्या. त्यांचा जन्म १७ मार्च १९६२ रोजी हरयाणातील कर्नाल येथे झाला. त्यांच्या



वडिलांचे नाव बनारसीलाल चावला तर आईचे नाव संयोगीता होते. त्यांच्या वडिलांचा औद्योगिक वस्तू निर्मितीचा व्यवसाय होता आणि आई गृहिणी होती. कल्पना चावला यांचे शालेय शिक्षण टागोर बाल निकेतन या विद्यालयात झाले. अभ्यासात हुशार असणाऱ्या कल्पना चावला यांनी १९८२ साली पंजाब विद्यापीठातून एरोनिटीकल अभियांत्रिकी पदवी मिळवली. त्यांनी १९८४ साली अमेरिकेच्या टेक्सास विद्यापीठातून एरोनिटीकल उच्च अभियांत्रिकी शिक्षण पूर्ण करून कोलोरॅडो विद्यापीठातून एरोस्पेस अभियांत्रिकी विभागातून १९८८ साली डॉक्टरेट पदवी प्राप्त केली. त्यांचे अंतराळवीर होण्याचे स्वप्न होते. ते पूर्ण करण्यासाठी त्या नासा या अमेरिकेतील अंतराळ संशोधन संस्थेत दाखल झाल्या. १९८८ मध्ये त्यांनी नासातील एम्स रिसर्च सेंटर ओव्हरसेट मेथडसच्या उपाध्यक्षा म्हणून काम पाहिले. तिथे त्यांनी कॉम्प्युटीशनल फ्ल्यूईड डायनॅमिकमध्ये जागेवरच उभे उड्डाण आणि जमिनीवर उतरणे या विषयांवर संशोधन केले. त्यानंतर त्यांना ग्लायडर्स, सीलपेन्स तसेच एक किंवा अनेक इंजिन असलेली विमाने याच्या व्यावसायिक वैमानिकांना प्रशिक्षण देण्याचा परवाना मिळाला. १९९१ साली त्यांना अमेरिकेचे नागरिकत्व मिळाले. नागरिकत्व मिळाल्यावर त्यांनी १९९५ साली नासामध्ये अस्ट्रोनोट कॉर्प्स होण्यासाठी अर्ज केला. त्यांना त्यासाठी नासाने प्रवेशही दिला. त्यांची मार्च १९९६ मध्ये पहिल्या उड्डाणासाठी निवड झाली. त्यांची पहिली अंतराळ मोहीम १९ नोव्हेंबर १९९७ रोजी आरंभ झाली. त्यांनी अंतराळात १०.६७ दशलक्ष किमी प्रवास केला. हे अंतर २५२ वेळा पृथ्वीला प्रदक्षिणा घालण्याऐवढे होते. कल्पना चावला यांची २००० साली त्यांच्या दुसऱ्या उड्डाणासाठी एसटीएस १०७ साठी देखील निवड झाली परंतु ही मोहीम तांत्रिक अडचणीमुळे लांबली जात होती. त्या १६ जानेवारी २००३ रोजी एसटीएस १०७ मोहिमेसाठी जाण्यासाठी कोलंबिया अंतराळ मोहिमेवर आल्या. या मोहिमेत कल्पना चावला यांना सूक्ष्म गुरुत्वाकर्षणात प्रयोग करणे ज्यामध्ये ते आणि त्यांच्या चमूला ८० प्रयोग करावयाचे होते त्यात पृथ्वी आणि अंतराळ विज्ञान, अद्ययावत तंत्रज्ञान निर्मिती अंतरळवीरांचे आरोग्य आणि सुरक्षा या विषयांचा समावेश होता. आपली मोहीम फत्ते करून १ फेब्रुवारी २००३ रोजी हे अंतराळ यान कोलंबियाच्या टेक्सास येथे पृथ्वीच्या वातावरणात प्रवेश करताना आणि जमिनीवर उतरताना अपघात झाला. या अपघातात कल्पना चावला आणि त्यांच्या चमूचा दुर्दैवी अंत झाला. त्यांच्या मृत्यूनंतर जगभर हळहळ व्यक्त करण्यात आली. त्यांना मरणोत्तर काँग्रेशनल स्पेस सेवा पदक, नासा स्पेस फ्लाईट तसेच नासा विशेष सेवा पदकाने गौरविण्यात आले. जगभरातील विविध विद्यापीठांनी त्यांच्या नावे विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्त्या जाहीर केल्या. ५ फेब्रुवारी २००३ साली भारताच्या पंतप्रधानांनी हवामान विषयीच्या उपग्रहाला कल्पना १ हे नाव दिले. त्यानंतर सोडण्यात आलेल्या उपग्रहालाही कल्पना २ हे नाव देण्यात आले. हरयाणा सरकारने कल्पना चावला यांच्या नावाने ज्योतिसार, कुरुक्षेत्र येथे प्लेनेटेरियम सुरू केले. नासाने सुपर कॉम्प्युटरला कल्पना चावला यांचे नाव दिले. कल्पना चावला यांनी आपल्या धैर्य, चिकाटी, जिद्द आणि बलिदानाने देशाचे नाव उज्ज्वल केले. कल्पना चावला या आज आपल्यात नसल्या तरी त्यांच्या स्मृती आजही आपल्या मनात कायम आहे. त्यांचे कार्य आजच्याच नाही तर येणाऱ्या पिढीसाठीही प्रेरणादायी आहे. पहिल्या महिला अंतराळवीर कल्पना चावला यांना स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!

**श्याम ठाणेदार**/९९२२५४६२९५

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास ९८५०७५३२८१
या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...



### मुख्यमंत्र्यांच्या पत्नीविरोधात चिथावणी देणाऱ्यावर कारवाई करण्याची मागणी

**सोलापूर, दि. ३१ जानेवारी-**

एका सार्वजनिक कार्यक्रमात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेसमोर उभे राहून मुख्यमंत्री यांच्या पत्नीविरोधात अत्यंत अश्लील, अमानुष व बलात्कारास चिथावणी देणारे वक्तव्य करण्यात आले. त्यावर उपस्थितांकडून टाळ्या व पैशांची उधळण करण्यात आली, ही बाब समाजाच्या नैतिक अधःपतनाचे आणि कायदा-सुव्यवस्थेच्या गंभीर उल्लंघनाचे द्योतक आहे. महिलांवरील हिंसाचारास चिथावणी देणाऱ्यावर तात्काळ कारवाई करावी अशी मागणी भारतीय जनता पार्टी, सोलापूर शहर यांच्या वतीने पोलीस आयुक्त यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. यावेळी शहराध्यक्षा रोहिणी तडवळकर, महिला आघाडी अध्यक्षा रंजिता चाकोते, प्रदेश सचिव अर्चना वडनाल, अश्विनी चव्हाण, सुनीता कामठी, ममता कुलकर्णी, मंजिरी अंत्रोळीकर, अंजली मशाळकर व रुपा कुटाटे उपस्थित होत्या.



### दाजी ग्रुपच्या छत्रपती शिवाजी महाराज जन्मोत्सव अध्यक्षपदी चव्हाण

**सोलापूर, दि. ३१ जानेवारी-**

जनसेवा शिवजन्मोत्सव तरुण मंडळ दाजी ग्रुप च्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज जन्मोत्सव २०२६ च्या उत्सव अध्यक्षपदी विनोद चव्हाण यांची निवड करण्यात आली. छत्रपती शिवाजी महाराज चौक येथील भाज्यांना मोठा मध्ये दाजी ग्रुपची बैठक सालाबाद प्रमाणे मंडळाचे आधारस्तंभ राजन जाधव, संस्थापक अक्षय जाधव व विक्रांत जाधव यांच्या उपस्थितीत उत्साही वातावरणात पार पडली. यामध्ये उपाध्यक्षपदी अभिषेक मोरे, प्रथमेश कोरके, सचिव नीरज मोरे, सहसचिव मारुती घाडगे, खजिनदार अरबाज अन्सारी, सहखजिनदार शाश्वत जंगले, कार्याध्यक्ष ओंकार जावळे, सुजल पवार, मिरवणूक प्रमुख अक्षय बनसोडे, रोहन ताकमोगे, लेझीम प्रमुख सागर नागनगिरी, विकी व्यवहारे, रवी कांबळे, प्रसिद्धी प्रमुख आदित्य हांडे, अतिश लोखंडे यांची निवड करण्यात आली.



### जिल्हा विधी सेवा प्राधिकरणतर्फे बालिका दिन साजरा

**सोलापूर, दि. ३१ जानेवारी-**

येणाऱ्या भारताचे भवितव्य घडविणाऱ्या आजच्या बालिकेच्या हातात अभ्यासक्रमासोबत स्वतःच्या शरीराची, आरोग्याची व हक्कांची जाणीव जागृती करून देणे ही काळाची गरज आहे आणि मासिक पाळी नैसर्गिक असून बालविवाह हे अमानवी कृत्य असल्याचे प्रतिपादन लैंगिकता शिक्षण प्रबोधक राहुल बिराजदार यांनी प्रतिपादन केले. राष्ट्रीय बालिका दिनाच्या निमित्ताने महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरणाच्या निर्देशानुसार जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, सोलापूरच्या वतीने छत्रपती शिवाजी प्रशाला येथे आयोजित किशोरवयीन मुलींसाठी मासिक पाळी व्यवस्थापन, किशोरी आरोग्य, पोषक आहार, बालविवाह प्रतिबंध आणि शासकीय योजनांविषयी जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. लोहयुक्त अन्न, हिरव्या पालेभाज्या, डाळी, फळे, दूध आणि पुरेसे पाणी पिण्याचे महत्त्व डॉ. सिद्धी चाकोते यांनी स्पष्ट केले. कार्यक्रमात बेटी बचाओ बेटी पढाओ, सुकन्या समृद्धी योजना, पोषण अभियान, पीएम पोषण योजना यांसारख्या शासकीय योजनांची माहिती देत, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण हे बालिकेच्या पाठीशी उभे आहे, हा विश्वास मुलींमध्ये निर्माण करण्याचा हेतू असून या जनजागृती कार्यक्रमामुळे बालिकांच्या जीवनात आत्मभानाचा प्रकाश आणि भविष्याकडे पाहण्याचा आत्मविश्वास दिसून आल्याचे आणि हाच राष्ट्रीय बालिका दिनाचा खरा अर्थ असल्याचे मत मुख्याध्यापिका तथा कार्यक्रमाच्या अध्यक्षा सुजाता जुगदार यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष तथा प्रमुख जिल्हा न्यायाधीश मनोज शर्मा यांच्या मार्गदर्शनाखाली विधी सेवेच्या कर्मचाऱ्यांनी व प्रशालेच्या शिक्षकांनी परिश्रम घेतले.

# 'भाजपा गटनेते' पदाची माळ नरेंद्र काळे यांच्या गळ्यात

### आगामी रणनीतीविषयी मिळाली दिशा

**तभा, वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३१ जानेवारी-**

सोलापूर महानगरपालिकेतील भारतीय जनता पार्टीच्या गटनेतेपदावर कोणाची वर्णी लागणार याविषयी गेल्या काही दिवसांपासून तर्कवितर्क लढविले जात होते. आजरोजी पुणे येथील विभागीय आयुक्त यांच्यासमोर झालेल्या गटनोंदणीच्या अनुषंगाने नगरसेवक नरेंद्र काळे यांच्या गळ्यात गटनेतेपदाची माळ घालण्यात आली. दरम्यान, भाजपाच्या आगामी रणनीतीला स्पष्ट दिशा मिळाल्याचे राजकीय वर्तुळात बोलले जात आहे.

नुकत्याच झालेल्या सोलापूर महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीत भारतीय जनता पार्टीने घवघवीत यश संपादन करत तब्बल ८७ नगरसेवक निवडून आणले. या यशामुळे 'भाजपा'चे पदाधिकारी, कार्यकर्ते यांचा उत्साह दुणावला गेला. महानगरपालिकेतील सत्ताकारण अधिक मजबूत करण्याच्या दृष्टीने भारतीय जनता पार्टीच्या श्रेष्ठींनी महत्वाचा निर्णय घेतला असल्याचे सांगण्यात येते.

तब्बल नऊ वर्षांनंतर झालेल्या या निवडणुकीत भाजपाने प्रथमच १०२ जागांवर उमेदवार उभे करून पूर्ण ताकदीने निवडणूक लढवली होती. सोलापूरच्या मतदारांनी भाजपवर विश्वास दाखवत ८७ नगरसेवक निवडून दिले, त्यामुळे भाजप महापालिकेतील सर्वात मोठा आणि निर्विवाद बहुमताचा पक्ष ठरला आहे. या निकालानंतर महापालिकेतील सत्ता स्थापनेची सूत्रे 'भाजपा'च्या हातात आली आहेत. गटनेतेपदासाठी मोठी चुरस निर्माण झाली होती. महापौरपदाच्या दृष्टीने हे पद अत्यंत महत्त्वाचे असल्याने अनेक ज्येष्ठ व नवोदित नेत्यांची नावे चर्चेत होती. मात्र, पक्षांतर्गत मतभेद टाळत पालकमंत्री जयकुमार गोरे, भाजपाच्या शहराध्यक्षा रोहिणी तडवळकर, तिन्ही आमदार आणि सर्व नवनिर्वाचित नगरसेवकांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत नरेंद्र काळे यांच्या नावावर शिक्कामोर्तब करण्यात आले.



#### प्रभावी अंकुश, संघटनात्मक बांधणी

नरेंद्र काळे यांनी यापूर्वी महापालिकेत विरोधी पक्षनेते म्हणून प्रशासनावर प्रभावी अंकुश ठेवला होता. अभ्यासू भाषणशैली, ठोस मुद्दे आणि नागरिकांच्या प्रश्नांबाबत आक्रमक भूमिका ही त्यांची ओळख राहिली आहे. भाजप शहराध्यक्ष म्हणूनही त्यांनी संघटनात्मक बांधणी करत पक्षाची ताकद वाढवली. नरेंद्र काळे यांच्या निवडीने भाजपाने अनुभव, संघटन आणि नेतृत्व या तिन्ही बाबींचा समतोल साधण्याचा प्रयत्न केल्याचे स्पष्ट होते.

#### महापालिकेतील हे आहेत विविध पक्षांचे गटनेते

भाजपा : नरेंद्र काळे
एमआयएम : वहिदा शेख
शिंदेसेना : अमोल शिंदे
कॉंग्रेस : चेतन नरोटे
राष्ट्रवादी कॉंग्रेस : वैभव हत्तुरे

# सोलापूर-पुणे महामार्गावर सिमेंट मिक्सर खड्ड्यात पलटी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३१ जानेवारी-**

सोलापूर-पुणे रोडवरील नवीन पुलाच्या कामामुळे परिसरात सुरू असलेल्या खोदकाम दरम्यान पुणे नाका येथील मडकी वस्ती परिसरात सिमेंट मिक्सर वाहन थेट मोठ्या खड्ड्यात पलटी झाले. ही घटना शनिवारी दुपारच्या सुमारास घडली असून, सुदैवाने या अपघातात कोणतीही जीवितहानी झाली नाही. मात्र वाहनाचे मोठे नुकसान झाले असून काही काळ वाहतूक विस्कळीत झाली होती.

पुलाच्या बांधकामासाठी रस्त्याच्या बाजूला खोल खड्डे खोदण्यात आले आहेत. त्याच ठिकाणी सिमेंट मिक्सर वाहन जात असताना अचानक तोल जाऊन वाहन खड्ड्यात उलटले. पलटी झालेल्या वाहनाची चाके पूर्णपणे वरच्या बाजूला झाली होती, त्यामुळे परिसरात एकच खळबळ उडाली.

घटनेची माहिती मिळताच बांधकाम विभागाचे अधिकारी, पोलीस आणि आपत्कालीन यंत्रणा तातडीने घटनास्थळी दाखल झाल्या. वाहन बाहेर काढण्यासाठी तब्बल तीन मोठे क्रेन आणि जेसीबी मशीनच्या साहाय्याने युद्धपातळीवर प्रयत्न सुरू करण्यात आले. वाहन खड्ड्यात खोलवर अडकल्यामुळे ते बाहेर काढण्यास मोठ्या अडचणी येत होत्या.

या अपघातामुळे सोलापूर-पुणे रोडवरील वाहतूक काही काळ ठप्प झाली होती. वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. पोलिसांनी तात्पुरत्या स्वरूपात वाहतूक वळवून परिस्थिती नियंत्रणात आणली.. दरम्यान, पुलाच्या काम दरम्यान सुरक्षिततेच्या उपाययोजना अपुऱ्या असल्याचा आरोप स्थानिक नागरिकांकडून करण्यात येत आहे. रस्त्यालगत खोल खड्डे असूनही योग्य सूचना फलक, बॅरिकेड्स व प्रकाशव्यवस्था नसल्याने अशा प्रकारचे अपघात घडत असल्याची नाराजी नागरिकांनी व्यक्त केली. भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी संबंधित यंत्रणांनी तातडीने सुरक्षा उपाय कडक करण्याची मागणी होत आहे.



### जाहीर नोटीस

तमाम लोकांस विशेषतः सोलापूर शहर परीसरातील राहणाऱ्या सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविणत येते की, मिळकतीचे वर्णन - डि व सब डि सोलापूर पैकी तालुका उत्तर सोलापूर पैकी सोलापूर महानगरपालीकेच्या हद्दीतील मौजे शेळगी येथील सर्व्हे नं. १०/१ब (जुना सर्व्हे नं. १०अर) याचे एकूण क्षेत्र ०५ हे. ६४ आर यापैकी प्लॉट नंबर ४१ ची जागा यांचे एकुण क्षेत्र २२०० चौ.फुट अथवा २०४.४६० चौ.मी. इतके असून यापैकी पुर्व बाजूची जागा याची हद्द पुर्व-पश्चिम २० फुट व दक्षिणोत्तर ५५ फुट असे असून याचे क्षेत्र ११०० चौ. फुट अथवा १०२.२३० चौ.मी.

वर नमूद प्लॉट जागा ही सुर्यकांत सिध्दलिंगप्पा दुंबाळी यांचे मालकी व कब्जेवहिवाटीची आहे. सदरहू प्लॉट जागेचे पुर्वीचे नोंदणीकृत खरेदीखत ३१६०/२०११ दिनांक २५/०३/२०११ रोजीचे मुळ खरेदीखत दस्त अनावधानाने दिनांक ०४/०९/२०२५ रोजी गहाळ झालेले आहे.

वरील गहाळ झालेल्या खरेदीखत दस्ताच्या संदर्भात जोडभावी पेठ पोलीस स्टेशन सोलापूर येथे गहाळ रजिस्टर क्रं. ३१/२०२६ दिनांक २९/०१/२०२६ रोजी रितसर तक्रार दिलेली आहे. तरी वरील प्लॉट जागेचे खरेदीखत दस्तऐवज, इंडेक्स व पावती जर कोणास सापडले असतील तर त्यांनी खालील नमूद पत्यावर आणून द्यावे. तसेच सदरहु प्लॉट जागेबाबत कोणाचेही कसल्याही प्रकारचे बोजा, गहाण, दान, लिज, भाडे, लिव्ह ॲन्ड लायसेन्स, बक्षीस, साठेखत, खरेदीखत, पोटगी, टाच, जप्ती, या अन्य कोणत्याही स्वरूपाचे बोजा, हक्क असल्यास त्यांनी प्रस्तुतची नोटीस प्रसिध्द झालेपासून सात (७) दिवसाच्या आत खालील नमुद पत्यावर लेखी कागदोपत्री पुराव्यानिशी वैध हरकती नोंदवावीत.

ही जाहीर नोटीस दिली तारीख ३१/०१/२०२६

**अशिलांतर्फे ॲडव्होकेट**
**सही/-**
**श्री तुकाराम एस. चिंचोळी**
**बी.कॉम., एलएल.बी.**
**रो-हाऊस नं. एफ -१, समर्थ विहार,**
**अक्कलकोट रोड, सोलापूर मो. ९०२११६६३३२**

# मुली व महिला सक्षमीकरण ही काळाची गरज

### न्यायाधीश पाटील; अकोला-वासूद येथे कायदेविषयक शिबीर

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. ३१ जानेवारी -**

राष्ट्रीय व राज्य विधी सेवा प्राधिकरण यांच्यावतीने सोलापूर जिल्हा अध्यक्ष प्रमुख जिल्हा न्यायधीश एम.एस.शर्मा यांचे मार्गदर्शनाखाली तसेच सचिव पी.पी.पेठकर यांचे सहकार्याने सांगोला तालुका विधी सेवा समिती व विधिज्ञ सेवा संघ, सांगोला यांचे संयुक्त विद्यमाने कै.सरदार शामराव लिगाडे विद्यालय व भाई जगन्नाथराव लिगाडे ज्यू.कॉलेज, अकोला-वासूद (ता.सांगोला) येथे महिला सक्षमीकरण व न्यायाची उपलब्धता या विषयावर कायदेविषयक शिबीर आयोजित करण्यात आले होते.

यावेळी सांगोला विधीज्ञ संघाचे उपाध्यक्ष ॲड. एस.बी.दिवसे, महिला प्रतिनीधी ड. एस.व्ही.बोत्रे, ड.एच.डी.मेनकुदळे-घोंगडे, ॲड. एन.एम.जवंजाळ, विद्यालयाचे पर्यवेक्षक व्यवहारे, सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी, पालक उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात कर्मवीर भाऊराव पाटील व लक्ष्मीबाई भाऊराव पाटील यांचे प्रतिमा पुजनाने करणेत आली. शिबीरात बेटी बचाओ, बेटी पढाओ या विषयावर ॲड. एच.डी.मनकुदळे-घोंगडे यांनी सुकन्या समृध्दी योजना या विषयावर सांगोला पोस्ट ऑफीस मधील डी.एम.इंगळे यांनी तरच मुलींना सक्षमीकरण व न्यायाची उपलब्धता या विषयावर ऋतुजा नानासाहेब शिंदे यांनी मार्गदर्शन केले. सूत्रसंचालन ॲड. जी.एम.खटाकळे यांनी केले. आभार शिक्षक डी.टी. घोरपडे मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सांगोला न्यायालयाचे सहा.अधिक्षक ए.एस. बमनळ्ळी, डी.डी.मायभाटे, विधी सेवा समितीचे वरिष्ठ लिपीक डी.एम. डोईफोडे, पी.एल.व्ही पी.एच. पवार यांनी परिश्रम घेतले.



सांगोला सह.दिवाणी न्यायाधीश ए.ए.पाटील यांनी मुली व महिला सक्षमीकरण ही काळाची गरज असल्याचे नमूद करत मुलगी शिकली, प्रगती झाली याचे महत्व त्यांनी आपले अध्यक्षीय भाषणातून सर्वांना समजावून सांगितले.

### कागदपत्रे गहाळ झालेबाबत जाहीर नोटीस

तमाम लोकांस विषेशत शहर सोलापूर येथील लोकांना कळविण्यात येते की, मिळकतीचे वर्णन : डि।। व सब डि।। सोलापूर, ता. उत्तर सोलापूर पैकी मौजे बाळे व सोलापूर महानगरपालिकेच्या हद्दीतील जागा यांसी सर्व्हे नं. २४/१+२/कर२-बर२ पै प्लॉट नं.६३ यांसी क्षेत्र ११६.७२ चौ.मी. इतके असून, यांसी चतुःसिमा :- पुर्वेस - गट नं. ४अ, पश्चिमेस - प्लॉट नं. ६०, दक्षिणेस - प्लॉट नं. ६२, उत्तरेस - प्लॉट नं. ६४. येणेप्रमाणे वर्णनाची संपुर्ण मिळकत व त्यातील तदंगभुत वस्तुंसह

वर नमूद मिळकत हि **श्री श्रीकांत मधुसुदन दरगड** यांचे खरेदी मालकीचे असुन, सदर मिळकतीचे नोंदणीकृत **मुळ खरेदीदस्त क्रं. ४७५९/२०१२ दि.०७/०६/२०१२ चे मुळ दस्ताची रजिस्ट्रेशन रिसीट व इंडेक्स-२ अशी कागदपत्रे** ही श्रीकांत मधुसुदन दरगड यांचेकडुन दि.०१/०९/२०२५ रोजी फलटन गल्ली. सोलापूर या रस्त्यावर संध्याकाळच्या सुमारास मुळ कागदपत्रे गहाळ झालेली आहेत. त्याबाबत सदर फौजदार पोलिस स्टेशन सोलापुर येथे वर नमुद दस्त गहाळ झालेबाबत गहाळ तक्रार दाखल केली आहे.

तरी तमाम लोकांस या नोटीसीने कळविण्यात येते की, वर नमुद मिळकतीचे मुळ मिळकतीचे नोंदणीकृत मुळ खरेदीदस्त क्रं. ४७५९/२०१२ दि. ०७/०६/२०१२ ची मुळ दस्ताची रजिस्ट्रेशन रिसीट व इंडेक्स-२ अशी कागदपत्रे ची प्रत कोणासही सापडल्यास सदर कागदपत्रे खाली नमुद पत्यावर संपर्क साधावा अथवा मोबाईलवर फोन करावा अथवा नजीकच्या पोलिस स्टेशनमध्ये जमा करावी. सदर कागदपत्रे आणुन देणाऱ्यास योग्य तो बक्षीस आमचे अशिल देणार आहेत.

ही जाहिर नोटीस दिली ता. ३०/०१/२०२६

**सही/-**
**ॲड. श्रीधर गोविंद मागनूर**
**पत्ता - प्लॉट नं.३०, बालाजी विला**
**सोसायटी, गांधी नगर, विडी घरकूल रोड**
**सोलापूर मो.-९९२३५९२८५१**
**अशिलातर्फे ॲडव्होकेट**

## श्रीमती रत्नप्रभादेवी मोहिते-पाटील ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्यादित शंकरनगर अकलूज

### स्थावर मिळकतीचा जाहीर लिलाव

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १५६ आणि नियम १९६१ चा नियम क. १०७ (११) (ई) अन्वये मे. विशेष वसुली व विकी अधिकारी यांचे कार्यालय, श्रीमती रत्नप्रभादेवी मोहिते-पाटील ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्यादित शंकरनगर, ता. माळशिरस जि.सोलापूर अकलूज

तमाम लोकास कळविण्यात येते की, वरील संस्थेच्या विशेष वसुली व विक्री अधिकारी यांनी जप्त केलेल्या खालील नमुद केलेल्या स्थावर मिळकतींचा जाहीर लिलाव खाली नमुद केलेल्या वेळी नमुद ठिकाणी ठरल्याप्रमाणे केला जाईल. लिलावाच्या शर्ती व अटी लिलावाच्या वेळी वाचून दाखवल्या जातील. तरी गरजुंनी या संधीचा अवश्य फायदा घ्यावा. जादा माहिती श्रीमती रत्नप्रभादेवी मोहिते-पाटील ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्यादित शंकरनगर अकलूज, ता. माळशिरस जि. सोलापूर येथे कार्यालयीन वेळेत मिळू शकेल.

| अ. नं. | थकबाकीदाराचे नाव जामिनदाराचे नाव | मिळकतदाराचे नाव | मिळकत ठिकाण | मिळकत कमांक | क्षेत्र चौ.मि. हे/आर | ३१/०१/२०२६ अखेर येणेबाकी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | प्रविण बाळासो साळुंखे<br>दिपक लिंबाजी आवटे<br>राजु संभाजी खिलारे | प्रविण बाळासो साळुंखे | शिवाजीनगर माळेवाडी अ. | ५७/२/ब/१/१ | ०.०२ | ५,०५,८४७/- |
| २ | दिपक रामचंद्र थोपटे<br>दौलत नारायण धुमाळ<br>आयेशा निजाम शेख | सौ. लता दिपक थोपटे | राउतनगर अकलूज | १४८/१/ब/२/ब/२/ब/१ | ०.०१ | १,४७,८९४/- |
| ३ | महेश प्रेमराज जगदाळे<br>प्रेमराज निवृत्ती जगदाळे<br>ज्ञानदेव रामचंद्र कोकाटे | महेश प्रेमराज जगदाळे | राउतनगर अकलूज | १४३/१/ब/२/ब/१ | ०.१० | ५,४८,८४७/- |
| ४ | अनिल राणोजी घोडके<br>अजिनाथ लक्ष्मण पवार<br>सौ. साधना अनिल घोडके | सौ. साधना अनिल घोडके | शंकरनगर अकलूज | ८२/१/अ/८ | ०१.६१.५० चौ.मिटर | ३,५२,२४०/- |
| ५ | भानुदास कुंडलिक धाईजे<br>नामदेव सिताराम धाईजे<br>शकिल सत्तार शेख | भानुदास कुंडलिक धाईंजे | कोंडबावी | ५९०/१/१२ ५९०/१/६ | ०.६४<br>०.३५ | ५,६४,९३७/- |

**लिलावाचे ठिकाण : श्रीमती रत्नप्रभादेवी मोहिते-पाटील ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्यादित शंकरनगर अकलूज**
**दिनांक व वेळ : ०५/०३/२०२६ सकाळी ११.०० वाजता.**

**टीप:** १. लिलावात भाग घेण्यासाठी बयाणा रक्कम रु.१०,०००/- रोख लिलावापूर्वी भरणा करावी लागेल.
२. लिलावाच्या शर्ती व अटी लिलावापूर्वी वाचून दाखवल्या जातील.
३. कोणतेही कारण न देताही लिलाव रद्द व तहकूब करणेचे अधिकार वसुली अधिकारी यांनी राखून ठेवले आहेत.

**ठिकाण : अकलुज**
**दिनांक: ३१/०१/२०२६**

सील

**सही/-**
**श्री. गोपीचंद अरूण तुकशेट्टी**
**विशेष वसुली व विक्री अधिकारी**

## श्री महावीर अर्बन को-ऑप बँक लि, सोलापूर

मुख्य कार्यालय : ६०/६१, पूर्व मंगळवार पेठ, सोलापूर ४१३००२
फोन नं-०२१७-२६२२९४४/२६२२९३३

**महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ च्या नियम १०७ मधील तरतुदीनुसार स्थावर मालमत्तेचे**

**फेरजाहीर लिलाव व विक्री नोटीस**

ज्या अर्थी सही करणार, विशेष वसुली व विक्री अधिकारी श्री महावीर अर्बन को-ऑप बँक ली. सोलापुर, हि संस्था महाराष्ट्र कायदा १९६१ अन्वये नोंदणीकृत संस्था असून त्यांनी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ च्या नियम १०७ मधील तरतुदीनुसार दि. ०६/०६/२०२३ रोजी मागणी नोटीस कर्जदार संजय चंद्रकांत बणजगोळे प्रोप्रा. वैशाली गंगाधर बणजगोळे रा. १) जी १३६, श्री सिद्धेश्वर मार्केट यार्ड सोलापूर २) ३०/६२, पद्मा नगर, सोलापूर व जामीनदार यांना पाठवून रक्कम रु.१,२४,८२,८५७.६० तसेच मुद्दल रक्कम रु. ८२,४८,७८०.६० यावर दिनांक १७/११/२०२२ पासून पुढे ही सर्व रक्कम परतफेड होईपर्यंत द.सा.द.शे १४% दराने होणाऱ्या व्याजाची रक्कमेची मागणी केलेली होती व आहे. सदर नोटीस मिळाल्याच्या दिनांकापासून थकबाकीदार यांनी सदर धकीत रक्कम जमा करण्यास कसूर केलेला आहे. तरी बँकेने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ व्या निधम १०७ मधील तरतुदीनुसार पुढील कारवाई करत, सदर स्थावर मिळकतीचे कायदेशीररित्या ताबा घेतलेले आहे. तरी सदर वर नमूद थकीत कर्ज रक्कमेपोटी बँकेने या खाली नमूद केलेले स्थावर मालमत्तेचा जाहिर लिलाव जेथे आहेत व जैसे आहेत अशा त्या त्या मिळकती त्या त्या परीस्थिती मध्ये विक्री करणार आहेत.

**जाहिर लिलाव व विक्री करण्यात येणाऱ्या मालमत्तेचे वर्णन पुढील प्रमाणे असे**

**कर्जदार -**
संजय चंद्रकांत बणजगोळे प्रोप्रा. वैशाली गंगाधर बणजगोळे
१) जी. १३६, श्री सिद्धेश्वर मार्केट यार्ड सोलापूर २) ३०/६२, पद्मा नगर, सोलापूर
**जामीनदार -**
१. गंगाधर चंद्रकांत बणजगोळे
रा. जी.१३६ श्री सिद्धेश्वर मार्केट यार्ड, सोलापूर २) ३०/६२, पद्मा नगर, सोलापूर
२. मल्लिनाथ महादेव मोरडे रा. मुस्ती, ता. दक्षिण सोलापूर जि. सोलापूर

| मिळकतदाराचे नाव | गांव | सिसनं/गट नं. | क्षेत्र | राखीव किंमत |
|---|---|---|---|---|
| मल्लिनाथ महादेव मोरडे | सोमपा हद्दीतील शेळगी | सिसन, ६३२ पैकी प्लॉट नं ४२ | २४८.५३ चौ. मी. पैकी १२३.७६ चौ.मी मल्लिनाथ महादेव मोरडे यांचे हिस्सेची | ३३,२९,२८०/- |
| लिलावाचे ठिकाण तारीख व वेळ | श्री महावीर अर्बन को-ऑप बँक ली. सोलापूर ६०/६१, पूर्व मंगळवार पेठ, सोलापूर-४१३००२ **बंद लिफाफ्यात निविदा सादर करणेचे दि. ०४/०३/२०२६** वेळ - सकाळी ११ ते दुपारी ३ वाजेपर्यंत **निविदा उघडण्याची तारीख व वेळ दि. ०५/०३/२०२६ सायं. ५:०० वा** | | | |
| ३१.०५.२०२५ अखेर येणेबाकी | रु.१,७८,१७,२०५/- दि.०१.०६.२०२५ पासून पुढील होणारे व्याज दंड व्याज व इतर खर्च | | | |

**टिप :-** १. लिलावात भाग घेणार यांनी राखीव किंमतीच्या १०% बयाणा रक्कम दि. ०२/०३/२०२६ पूर्वी दुपारी ३.०० वाजेपर्यंत डिमांड ड्राफ्ट/ आरटीजीएस अथवा पे ऑर्डर ने भरणा करावी. बयाणा रक्कम भरणा केल्याशिवाय लिलावात भाग घेता येणार नाही.
२. लिलावाच्या अटी व शर्ती लिलावाच्या दिवशी लिलावापूर्वी वाचून दाखविण्यात येईल आणि त्या बँकेच्या सूचना पत्रकामध्ये दिले जातील
३. लिलावापूर्वी थकबाकीदाराने रक्कम भरल्यास लिलाव रद्द करण्यात येईल.
४. लिलाव मिळकतीसंबंधी अधिक माहिती पाहिजे असल्यास बँकेच्या प्रधान कार्यालयात संपर्क साधावा.

**दिनांक : ३१/०१/२०२६**
**स्थळ : सोलापूर**

**सही/-**
**विशेष वसुली व विक्री अधिकारी**
**श्री महावीर अर्बन को-ऑप बँक ली., सोलापूर**



## चला आयुष्य वाढवूया, फिटनेसकडे वळूया

भाग - ४१

### व्हर्टिकल रेशो आणि ग्राउंड कॉन्टॅक्ट टाइम

धावपटूच्या रनिंग फॉर्म आणि एकूण कार्यक्षमतेचे मूल्यांकन करण्यासाठी व्हर्टिकल रेशो (Vertical Ratio) आणि ग्राउंड कॉन्टॅक्ट टाइम (Ground Contact Time – GCT) हे दोन अत्यंत महत्त्वाचे मेट्रिक्स मानले जातात. हे मेट्रिक्स तुमची ऊर्जा कशी वापरली जाते, शरीराची हालचाल किती प्रभावी आहे आणि तुम्ही किती कार्यक्षमतेने पुढे सरकत आहात, याबद्दल सखोल माहिती देतात. योग्य समज आणि प्रशिक्षणाच्या मदतीने हे दोन्ही घटक सुधारता येतात.

**व्हर्टिकल रेशो म्हणजे काय?**

व्हर्टिकल रेशो हा तुमच्या व्हर्टिकल ऑस्सिलेशन (शरीराची वर-खाली होणारी हालचाल) आणि स्ट्राईड लेंग्थ (प्रत्येक पावलात तुम्ही कापलेले अंतर) यांमधील गुणोत्तर आहे. म्हणजेच, तुमचे शरीर किती उंच उडते आणि त्या उडीच्या बदल्यात तुम्ही किती पुढे जाता, हे या मेट्रिकमधून समजते.

व्हर्टिकल ऑस्सिलेशन ही ऊर्जा खर्च करणारी हालचाल असते, तर स्ट्राईड लेंग्थ ही तुम्हाला पुढे नेणारी क्रिया आहे. त्यामुळे जर व्हर्टिकल रेशो कमी असेल, तर तुमचा रनिंग फॉर्म अधिक कार्यक्षम मानला जातो. कमी व्हर्टिकल रेशो म्हणजे कमी ऊर्जा वापरून जास्त अंतर पार करणे. सामान्यतः ६ टक्के पेक्षा कमी व्हर्टिकल रेशो उत्कृष्ट मानला जातो, तर १० टक्केपेक्षा जास्त असल्यास फॉर्ममध्ये सुधारणा करण्याची गरज असते.

**ग्राउंड कॉन्टॅक्ट टाइम म्हणजे काय?**

ग्राउंड कॉन्टॅक्ट टाइम म्हणजे प्रत्येक पावलात तुमचा पाय जमिनीवर किती वेळ राहतो, हे मिलिसेकंदमध्ये (एमएस) मोजले जाते. जीसीटी कमी असेल, तर तुम्ही जमिनीतून जलद आणि प्रभावी ''पुश-ऑफ'' घेत आहात, असे समजले जाते. त्यामुळे रनिंग इकॉनॉमी आणि वेग दोन्ही सुधारतात.

एलिट धावपटूंचा जीसीटी साधारणपणे २०० एमएस पेक्षा कमी असतो. २०८ ते २४० एमएस हा चांगला स्तर मानला जातो, तर २७३ एमएस पेक्षा जास्त असल्यास धावण्याची कार्यक्षमता वाढवण्यासाठी तांत्रिक सुधारणा आणि स्ट्रेंथ ट्रेनिंग आवश्यक असते. जास्त जीसीटी हे ओव्हर-स्ट्राईडिंग, कमी कॅडन्स किंवा कमजोर ग्लुट्स आणि कोर मसल्स यांचे संकेत असू शकतात.

**निष्कर्ष**

व्हर्टिकल रेशो आणि ग्राउंड कॉन्टॅक्ट टाइम हे दोन्ही मेट्रिक्स एकत्रितपणे तुमच्या धावण्यातील ऊर्जा वापर, लँडिंग पॅटर्न आणि पुश-ऑफ यांची सविस्तर माहिती देतात. कमी व्हर्टिकल रेशो आणि कमी जीसीटी म्हणजे अधिक कार्यक्षम, वेगवान आणि इन्जरी-फ्री धावण्याकडे वाटचाल. हे मेट्रिक्स समजून घेतल्यास तुम्ही तुमचा कॅडन्स, स्ट्रेंथ ट्रेनिंग आणि स्ट्राईड मेकॅनिक्स अधिक प्रभावीपणे सुधारू शकता, ज्याचा थेट फायदा तुमच्या परफॉर्मन्सवर होतो.

**- अतिश शहा**
फिटनेस ट्रेनर आणि अल्ट्रामॅरेथॉनर
चॅलेंजर स्पोर्ट्स फाउंडेशन, सोलापूर.
संपर्क - ९१७५८२८२०३

## मुंबई ओपन टेनिस अंकिताचे दमदार प्रदर्शन

**मुंबई :** भारतीय अनुभवी टेनिसपटू अंकिता रैनाने महाराष्ट्र राज्य लॉन टेनिस असोसिएशन येथे आयोजित २०२६ मुंबई ओपन डब्ल्यूटीए १२५के टेनिस मालिकेच्या पहिल्या दिवशी आकांक्षा नित्तुरेचा सरळ सेटमध्ये पराभव करत एक ठोस कामगिरी केली. त्या दिवशीच्या विजेत्यांध्ये क्रिस्टिना सिदोरोव्हा, अनास्तासिया कुलिकोवा, झुझाना पावलिकोव्स्का, मिसाकी मात्सुदा, निकोल फोसा हुएर्गो, पेंगटार्न प्लिप्यूच आणि यास्मिन कब्बाज यांचाही समावेश आहे. रशियाची उदयोन्मुख खेळाडू १९ वर्षीय क्रिस्टिना सिदोरोव्हाने २६ वर्षीय झील देसाईचा ६-२, ६-० असा पराभव करून केली आणि ती पुढील पात्रता फेरीत पोहोचली.

# भारताचे पाकिस्तानविरुद्ध वचपा घेण्याचे लक्ष्य

**आयसीसी १९ वर्षांखालील विश्वचषक क्रिकेट**

♦ **बुलावायो, ३१ जानेवारी**

आयसीसी १९ वर्षांखालील विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत सुपर सिक्स फेरीत रविवारी येथे भारत आणि पाकिस्तान संघादरम्यान सामना खेळला जाणार आहे. भारताने या सामन्यातून पाकिस्तानकडून वचपा काढण्याचा निर्धार केला आहे.

गत वर्षी २१ डिसेंबर रोजी दुबईत झालेल्या १९ वर्षांखालील आशिया चषकाच्या अंतिम सामन्यात भारताला पाकिस्तानकडून १९१ धावांनी पराभव पत्करावा लागला होता, तर त्याच स्पर्धेतील गट साखळी सामन्यात १४ डिसेंबर रोजी भारताने पाकिस्तानला ९० धावांनी हरवले होते. आता रविवारी आयुष म्हात्रेच्या नेतृत्वाखालील भारतीय संघ त्या पराभवाचा बदला घेण्यासाठी उत्सुक असेल.

१९ वर्षांखालील विश्वचषकात भारताची आतापर्यंतची कामगिरी वर्चस्वपूर्ण राहिली आहे. भारतीय संघाने आपल्या मोहिमेची सुरुवात अमेरिकेवर सहा गडी राखून मिळवलेल्या मोठ्या विजयाने केली, त्यानंतर गट साखळी फेरीत बांगलादेश व न्यूझीलंडलाही पराभूत केले. सुपर सिक्स फेरीतील पहिल्या सामन्यात भारताने यजमान झिम्बाब्वेचा २०४ धावांनी मोठा पराभव करून आपली विजयी मालिका कायम ठेवली.

पण आता भारतासमोर पाकिस्तानच्या रूपाने एक बलाढ्य प्रतिस्पर्धी संघ उभा आहे व आशिया चषकाच्या अंतिम सामन्यातील मोठा पराभव म्हात्रेच्या नेतृत्वाखालील संघाला सतावत असेल.

यष्टीरक्षक अभिज्ञान कुंडू व वैभव सूर्यवंशीने फलंदाजीत सातत्य राखले असून, प्रत्येकाने दोन अर्धशतके झळकावली आहेत, परंतु ते त्याचे रूपांतर शतकात करण्याचा प्रयत्न करतील. विहान मल्होत्रा या आणखी एका फलंदाजाकडून भारताला अपेक्षा असतील. डावखुरा फलंदाज विहानने गत सामन्यात झिम्बाब्वेविरुद्ध नाबाद १०९ धावांची खेळी केली होती.

गोलंदाजी विभागात मध्यमगती गोलंदाज हेनिल पटेल व डावखुरा वेगवान गोलंदाज उद्धव मोहन हे विश्वचषकात भारतासाठी उत्कृष्ट कामगिरी करणारे खेळाडू ठरले आहेत.

कर्णधार म्हात्रेनेही आपल्या ऑफ-ब्रेक गोलंदाजीने झिम्बाब्वेविरुद्ध तीन बळी घेत चमकदार कामगिरी केली, तर आर.एस. अमरीशनेही उत्तम गोलंदाजी केली आहे.

**मिन्हास भारतासाठी आव्हानात्मक**

दुसरीकडे, पाकिस्तानने इंग्लंडविरुद्धच्या पहिल्या गट साखळी सामन्यात पराभव पत्करला, पण स्कॉटलंड व झिम्बाब्वेविरुद्धच्या पुढील दोन्ही सामन्यात विजय मिळवला.

पाकिस्तानने सुपर सिक्स फेरीच्या पहिल्या सामन्यात न्यूझीलंडवर ८ गड्यांनी विजय मिळवला व भारताविरुद्धच्या सामन्यात आत्मविश्वासाने खेळत आहे.

१९ वर्षांखालील आशिया चषकाच्या अंतिम फेरीत भारताच्या पराभवाचे सूत्रसंचालन करणारा सलामीवीर समीर मिन्हास या स्पर्धेत प्रभावी फॉर्ममध्ये आहे. भारताला त्याच्या धावा काढण्यावर नियंत्रण ठेवावे लागेल. गोलंदाजी विभागात अब्दुल सुभान व अली रझा हे पाकिस्तानचे प्रमुख खेळाडू आहे आणि भारतीय फलंदाजांना त्याचा सामना करण्यासाठी योजना आखावी लागेल.

◄(वृत्तसंस्था)


आयुष म्हात्रे


फरहान युसूफ

**भारत-पाकिस्तान सुपरसिक्स सामना**

**स्थळ :** क्वीन्स स्पोर्ट्स क्लब, बुलावायो
**वेळ :** दुपारी १.०० वाजतापासून
**थेट प्रसारण :** स्टार स्पोर्ट्सवर

**हस्तांदोलन न करण्याचे धोरण कायम ठेवण्याची शक्यता**

पहलगाम दहशतवादी हल्ला व त्यानंतर भारतीय सशस्त्र दलांनी केलेल्या ऑपरेशन सिंदूरच्या पृष्ठभूमीवर भारत पाकिस्तानसोबत हस्तंदोलन न करण्याचे धोरण पुढेही सुरू ठेवण्याची शक्यता आहे. १९ वर्षांखालील आशिया चषकाच्या अंतिम सामन्यात भारतीय संघाने पाकिस्तानसोबत सामन्यानंतर हस्तांदोलन करणे टाळले होते. त्या स्पर्धेतील दोन्ही संघांमधील गट सामन्यादरम्यानही भारतीयांनी हाच प्रकार केला होता.

# एलेना रायबाकिना ऑस्ट्रेलियन ओपन विजेती

♦ **मेलबर्न, ३१ जानेवारी**

जागतिक क्रमवारीत तिसऱ्या क्रमांकावर असलेल्या कझाकिस्तानच्या एलेना रायबाकिनाने रॉड लेव्हर एरिनावर २ तास आणि १८ मिनिटांच्या सामन्यात अव्वल मानांकित बेलारूसच्या आर्यना सबालेन्काला ६-४, ४-६, ६-४ असे पराभूत करून आपले दुसरे ग्रॅण्ड स्लॅम विजेतेपद पटकावले. २०२२ च्या विम्बल्डननंतरचे हे तिचे पहिलेच मोठे विजेतेपद आहे.

'आता शब्द शोधणे कठीण आहे,' असे रायबाकिना बक्षीस वितरण समारंभादरम्यान म्हणाली. पण, मी आर्यनाचे गत काही वर्षांतील तिच्या अप्रतिम कामगिरीबद्दल अभिनंदन करू इच्छिते. आम्ही भविष्यात आणखी अनेक फायनल एकत्र खेळू, असे ती म्हणाली. तीन वर्षांपूर्वी मेलबर्नमध्ये झालेल्या सामन्यापेक्षा हा निकाल वेगळा होता, जेव्हा रायबाकिनाने २०२३ च्या अंतिम सामन्यात सबालेन्काविरुद्ध पहिला सेट जिंकला होता, पण त्यानंतर सामना तिच्या हातातून निसटला होता.

एलेना रायबाकिनाने मेलबर्नच्या उष्णतेतही शांत राहून २०२६ ऑस्ट्रेलियन ओपनचे विजेतेपद पटकावले. या विजेतेपदाबरोबरच राबाकिना डब्ल्यूटीए जागतिक क्रमवारीत संयुक्तपणे कारकिर्दीतील सर्वोत्तम तिसऱ्या क्रमांकावर पोहोचली आहे. अंतिम सामन्यात विजय मिळवण्यापूर्वी तिने संपूर्ण स्पर्धेत केवळ एकच सेट गमावला होता.रायबाकिनाला बार्सिलोना १९९२ ऑलिम्पिक महिला एकेरीची चॅम्पियन जेनिफर कॅप्रियाटी यांच्या हस्ते डॅफ्ने अखर्स्ट मेमोरियल चषक प्रदान करण्यात आला. गत वर्षी विम्बल्डननंतर क्रमवारीत १३ व्या क्रमांकावर घसरण झालेल्या या २६ वर्षीय खेळाडूने डब्ल्यूटीए फायनल्समधील विजयानंतर आता ऑस्ट्रेलियन ओपनमध्येही एक मोठा विजय मिळवला आहे. ◄(वृत्तसंस्था)


ऑस्ट्रेलियन ओपन चषकासह एलेना रायबाकिना

# महाराष्ट्राची पाँडिचेरीवर १५६ धावांची आघाडी

**▶▶ दुसऱ्या दिवस अखेर महाराष्ट्राच्या पहिल्या डावात ८ बाद ३३६ धावा**

**▶▶ दिग्विजय पाटीलचे तिसरे शतक, पाँडिचेरीच्या नमन शर्माचे ५ बळी**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३१ जानेवारी -**

येथील इंदिरा गांधी पार्क स्टेडियमवर कालपासून सुरू झालेल्या महाराष्ट्र विरुद्ध पाँडिचेरी या क्रिकेट सामन्यात दुसऱ्या दिवसाखेर महाराष्ट्राने पहिल्या डावात ९५ षटकात ८ बाद ३३६ धावा केल्या असून पाँडिचेरी संघावर १५६ धावांची आघाडी घेतली आहे.

दुसऱ्या दिवशी पहिल्या सत्रात कालची नाबाद जोडी हर्ष मोगावीरा व कप्तान सचिन धस यांनी खेळ पुढे सुरू ठेवत ४९ धावांची भागीदारी रचली. ६० धावा झाल्या असताना आकाश पी. याने हर्ष (२७)ला शिशिरकरवी झेलबाद केले. त्यानंतर आलेल्या दिग्विजय पाटील सोबत सचिन धसने उपयुक्त फलंदाजी करत स्वतःचे सलग दुसरे अर्धशतक झळकावले. दोघात ५९ धावांची भागीदारी झालेली असताना सचिन (५४) नमन शर्माद्वारे त्रिफळा बाद झाला. जेवणाला खेळ थांबला तेंव्हा १६१/३ (३९ षटके) अशी धावसंख्या झालेली.

किरण चोरमले सोबत दिग्विजयने दमदार फलंदाजी करत ५३ धावांची भागीदारी रचत अर्धशतक लगावले. किरण चोरमले (१६) देखील नमन शर्माद्वारे त्रिफळाबाद झाला. त्यानंतर आलेल्या अभिषेक पवार सोबत दिग्विजयने ४४ धावांची भागीदारी रचली. नमन शर्माने पृथ्वी खन्ना द्वारे अभिषेक (१०) ला झेल बाद केले. त्यानंतर आलेल्या अजय बोरुडे सोबत प्रभावी फलंदाजी करत दिग्विजयने सलग दुसऱ्या सामन्यात शतक झळकाविले. चहापानाला काहीच वेळ शिल्लक असताना दिग्विजय (११० धावा, १४५ चेंडू, १७ चौकार, १ षटकार) शिशिरद्वारे पायचीत झाला. तिसऱ्या सत्रात अजय बोरुडे स्वराज चव्हाण सोबत संथ फलंदाजी करत असताना कप्तान नितीन प्रणवने स्वराज (१४)ला कारथीराजाद्वारे झेलबाद केले व त्यानंतर आलेला शुभम मेड (८) नमन शर्माचा ५वा बळी ठरला तो आकाश पी.द्वारे झेलबाद झाल्याने. तळातील खेळाडू वैभव दारकुंडे सोबत अजय बोरुडेने वैयक्तिक अर्धशतक पूर्ण करत दिवस अखेर धावसंख्या ३०० पार नेली. दिवसातील ९० षटके पूर्ण झाल्यावर पंचांनी खेळ थांबविला तेव्हा ८ बाद ३३६ धावा करत महाराष्ट्राने पहिल्या डावात आघाडी घेतली असून उद्या पहिल्या सत्रात शेवटचे २ खेळाडू आणखीन किती धावा जोडून आघाडी वाढवितात हे पाहणे उत्सुकतेचे ठरणार आहे.

नमन शर्माला गोलंदाजी मध्ये साथ देत नितीन प्रणव, आकाश पी, शिशिर एच आर.यांनी प्रत्येकी एक बळी मिळविला.


नमन शर्मा (पाँडिचेरी)


अजय बोरुडे (महाराष्ट्र)


दिग्विजय पाटील (महाराष्ट्र)

**महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांना श्रद्धांजली**

सामन्याच्या सुरुवातीला दोन्ही संघांकडून तसेच सामन्यातील पंच, गुणलेखक, अधिकारी यांचे वतीने महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या दुःखद निधनानिमित्त श्रद्धांजली वाहण्यात आली. महाराष्ट्राच्या खेळाडूंनी दंडावरती काळी फीत लावून दिवसभर खेळ केला. सोलापूर जिल्हा क्रिकेट संघटनेच्या वतीने विविध समित्या या सामन्यासाठी कार्यरत असून सर्वांचे कडून अतिशय उत्तम नियोजन केले असल्याचे पाहुण्या पांडिचेरी संघाचे व्यवस्थापक श्री.रामदासी यांनी सांगितले.



# अरिहंत इंग्लिश स्कूलमध्ये क्रीडा सप्ताहाचा समारोप

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३१ जानेवारी-**

अरिहंत इंग्लिश मीडियम स्कूल मध्ये वार्षिक क्रीडा महोत्सव मान्यवरांच्या उपस्थितीत उत्साहात संपन्न झाला. या समारोप क्रिकेट प्रशिक्षक प्रकाश चंद्रप्पा कंप्पली यांच्या हस्ते झाला. .तत्पूर्वी बॅन्डच्या निनादात प्रमुख पाहुण्यांचे स्वागत करण्यात आले. अंजली महावरकर यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. त्यानंतर पाहुण्यांच्या हस्ते प्रतिमा पूजन करण्यात आले. रामकृष्ण पोन्नम यांनी पाहुण्यांचा सत्कार केला. विद्यार्थ्यांनी शिस्तबद्ध कवायत संचलन करून शिस्तीचा पाठ दिला. कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण ठरले ते म्हणजे इ. चौथीच्या विद्यार्थ्यांनी सादर केलेले खेळावरील नृत्य. या नृत्यांनी सर्वांची मने जिंकली. मान्यवरांच्या हस्ते विविध खेळात प्राविण्य मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांचा पदक प्रशस्तीपत्रक देऊन गौरव करण्यात आला.

या क्रीडा सप्ताहात १०० मीटर धावणे, थ्रो बॉल, कबड्डी, क्रिकेट, नेट बॉल, डॉच बॉल यासारखे खेळ घेण्यात आले. त्यात १४ वर्षाखालील व १७ वर्षाखालील असे दोन गट करण्यात आले होते. या खेळात सर्व विजेत्या विद्यार्थ्यांना प्रशस्तीपत्र व पदक देऊन गौरविण्यात आले. यावर्षीचा बेस्ट हाऊसचा मान ग्रीन हाऊस ने मिळविला.

यावेळी मंचावर डॉ. अजय पोन्नम सौ. सुलक्षणा पोन्नम, रामकृष्ण पोन्नम, उपमुख्याध्यापिका तस्नीम शेख, चन्नेश इंडी, सौ. अर्चना महांकाळ उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन फौजान अझहारी यांनी केले. दीपिका टीचर यांनी आभार मानले.

# आंतरविद्यापीठ कर्मचारी कुलगुरू टी-२० क्रिकेट स्पर्धा ३ फेब्रुवारीपासून सोलापुरात

**राज्यातील १७ विद्यापीठातील कर्मचारी संघांचा सहभाग**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३१ जानेवारी-**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्यावतीने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर त्रिशताब्दी जयंती वर्षानिमित्त महाराष्ट्र राज्य आंतरविद्यापीठ कर्मचारी 'कुलगुरू टी-२० क्रिकेट स्पर्धा २०२६'चे आयोजन केल्याची माहिती विद्यापीठाचे क्रीडा संचालक तथा प्रभारी कुलसचिव डॉ. अतुल लकडे यांनी दिली.

ही स्पर्धा ३ ते ९ फेब्रुवारी या कालावधीत सोलापुरातील चार मैदानांवर होणार असून या स्पर्धेत राज्यातील १७ विद्यापीठांतील कर्मचारी संघाचे सहभाग आहे. राज्यातील विद्यापीठांतील कर्मचारी वर्गामध्ये क्रीडावृत्ती वाढविण्यासह आपसी सलोखा, संघभावना आणि शारीरिक तंदुरुस्तीसाठी दरवर्षी कुलगुरू चषक टी ट्वेंटी क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात येते. लीग कम नॉकआउट पद्धतीने या स्पर्धेचे आयोजन होत असते. विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. प्रकाश महानवर आणि प्र-कुलगुरू डॉ. लक्ष्मीकांत दामा यांच्या मार्गदर्शनाखाली ही स्पर्धा होणार आहे. ही स्पर्धा सोलापूर शहरातील इंदिरा गांधी स्टेडियम पार्क मैदान, डॉ. बाबासाहेब आंबेडकर रेल्वे क्रीडांगण, भंडारी ग्राउंड तसेच दयानंद महाविद्यालयाच्या मैदानावर होणार असून, त्यामुळे शहरात एकाच वेळी चार ठिकाणी क्रिकेटचा थरार पाहायला मिळणार आहे.

या स्पर्धेचा उद्घाटन सोहळा शनिवार, दि. ३ फेब्रुवारी २०२६ रोजी दुपारी साडेचार वाजता विद्यापीठाच्या कॅम्पसमध्ये होणार आहे. उद्घाटन समारंभाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू प्रा. डॉ. प्रकाश महानवर हे असणार असून उद्घाटन पोलीस आयुक्त एम. राजकुमार यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी प्र-कुलगुरू प्रा. लक्ष्मीकांत दामा यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. उद्घाटनापूर्वी सर्व संघांचा मार्च पास होणार आहे. उद्घाटन झाल्यानंतर सायंकाळी सांस्कृतिक कार्यक्रम देखील होईल. स्पर्धेचा पारितोषिक वितरण व समारोप समारंभ दि. ९ फेब्रुवारी रोजी सायंकाळी साडेपाच वाजता इंदिरा गांधी स्टेडियम, पार्क मैदान येथे होणार आहे

**या १७ विद्यापीठाचे संघ सहभागी होणार**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, कवी कुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठ, रामटेक, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली, मुंबई विद्यापीठ, डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रज्ञान विद्यापीठ, लोणेरे, वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक, महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, संभाजीनगर, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ. संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ.



# राज स्कूलला राज्य कराटे स्पर्धेत १४ पदके

**२ सुवर्ण, ३ रौप्य व ९ कांस्य पदकांचा समावेश**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३१ जानेवारी-**

स्वर्गीय शिहान सुरेश जाधव स्मृती प्रित्यर्थ रुद्र ॲकॅडमी ऑफ मार्शल आर्ट्स व योग आणि ट्रेडिशनल व स्पोर्ट्स कराटे असोसिएशनतर्फे आयोजित तिसऱ्या इंटर डोजो राज्य कराटे स्पर्धेत जुनी मिल कंपाऊंड मुराराजी पेठ येथील राज मेमोरिअल इंग्लिश स्कूलमधील कराटे खेळाडूंनी काता प्रकारात दोन सुवर्ण, तीन रौप्य व नऊ कांस्य अशी १४ पदके पटकाविली.

विजेत्या खेळाडूंना रुद्र प्रशिक्षक सेन्पाई संकेत धन्नाईक यांनी प्रशिक्षण दिले असून क्रीडा शिक्षक अतुल सोनके, व आशुतोष जाधव यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे संस्था अध्यक्ष डॉ. सूर्यप्रकाश कोठे, उपाध्यक्ष देवेंद्र कोठे, सचिव प्रथमेश दादा कोठे, डॉक्टर राधिकाताई चिलका, मुख्याध्यापिका रोहिणी सूरा, शिहान संगीता सुरेश जाधव व सेन्सेई मिहिर सुरेश जाधव यांनीसर्व विजेत्यांचे अभिनंदन केले.

**पदकप्राप्त खेळाडू :** सुवर्ण - मोहम्मद अली खैराटकर, आरुष विष्णू सुरवसे. रौप्य- लक्ष्मी सुहास पांडव, सिद्धार्थ राहुल गायकवाड, विश्वरत्न सिद्धार्थ भंडारे. कांस्य- श्रीरंग नागेश गुळसकर, महेक इजाज शेख, अनुज सिद्धेश्वर हक्के, अनिकेत सचिन हक्के, श्वेता उमेश वाघमारे, प्रणव श्रीकांत चव्हाण, लक्ष्या शैलेश काळे, विराज सनी गायकवाड, अनशुल शिवाजी क्षीरसागर.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



# डॉक्टरांना खंडणीची मागणी; बार्शीत एकावर गुन्हा

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि. ३१ जानेवारी-**

बार्शीतील डॉ. योगेश सोमाणी यांना १५ लाख रुपयांची खंडणीची मागणी आणि ती न दिल्यास समाज माध्यमातून बदनामी करण्याची धमकी दिल्याप्रकरणी राजेंद्र गायकवाड यांच्याविरुद्ध शुक्रवारी दि. ३० रोजी बार्शी शहर पोलिसांत गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार फिर्यादी डॉ. योगेश सोमाणी यांच्या हॉस्पिटलमध्ये सप्टेंबर २०२४ मध्ये हिरा पेटाडे नावाचा रुग्ण दवाखान्यात दाखल झाला होता. त्यास पोट दुखीचा त्रास असल्याने तो ऍडमिट झाला होता. पोटात नळी टाकून शस्त्रक्रिया करावी लागेल हे रुग्णाच्या नातेवाईकांस सांगितले होते. त्यावेळी रुग्णाच्या नातेवाईकांनी रुग्ण बरे होण्याची १०० टक्के खात्री मागितली होती. परंतू रुग्णाची परिस्थिती गंभीर असल्याने नातेवाईकांनी रुग्णास पुणे येथे घेऊन गेले. त्यानंतर काही दिवसांनी रुग्ण हिरा पेटाडे हा बरा होऊन बार्शीत आला होता. त्यानंतर




बार्शी येथील राजेंद्र गायकवाड यांनी ४ जानेवारी २०२५ रोजी फेसबुक पेज या समाज माध्यमांवर डॉ. सोमाणी यांना अर्वाच्य भाषेत शिवीगाळ करत तुला पैशाचा खूप माज आला आहे. तुला बघून घेतो, अशी धमकी दिली. त्यानंतर गायकवाड यांनी फेब्रुवारी २०२५ मध्ये मनगिरे मळा येथील महादेव मंदिरजवळ डॉक्टरांना भेटून १५ लाख रुपये द्या नाहीतर फेसबुक लाईव्ह घेऊन तुमची बदनामी करत राहीन अशी धमकी दिली.

त्यावेळी गायकवाड यांना माझ्यामुळेच हा रुग्ण बरा झाला आहे. अधिक उपचारासाठी त्याला पुणे येथे पाठवले असल्याचे सांगितले. याबाबत बार्शी शहर पोलिसात एक तक्रारी अर्ज देखील फेब्रुवारी २०२५ मध्ये मी दिला होता, असेही त्यांनी फिर्यादीत नमूद केले आहे. राजेंद्र गायकवाड यांनी मागील वर्षी फेसबुक पेजवर सतत १५ मार्च २०२५ ते ४ डिसेंबर २०२५ पर्यंत १४ वेळा आणि २४ जानेवारी २०२६ रोजीही समाज माध्यमातून अर्वाच्य भाषेत शिवीगाळ करत, कुटुंबीयांना धमकावत माझी बदनामी केल्याचे डॉ. सोमाणी यांनी फिर्यादीत नमूद केले आहे. यावरुन गायकवाड यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक बाळासाहेब जाधव करीत आहेत.

## महत्वाचे...



### जवळा जि.प. गटात महायुतीच्या उमेदवारांचा प्रचार शुभारंभ

**सांगोला, दि. ३१ जानेवारी -**

सांगोला तालुक्यातील जवळा जि.प.गटातील महायुतीचे उमेदवार अतुल पवार, वाढेगाव पं.स.गणाच्या उमेदवार राणी उबाळे, जवळा पं.स.गणाच्या उमेदवार भारती देशमुख यांच्या प्रचाराचा शुभारंभ शनिवार वाढेगाव येथे झाला. यावेळी कार्यकर्ते व नागरिकांनी उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांना श्रद्धांजली अर्पण करत त्यांच्या विचारांप्रती निष्ठा व्यक्त केली. याप्रसंगी अतुल पवार, श्रीकांत देशमुख यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी शिवसेना शिंदे गटाचे सागर पाटील, नगराध्यक्ष आनंद माने, नगरसेवक काशिलिंग गावडे, माऊली तेली, उमेदवार भारती देशमुख, राणी उबाळे उपस्थित होते.



### जि.प. व पं.स. निवडणूकीसाठी सांगोल्यात दुसरे प्रशिक्षण संपन्न

**सांगोला, दि. ३१ जानेवारी -**

शनिवार दि.३१ जानेवारी रोजी पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर सभागृह तसेच विद्यामंदिर प्रशाला व ज्यु.कॉलेज, सांगोला येथे स.१० ते ५ वा. पर्यंत जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक २०२६ च्या अनुषंगाने दुसरे प्रशिक्षण संपन्न झाले. यावेळी मतदान प्रक्रिया निर्भय, पारदर्शक व कायद्याच्या चौकटीत पार पडण्यासाठी निवडणूक निर्णय अधिकारी बी.आर.माळी व सहा.निवडणूक निर्णय अधिकारी बाळूताई भागवत यांनी सूचना दिल्या. तसेच निवासी नायब तहसीलदार सोमनाथ साळुंखे, समाधान वाघमोडे यांनी ईव्हीएम बाबत मार्गदर्शन करत सिलिंग प्रोसेस दाखवत मॉक पोल, मतदार ओळख प्रक्रिया याबाबत माहिती दिली. प्रशिक्षणासाठी केंद्राध्यक्ष, मतदान अधिकारी एक, दोन, तीन, व बुथवरील परिचर असे १४७० प्रशिक्षणार्थी उपस्थित होते. यावेळी कैलास मडके, शशिकांत सुतकर, नितीन गवळी, नागेश हवेली, सर्व ग्राम महसूल अधिकारी, मंडल अधिकारी हरिश्चंद्र जाधव, झोनल अधिकारी उपस्थित असल्याची माहिती मीडिया नोडल अधिकारी मिलिंद सावंत यांनी दिली.

### अवैध वाळू उपसा प्रकरणी कारवाई; १४ लाखांचा मुद्देमाल जप्त

**सोलापूर, दि. ३१ जानेवारी-**

स्थानिक गुन्हे शाखेकडून सांगोला तालुक्यात अवैध वाळू उपसावर धडाकेबाज कारवाई करत जेसीबीसह ट्रॅक्टर-ट्रॉली, वाळु असे एकुण १४,५७,०००/- रू. किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. मौजे कोळा (ता. सांगोला जि. सोलापूर) या गावच्या लगत असलेल्या ओढयाच्या पात्रातून आबा कोळेकर व एक अज्ञात इसम जेसीबीच्या सहाय्याने वाळू उपसा करून ट्रॅक्टरच्या ट्रॉलीमध्ये भरून त्याची चोरून वाहतूक करून विक्री करीत असल्याची खात्रीशिर बातमी मिळाल्याने, स्थानिक गुन्हे शाखा, सोलापुर ग्रामीण तपास पथक त्या ठिकाणी पोहोचुन छापा टाकला असता, जेसीबीच्या सहाय्याने वाळु भरत असलेले ट्रॅक्टर-ट्रॉली जागेवर सोडून जेसीबी व ट्रॅक्टर चालक पळून गेले. या ठिकाणावरील मुद्देमाल गुन्हयाचे कामी जप्त करून आरोपींतावर ७८/२०२६ बीएनएस कलम ३०३ (२), पर्यावरण संरक्षण कायदा कलम ९, १५ प्रमाणे सांगोला पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आले आहे. नमुद गुन्हयात मौजे कोळा ता. सांगोला या लगत असलेल्या ओढयाच्या पात्रातुन ९,००,००/- रू. किंमतीचे जेसीबी इंडीया कंपनीचे एक जेसीबी, ५,५०,०००/- रू किंमतीचे ट्रॅक्टर-ट्रॉली, ७,०००/- रू किंमतीचे एक ब्रास वाळू असे एकुण १४,५७,०००/- रू किमतींचे मुद्देमाल जप्त करण्यात आले असून पुढील तपास पोह/भरमशेटटी सांगोला पोलीस ठाणे हे करीत आहेत. सदरची कामगिरी पोलीस अधीक्षक, अतुल कुलकर्णी, अपर पोलीस अधीक्षक, प्रितम यावलकर, वरीष्ठ पोलीस निरीक्षक, संजय जगताप, स्थानिक गुन्हे शाखा सोलापुर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनाखाली, स्थानिक गुन्हे शाखा सोलापुर ग्रामीण कडील सपोनि विशाल वायकर, पोलीस हवालदार विरेश कलशेट्टी, पोकॉ/यश देवकते यांनी बजावली आहे.

### मन आतले मनातले चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला

**सोलापूर, दि. ३१ जानेवारी-**

अनेक मराठी, हिंदी, दाक्षिणात्य चित्रपटांमध्ये दमदार भूमिका साकारलेले अभिनेते उपेंद्र लिमये आता दमदार खलनायकी भूमिकेत दिसणार आहेत. मन आतले मनातले या चित्रपटात त्यांनी खलनायकी भूमिका साकारली असून, या ॲक्शनपॅक्ड चित्रपटाचा टीजर लाँच करण्यात आला आहे. १३ फेब्रुवारीला प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. सूर्य फिल्म वर्ल्ड प्रस्तुत मन आतले मनातले या चित्रपटाची निर्मिती सुरेन महापात्रा यांनी केली आहे. सुरेन महापात्रा यांनी चित्रपटाचं कथा आणि पटकथा लेखन तर संवादलेखन मनोज सुधाकर येऊनकर यांनी केले आहे.तर जेम्स अँथनी यांनी हा चित्रपट दिग्दर्शित केला आहे. अभिजित मजुमदार यांनी संगीत दिग्दर्शन, डॉ. सुनंदा डिवरे पळवणकर यांनी गीतलेखन केले आहे. सुदर्शन सेनापती यांनी छायांकन, मलया आणि बिपिन यांनी संकलनाची जबाबदारी निभावली आहे. चित्रपटात सुरेन, मानसी नाईक, उपेंद्र लिमये, ऋतुराज फडके, संदीप गायकवाड,कमलेशन सावंत,अरूण नलावडे, यतीन कार्येकर, सिया पाटील, राजेश आहेर, विनित भोंडे अशी स्टारकास्ट आहे.

## निधन वृत्त...

### ओगसिद्ध नरोटे



**सोलापूर, दि. ३१ जानेवारी-**

ओम गर्जना चौक उद्धव नगर येथील रहिवासी ओगसिद्ध सोमण्णा नरोटे (वय ६८) शनिवार दि. ३१ जानेवारी रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, एक मुलगी, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

## कोरफळेच्या मानसी तिकटेची सरळ सेवा परिक्षेतून भूमी अभिलेख विभागात निवड

**तभा वृत्तसेवा,**
**वैराग, दि. ३१ जानेवारी-**

कोरफळे येथील मानसी तिकटे ही सरळ सेवा परिक्षेत राज्यात (मुलींमधून) तृतीय आली. तिची भूमी अभिलेख विभागात दिमाखात निवड झाली आहे.



कोरफळे केंद्रप्रमुख सिध्देश्वर तिकटे यांची मानसी ही कन्या आहे. यापूर्वी त्यांच्या मोठ्या मुलीनेही मुंबई उच्च न्यायालयात कार्यरत असतानाच देशातील प्रतिष्ठित 'नॅशनल लॉ युनिव्हर्सिटी' (NLU) मधून LLM² (IB) मध्ये देशात दुसरा क्रमांक मिळवण्याची किमया साधली आहे. एकाच घरातील दोन कन्यांनी उच्च पदस्थ अधिकारी आणि कायदेतज्ज्ञ म्हणून नाव कमावल्यामुळे तिकटे सरांवर सर्व स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. मुलींच्या या यशामागे त्यांचे कष्ट आणि वडिलांचे योग्य मार्गदर्शन यांचा मोठा वाटा आहे. ग्रामीण भागातील मुलींनी जिद्दीने अभ्यास केला तर त्या देशात आणि राज्यात नक्कीच प्रथम येऊ शकतात, हे या बहिणींनी सिद्ध केले आहे.

## शंकरराव निंबाळकर विद्यालयात कर्मवीर समाज दिन सप्ताहाचे उद्घाटन

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ३१ जानेवारी-**



शंकरराव निंबाळकर अध्यापक विद्यालय बार्शी येथे कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांच्या जयंतीनिमित्त 'कर्मवीर समाज दिन सप्ताहाचे' उद्घाटन करण्यात आले. या उद्घाटन कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून माजी विद्यार्थी, वक्ते प्रशांत सरुडकर तर अध्यक्ष म्हणून प्राचार्य डॉ. दीपक गुंड उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे तसेच छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन प्रमुख पाहुणे व अध्यक्षांच्या हस्ते झाले. प्राचार्य डॉ दीपक गुंड सर यांनी प्रास्ताविक केले व प्रमुख पाहुण्यांची ओळख करुन दिली.

कर्मवीर सप्ताहाचे पहिले पुष्प हे प्रमुख व्याख्याते श्री. प्रशांत सरुडकर सर यांनी आपल्या मनोगतामध्ये 'स्फूर्तिदायक चरित्रे व युवकांच्या प्रेरणा' या विषयावर विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले.

या अध्यापक विद्यालयातून जीवनात आत्मविश्वास मिळाला, जीवन जगण्याचे कौशल्य शिकलो. कर्मवीर. मामासाहेबानी कष्टातून व स्वाभिमानातून ही संस्था उभी केली आणि आपण या संस्थेत शिकत आहोत हे आपले भाग्य आहे. शंकरराव निंबाळकर या सारखे दानशूर व्यक्तींमुळे अशा संस्था उभ्या राहतात. या मातीतून अनेकांनी आपले आयुष्य घडविले. पुस्तकाची मैत्री सोडू नका. आपल्या मनोगतात त्यांनी छत्रपती शिवाजी महाराज, डॉ बाबासाहेब आंबेडकर, महात्मा गांधी, कर्मवीर भाऊराव पाटील, रविंद्रनाथ टागोर, एडिसन, लुई पाश्चर, प्राचार्य शिवाजीराव भोसले, निर्मलकुमार फडकुले अशा प्रेरणादायी व्यक्तिमत्वाची उदाहरणे त्यांनी विद्यार्थ्यांना दिली. प्रगतीसाठी श्रमप्रतिष्ठा, आत्मविश्वास,समाजभान,अभ्यास या गोष्टी अत्यंत आवश्यक आहेत. अशा व्यक्तिमत्वाची चरित्रे वाचा, असेही सांगितले.

अध्यक्षीय समारोपामध्ये प्राचार्य डॉ. दीपक गुंड यांनी कर्मवीर समाज दिन सप्ताहामध्ये अशाच दर्जेदार व्याख्यानांचे आयोजन करुन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले जाते. तसेच कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांचे कार्य हे सर्व दूर पसरविले जाते, असे सांगितले. कार्यक्रमाचे आभार आणि सूत्रसंचालन सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. गायकवाड जे.पी. यांनी केले.

## अवैध अफू गांजाची खरेदी-विक्री प्रकरण; आरोपीचा जामीन मंजूर

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि.३१ जानेवारी**

अवैध अफू आणि गांजाची खरेदी-विक्री केलेबाबत आरोपी प्रमोद आप्पा मोरे (वय-५० वर्षे, रा. सातारा) याच्यावर दाखल गुन्ह्याप्रकरणी अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायाधीशांनी जामीन मंजूर केला आहे.

अधिक माहिती अशी की, पोलीस अधिकारी पेट्रोलिंग करीत असताना त्यांना गोपनीय बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, वर नमूद इसम हे वैराग येथे अफूची अवैध खरेदी-विक्री करीत आहेत. त्यानंतर दि.१९ नोव्हेंबर २०२५ रोजी रात्रीच्या सुमारास वैराग येथील विद्या मंदिर हायस्कुलच्या परिसरात आरोपी प्रमोद मोरे व यशवंत जगताप या दोघांनी खरेदी-विक्रीकरीता घेवून आलेला अवैध अफूची पिशवी व गांजाचे पोते या मादक व नशाकारक अंमली पदार्थ स्वतःच्या ताब्यात बाळगलेल्या स्थितीत मिळून आल्याने दोन्ही आरोपीस अटक करुन वैराग पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला होता. पोलीस कॉन्स्टेबल हरीश थोरात यांनी याबाबत फिर्याद दिली. आरोपीच्यावतीने वकिलामारफत जामीन अर्ज दाखल केला होता. जामीन अर्जावर झालेल्या युक्तीवादावेळी आरोपीच्यावतीने ॲड. विवेक गजशिव यांनी न्यायालयाच्या समोर आरोपीची बाजू मांडून युक्तिवाद केला. तो युक्तिवाद ग्राह्य धरुन अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायाधीश श्रीमती व्ही.एस. मलकापट्टे-रेड्डी यांनी आरोपी प्रमोद मोरे याचा जामीन अर्ज मंजूर केला. याकामी आरोपीतर्फे ॲड. गजशिव, ॲड. काशीद यांनी कामकाज पाहिले.

## तुर्कपिंपरीत कुजलेल्या अवस्थेत आढळला तरुणीचा मृतदेह

### डोके धडावेगळे; कुत्र्यांनी मृतदेहाचे तोडले लचके

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि.३१ जानेवारी-**

तालुक्यातील तुर्कपिंपरी शिवारात अंदाजे १९ वर्षीय अनोळखी तरुणीचा मृतदेह अत्यंत कुजलेल्या व विच्छिन्न अवस्थेत आढळून आल्याने खळबळ उडाली आहे. मृतदेहाचे डोके शरीरापासून वेगळे झालेले असून, मोकाट कुत्र्यांनी शरीराचे लचके तोडल्याचे भीषण दृश्य घटनास्थळी दिसून आले.

मिळालेल्या माहितीनुसार दि.२९ जानेवारी रोजी दुपारच्या सुमारास तुर्कपिंपरी गावचे पोलीस पाटील हनुमंत विलास लाळे यांना गावातील रंजित शेळके यांनी फोनवरुन गावातील बाळासाहेब महादेव वाघमोडे यांच्या मालकीच्या शेत गट नं. १४७ मध्ये एका तरुणीचे प्रेत पडले असून, कुत्रे ते खात असल्याची माहिती दिली. माहिती मिळताच पोलीस पाटील लाळे यांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेतली. यावेळी रंजित शेळके, साखर कारखान्याचे सिक्युरिटी गार्ड जाधव आणि गजेंद्र म्हेत्रे हे उपस्थित होते. प्रत्यक्षदर्शींनी सांगितल्याप्रमाणे मृतदेह पूर्णपणे कुजलेला असून, कवटीवर केस व चेहऱ्यावरील मांस पूर्णतः नाहीसे झालेले होते. कवटीच्या बाजूला काही कपडे पडलेले आढळून आले. धक्कादायक बाब म्हणजे, कवटीपासून सुमारे १० फूट अंतरावर धड पडलेले असून, कमरेपासून वरील शरीराचा भाग कुत्र्यांनी अर्धवट खाल्लेल्या अवस्थेत दिसून आला. मृतदेह अत्यंत कुजलेल्या अवस्थेत असल्याने ओळख पटवणे कठीण झाले आहे. मात्र, मृत तरुणीच्या दोन्ही पायात पैंजण, अंगावर तपकिरी रंगाची लेगींज तसेच बाजूला फाटलेली मोरपंखी रंगाची कुर्ती व काळया रंगाचे जरकीन सापडले असून, त्याआधारे ओळख पटवण्याचे प्रयत्न सुरु आहेत. या घटनेची माहिती पोलीस पाटील हनुमंत लाळे यांनी तात्काळ बार्शी तालुका पोलीस ठाण्यात दिली असून रीतसर खबरी जबाब नोंदवण्यात आला आहे. या तरुणीचा मृत्यू नेमका कधी व कशामुळे झाला? हा घातपात आहे की अन्य कारण? याचा तपास पोलीस करत आहेत. या घटनेमुळे तुर्कपिंपरी गावात भीतीचे वातावरण पसरले आहे.

## ओव्हरब्रिजवरून बस जात असल्याने विद्यार्थ्यांची गैरसोय

### विद्यार्थ्यांसह नागरिकातून संताप

**तभा वृत्तसेवा,**
**माळशिरस, दि.३१ जानेवारी-**

खुडूस (ता. माळशिरस) येथे एस.टी. बस थांबा असताना देखील काही एसटी बसेस गेल्या महिन्यापासून ओव्हर ब्रिज वरून जात असल्यामुळे विदयार्थांसह नागरिकांची गैरसोय होत असून याबाबत खुड्स ग्रामपंचायतीने ठराव करून देखील काही दखल घेतली जात असल्याने विद्यार्थ्यासह नागरिकांतून संताप व्यक्त होत आहे.


खुडूस गावाची लोकसंख्या दहा हजाराच्या आसपास असून अनेक वाडया वस्त्यांशी निगडित आहे. त्यामुळे बस थांब्यावर प्रवाशांची मोठी गर्दी असते. शिवाय शालेय विदयार्थांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे .खुडूस येथून नातेपुते सदाशिवनगर माळशिरस येथे अनेक विदयार्थी शाळा, कॉलेजसाठी जातात. परंतु वेळेवर येणाऱ्या गाडया गावातून येत नसल्याने विदयार्थांच्या शैक्षणिक नुकसान होत आहे.तसेच नागरिकांना हि नाहक त्रास सहन करावा लागत आहे.या ठिकाणी बसेस थांबाव्या यासाठी ग्राम पंचायतीने ठरावही दिला आहे.परंतु या मार्गावरून जाणाऱ्या बसेस लांब पल्ल्याच्या आहेत त्यांना वाहतूक नियंत्रकांनी सांगूनही काही बसेस ओव्हर ब्रिज वरूनच जातात .त्यामुळे शाळा, कॉलेजला वेळेत जाणे अवघड झाले आहे.आता काही दिवसात सर्वच विद्यार्थ्यांच्या परीक्षा सुरु होणार आहेत.या बसेस या बस थांब्यावर न येता ओव्हर ब्रिज वरून गेल्यास विद्यार्थ्यांचे परीक्षाला वेळेत न पोहचल्याने नुकसान होणार आहे.



> याबाबत माळशिरस वाहतूक नियंत्रक यांच्याशी संपर्क साधला असता आम्ही चालकांना सूचना देत आहे तसेच त्यांच्या लॉग शीट वरही खुडूस बस थांब्यावर बस थांबवावेत असा शिक्का मारून देत आहे
>
> **- श्री. कटके, माळशिरस वाहतूक नियंत्रक**

> काही दिवसात परीक्षा सुरु होत असून बसेस न थांबल्यास विद्यार्थ्यांचे नुकसान होणार आहे. याबाबत बस चालकांना याबाबत ताकीद देणे आवश्यक आहे.
>
> **-ओम बनकर, खुडूस, विदयार्थी.**

## ४ फेब्रुवारीला श्री संत शिरोमणी नरहरी महाराजांचा समाधी सोहळा




**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ३१ जानेवारी-**

वै.ह.भ.प. दिगांबर शंकर महामुनी यांचे प्रेरणेने विद्यामान वंशजामार्फत मुळ वास्तव्य स्थानी (जन्मस्थानी) सालाबाद प्रमाणे यंदाही सातशे वर्षाची परंपरा असलेले श्री संत शिरोमणी नरहरी महाराज यांचा ७४० वा समाधी सोहळा (पुण्यतिथी) उत्सव ३१ जानेवारी ते ५ फेब्रुवारी या कालावधीत साजरा होणार आहे. त्यानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन श्री संत नरहरी महाराज मुळ वास्तव्य स्थान विश्वकर्मा निवास, तानाजी चौक, पंढरपूर येथे करण्यात आल्याची माहिती समाधी सोहळा उत्सव समितीच्या पदाधिकाऱ्यांनकडून देण्यात आली.

श्री संत नरहरी महाराज समाधी सोहळा हा सात दिवस असणार असुन दररोज सकाळी ७ ते ८ श्री नरहरी महाराज मुर्तीस अभिषेक, सकाळी ८ ते ९ विष्णु सहस्त्रनामपाठ, सकाळी ९ ते १० नाममंत्र जप, सकाळी ११ त १२.३० श्री नरहरी महाराज गाथ्यावरील भजन, दुपारी ४ ते ५ हरिपाठ, रात्री ७ ते ९ नामवंत व परंपरागत कीर्तन सेवा होतील. तर समाधी दिन दि. ४ फेब्रुवारी रोजी दुपारी १२.०५ वा. समाधी व पादुकांवर पुष्पवर्षाव होईल. व रात्री नरहरी महाराज जीवन चरित्रावर सुश्राव्य किर्तन होईल. भाविकांनी अक्षर सवेचा लाभ घ्यावा असे संतचरणरज, संयोजक राधिका प्रमोद महामुनी, शंकर प्रमोद महमुनी यांनी कळविले आहे.

## श्री विठ्ठल सभामंडप येथे औसेकर महाराजांचे चक्रीभजन

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.३१ जानेवारी -**

आषाढी, कार्तिकी, माघी व चैत्री अशा चार प्रमुख यात्रा पंढरपूर येथे मोठ्या प्रमाणावर भरतात. त्यापैकी माघी यात्रा सध्या संपन्न होत असून, या यात्रा कालावधीत श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिराशी निगडित असलेल्या प्राचीन परंपरांचे कटाक्षाने पालन करण्यात येत आहे.

माघ शुद्ध त्रयोदशीच्या दिवशी श्री विठ्ठल सभामंडप येथे ह.भ.प. औसेकर महाराज यांच्या चक्रीभजनाची पारंपरिक परंपरा आहे. त्यानुसार शुक्रवार, दि. ३१ जानेवारी रोजी दुपारी ३ ते ५ या वेळेत श्री विठ्ठल सभामंडप येथे चक्रीभजन भक्तिभावाने संपन्न झाले.

सदर चक्रीभजन सद्गुरू गुरुबाबा महाराज औसेकर यांनी सादर केले. यावेळी श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीचे सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर, व्यवस्थापक संदेश भोसले, विभाग प्रमुख संजय कोकीळ, राजेंद्र सुभेदार, राजेश पिटले, अतुल बक्षी, राजेंद्र घागरे, राजाराम ढगे, सावता हजारे, शंकर मदने श्र तसेच सुमारे एक हजार ते दीड हजार भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



शके १७१८ पासून चक्रीभजनाची परंपरा देगुलर येथील गुरुगुंडा महाराजांकडून संस्थानचे मूळ पुरुष सद्गुरू विरनाथ महाराज यांना प्राप्त झाली आहे. चक्रीभजन म्हणजे संसाराच्या चक्रातून व भयातून मुक्त करणारे भजन असून, या भजनामध्ये काही भाविक बसून तर काही उभे राहून नृत्यात्मक पद्धतीने भजन करतात. या भजनातून देहाची विदेही अवस्था प्राप्त होत असल्याची अनुभूती मिळते. औसेकर घराण्याकडून सन १७९२ पासून माघ वारी काळात श्री विठ्ठल व श्री रुक्मिणी मातेच्या सेवार्थ चक्रीभजनाची अखंड परंपरा जोपासली जात आहे. चक्रीभजनामध्ये एकूण १४ भजने सादर केली जातात. या भजनातून वारकरी संप्रदाय पूर्णतः भक्तिरसात रंगून जातो, असे औसा संस्थानचे अध्यक्ष तसेच मंदिर समितीचे सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी सांगितले. दरम्यान, श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर समितीच्या वतीने मंदिरात होणारे विविध मोठे धार्मिक सोहळे व कार्यक्रम समाज माध्यमांद्वारे थेट प्रक्षेपित करण्यात येत आहेत. त्यानुसार सदर चक्रीभजन सोहळ्याचे थेट प्रक्षेपण मंदिर समितीच्या अधिकृत संकेतस्थळावर तसेच युट्युब व फेसबुक या समाज माध्यमांवर करण्यात आले. यामुळे हजारो भाविकांनी घरबसल्या या भक्तीमय सोहळ्याचा आनंद घेतला.

# ज्येष्ठ निरुपणकार विवेक घळसासी यांना पंढरी कलारत्न पुरस्कार

## कलासाधना सांस्कृतिक मंडळाचे पुरस्कार जाहीर; १५ फेब्रुवारीला वितरण









**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.३१ जानेवारी-**

कलासाधना सांस्कृतिक मंडळाच्या वतीने गेल्या १८ वर्षापासून साहित्य, कला, संगीत व नाट्य क्षेत्रातील दिग्गजांना पुरस्कार देण्यात येतात. मंडळातर्फे यंदाचा 'पंढरी कलारत्न' पुरस्कार ज्येष्ठ निरुपणकार विवेक घळसासी यांना देण्यात येणार आहे. माजी आमदार प्रशांत परिचारक यांच्या प्रमुख उपस्थितीत, सोलापूरचे दाते पंचांगकर्ते मोहन दाते यांच्या हस्ते तो प्रदान केला जाणार आहे.

सदर कार्यक्रम रविवार दि. १५ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ५-३० वा.येथील कर्मयोगी सभागृहात संपन्न होणार आहे. यावेळी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेतून सहाय्यक महसूलपदी निवड झाल्याबद्दल सोनिया शरद कागदे, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात भूगर्भशास्त्र विषयात सुवर्ण पदक प्राप्त केल्याबद्दल प्रतीक्षा भारत माळी, दिल्ली कॅपिटल्स संघाच्या टीम डॉक्टर व मुंबई क्रिकेट असोसिएशनच्या वरिष्ठ महिला संभाव्य संघात खेळाडू म्हणून निवड झाल्याबद्दल वेदिका चंद्रकांत मगर, महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या १९ वर्षाखालील मुलींच्या टी-२० व वनडे संघात निवड झाल्याबद्दल भक्ती गणेश पवार, राष्ट्रीय पातळीवर स्वच्छ व निरोगी भारत याविषयी माझ्या पाच कल्पना या शोध निबंधास राष्ट्रपती पारितोषिक मिळाल्याबद्दल संस्कार अशोक आवताडे, घनकचरा व्यवस्थापन या शोध निबंधास राष्ट्रपती पारितोषिक मिळाल्याबद्दल सार्थक सिध्देश्वर लेंगरे यांना विशेष गुणवत्ता पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार असल्याची माहिती कलासाधनाचे संस्थापक अध्यक्ष श्रीकांत बडवे-महाजन यांनी दिली.

यावेळी मंडळाचे उपाध्यक्ष प्रा. विनायक परिचारक, वा. गोभाळवणकर, सचिव ज्ञानेश्वर मोरे, डॉ. कैलाश करांडे, अमरसिंह चव्हाण, अभियंता राजेंद्र माळी, रणजीत पवार, अरिहंत कोठाडिया, अक्षय बडवे, डॉ. किरण बहिरवाडे, अभिराज बडवे, प्रा. राजेंद्र मोरे, राजकुमार शहा-तरडगावकर, डॉ. बसवराज सुतार, डॉ. आनंद भिंगे, राजकुमार आटकळे, बसवराज बिराजदार, प्रा. मंदार परिचारक, महेश अंबिके, अमृतभाई शहा, डॉ. किरण बहीरवाडे, अनंता नाईकनवरे, अशोक आवताडे, महेश देशपांडे, नारायण बडवे, मंदाकिनी देशपांडे, डॉ. मैत्रेयी केसकर, प्रतिभा यादव, सारिका कोठाडिया,अनिरुद्ध बडवे-पाटील, संतोष कुलकर्णी, शिवाजी यादव आदी कलासाधनाचे सदस्य उपस्थित होते.



# खासगी बिल्डर्सच्या माध्यमातून शहरात घरे देणे शक्य : आयुक्त सचिन ओंबासे

## क्रेडाई सोलापूरतर्फे प्रॉपर्टी एक्स्पोचे उद्घाटन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३१ जानेवारी-**

सोलापूर शहरात अद्याप ३० टक्के लोक झोपडपट्टीत राहतात. खासगी डेव्हलपर्स व बिल्डर्सच्या माध्यमातून त्यांना घरे उपलब्ध करून देणे शक्य आहे, असे प्रतिपादन महापालिका आयुक्त डॉ.सचिन ओम्बासे यांनी क्रेडाई एक्सपोच्या उद्घाटनप्रसंगी बोलताना केले.

नॉर्थकोर्ट मैदानावर भरलेल्या या प्रदर्शनाचे मुख्य प्रायोजकत्व सोलापूर जनता सहकारी बँक तर माऊली लँडमार्क व जेजेआरव्ही समर्थ प्रसाद हे सहप्रायोजकत्व स्वीकारले आहे. सोमवार, दि.२ फेब्रुवारी २०२६ पर्यंत दररोज सकाळी १० ते रात्री ८ यावेळेत हे प्रदर्शन चालू राहणार आहे. सुमारे ६५ स्टॉल्स् असून क्रेडाई सभासदांचे विविध प्लॉटस्, फ्लॅटस्, बंगलोज्, रो-हाऊसेस, कमर्शिअल कॉम्प्लेक्स्, अनेक बिल्डिंग मटेरियल सप्लायर्स, वित्तीय संस्था भाग घेतले आहेत. याठिकाणी गृहकर्जाचीही माहिती मिळणार आहे. रविवार, १ फेब्रुवारी रोजी रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. क्रेडाई ही सर्व कायदे पाळून ग्राहकांना वेळेत घर देणे व स्वत:वर व्यावसायिक बंधने पाळून कार्य करणारी बांधकाम व्यावसायिकांची राष्ट्रीय संघटना असून क्रेडाई सभासदांकडून याचे काटेकोरपणे पालन केले जाते. ग्राहकांच्या अडी अडचणीही सोडविल्या जातात, असे सांगण्यात आले. सोलापूर जनता सहकारी बँकेचे अध्यक्ष सुनील पेंडसे याप्रसंगी बोलताना म्हणाले की, घर प्लॉट घेण्यासाठी एकाच ठिकाणी सर्व गोष्टी पहायला मिळणार आहेत.

बँकेने हाउसिंग लोन साठी मार्च पर्यंत साडेसात टक्के व्याजदर ठेवला आहे. क्रेडाईच्या गव्हर्नमेंट कौन्सिलचे सदस्य सुनील फुरडे यांची प्रमुख उपस्थिती होती. क्रेडाईच्या सोलापूर शाखेचे अध्यक्ष अभिनव साळुंखे यांनी प्रास्ताविक केले. उपाध्यक्ष संतोष सुरवसे यांनी आभार मानले. सूत्रसंचालन अर्पिता खडकीकर यांनी केले. यावेळी आनंद पाटील, दक्ष पटेल, मिलिंद लोलगे, वूमेन्स विंगच्या दीपाली गांधी, वामीनी तापडिया, उमेश लोलगे, राजेंद्र शहा-कांसवा, संजय पटेल, संतोष कलगुटगी, वेदांत मुंदडा, अविनाश बच्चूवार, समीर गांधी, अभिषेक राव, ईश्वर मालू, अभय सुराणा, गुरुराज येल्लटी, सिद्वेश्वर जोकारे, जयंत होले-पाटील, स्मित गांधी, अनुषा बच्चूवार आदी उपस्थित होते.

## महापालिका सभागृह झाले सज्ज




**सोलापूर महापालिकेत नव्याने निवडून आलेल्या पदाधिकाऱ्यांसाठी सभागृह सज्ज झाले आहे.**

# मोहोळमध्ये उद्यापासून रामदासनवमी सप्ताह

**तभा वृत्तसेवा,**
**मोहोळ, दि. ३१ जानेवारी**

देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण शिक्षणोत्तेजक संस्था मोहोळ यांच्यावतीने श्री रामदासनवमी सप्ताह सोहळा होणार असल्याची माहिती अध्यक्ष, माजी प्राचार्य बाजीराव जोशी व सचिव जयेश आराध्ये यांनी दिली.

या सोहळ्यामध्ये दररोज पहाटे ५.३० वाजता रामफेरी, दुपारी १२ ते ४ यादरम्यान सामुदायिक दासबोध पारायण, सायंकाळी ६ ते ७.३० यादरम्यान प्रवचने होणार आहेत. सोमवार दि.२ फेब्रुवारी रोजी हेग्रसवंशज विनायकबुवा मोहोळकर यांच्या हस्ते, प्रा.बाजीराव जोशी यांच्या उपस्थितीत दीपप्रज्वलन व श्री समर्थ प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन



कार्यक्रमाची सुरुवात होईल.

दैनंदिन प्रवचनांमध्ये दि. २ रोजी विनायकराव तथा अरुण बुवा मोहोळकर यांचे भक्ती मार्ग दि. ३ रोजी सोलापूर दैनिक तरुण भारतचे उपसंपादक शाम जोशी यांचे दास सर्वोत्तमाचा, दि. ४ रोजी दत्तात्रय मोकाशी यांचे श्री समर्थ कृत सोलीव सुख, दि.५ रोजी विनया संकेत कुलकर्णी उत्पात यांचे भक्तीपंथेंची जावे, दि.६ रोजी बाजीराव जोशी यांचे दासबोध, दि. ७ रोजी सुयोग केसकर यांचे उपासनेचा मोठा आश्रयो, दि.८ रोजी अमित देशपांडे यांचे तुम्ही देवाचे भजन, दि.९ रोजी जयवंत समुद्र यांचे शिष्य लक्ष्मण, दि.१० रोजी जयेश आराध्ये यांचे श्रीरामाचा मागोवा, अशी प्रवचने होतील. दि.११ फेब्रुवारी बुधवार रोजी दुपारी बारा वाजता पुष्पवृष्टी, आरती व नंतर प्रसादाचा कार्यक्रम होईल.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी माजी प्राचार्य दिलीप देशपांडे, अॅड. अमोल देशपांडे, राजाभाऊ देशमुख, दत्तात्रय कुलकर्णी, भाऊ सारोळकर, अलकनंदा कुलकर्णी, नंदा देशपांडे, महेश सोवनी आदी परिश्रम घेत आहेत.

# बार्शीतील महाआघाडीचा प्रयोग यशस्वी होणार का?

**तभा वृत्तसेवा । अरुण बळप**
**बार्शी, दि. ३१ जानेवारी-**

बार्शी तालुक्यातील राजकीय घडामोडी नेहमीच चर्चेत राहिले आहेत. यावेळी भाजपा विरुध्द शिवसेना शिंदे गट, राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार), ठाकरे शिवसेना असे एकत्र येत महाआघाडीचा प्रयोग करण्यात आला आहे. भाजपला रोखण्यासाठी ही महाआघाडी काय घडवणार ? याकडे साऱ्या तालुक्याचे लक्ष लागले आहे.

आमदार दिलीप सोपल व माजी आमदार राजेंद्र राऊत यांनी जिल्हा परिषदेचे ६ गट व पंचायत समितीच्या १२ गणात उमदे व सरस उमेदवार दिले आहेत. त्यामुळे एकतर्फी लढत होईल, असा एकही गट आणि गण नसल्याने या सर्व लढती अटीतटीच्या होणार आहेत.उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनामुळे मोठ्या प्रचारसभा, फटाक्यांची आतषबाजी, हलगीचा नाद असले काहीही नसणार हे दोन्ही नेत्यांनी यापूर्वीच सांगितले आहे. मतदारांच्या प्रत्यक्ष भेटी यावर उमेदवार व कार्यकर्त्यांना भर दिला आहे. प्रचाराचा फारसा गाजावाजा नसला तरी उमेदवार घरोघरी जात आहेत. माजी आमदार राजेंद्र राऊत यांनी आगळगाव येथे प्रचारसभाही ठेवली आहे. दरम्यान आमदार सोपल यांचे समर्थक राऊत यांच्या गटात सामील होण्याचे प्रमाणही वाढले आहे.

# खवले नसलेल्या सापाची जागतिक नोंद

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३१ जानेवारी**

साधारणपणे सर्वच सापांच्या शरीरावर संरक्षणासाठी खवले असतात. मात्र नागपूरमध्ये आढळलेल्या एका पाणदिवड सापामध्ये ही नैसर्गिक रचना पूर्णपणे अनुपस्थित असल्याचे आढळून आले असून, या अत्यंत दुर्मिळ अवस्थेची जागतिक स्तरावर शास्त्रीय नोंद झाली आहे. सोलापूर येथील सर्प अभ्यासक व संशोधक राहुल शिंदे यांचे यावरील संशोधन अमेरिकेतील कंसास आंतरराष्ट्रीय विद्यापीठाच्या अग्रगण्य आंतरराष्ट्रीय जर्नलमध्ये २६ जानेवारी रोजी प्रकाशित झाले आहे.

सापांच्या त्वचेवरील खवले बीटा-केराटिन या प्रथिनांपासून बनलेले असतात. हे खवले त्वचेला मजबुती देणे, पाणी टिकवणे तसेच भक्षकांपासून संरक्षण करतात. काही दुर्मिळ परिस्थितींमध्ये जनुकीय किंवा पर्यावरणीय कारणांमुळे या प्रथिनांची निर्मिती बाधित होते आणि साप खवलेविरहित जन्माला येतो. या अवस्थेला शास्त्रीय भाषेत मेरोलेपिडोसिस असे म्हणतात. ही दुर्मिळ अवस्था ११ जुलै २०२४ रोजी नागपूरच्या निरंजन नगर परिसरातील एका घरात आढळलेल्या सुमारे ६० सेंटीमीटर लांबीच्या पाणदिवड सापामध्ये दिसून आली. सर्पमित्र संतोष सोनी व गजू पटले यांनी सापाचे निरीक्षण करून त्याची



छायाचित्रे राहुल शिंदे यांना पाठवली. छायाचित्रांमधून पाठीवरील खवले पूर्णपणे अनुपस्थित असल्याचे स्पष्ट झाले. सखोल अभ्यासानंतर ही पाणदिवड सापामधील मेरोलेपिडोसिसची जगातील पहिलीच नोंद ठरली.

यापूर्वी २०२१ मध्ये सोलापूर येथे दोन नागांमध्ये आणि २०२३ मध्ये गुजरातमधील पोरबंदर येथे एका तस्कर सापामध्ये अशी अवस्था नोंदवली गेली होती. विशेष म्हणजे भारतातील सर्वच नोंदी औद्योगिक किंवा प्रदूषित भागांमधून झाल्या असून, पर्यावरणातील विषारी घटकांचा वन्यजीवांच्या जनुकांवर परिणाम होत असल्याची शक्यता या संशोधनातून अधोरेखित करण्यात आली आहे. या संशोधनासाठी देवेंद्र भोसले, ओंकार यादव, युनूस मणेर, अनिल अलदार यांच्यासह अनेक सर्पमित्रांचे मोलाचे सहकार्य लाभले असून, ही नोंद भारतीय सर्प-अभ्यासासाठी महत्त्वपूर्ण ठरली आहे.

# सांगोला तालुक्यात रा.काँ.पक्ष उमेदवारांचा प्रचार शुभारंभ



**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. ३१ जानेवारी-**

सांगोला तालुक्यातील कोळा, घेरडी, कडलास या जिल्हा परिषद व पंचायत समिती गणातील राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष व मित्र पक्षांच्या अधिकृत उमेदवारांचा प्रचार शुभारंभ खा.धैर्यशील मोहिते पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला.

याप्रसंगी उपमुख्यमंत्री स्व.अजितदादा पवार यांना खा.धैर्यशील मोहिते पाटील यांनी श्रद्धांजली अर्पण केली. कोळा जि.प.गटाचे उमेदवार सदानंद पांढरे व पं.स.गणाच्या विद्या बिले, घेरडी जि.प.गटाच्या शुभांगी मोटे व पं.स.गणाचे श्रीनिवास करे, कडलास जि.प.गटाच्या संचिता टापरे व कडलास पं.स.गणाचे अजित गायकवाड तसेच अजनाळे पं.स.गणाचे अक्षय भजनावळे या सर्व अधिकृत उमेदवारांना मोठ्या मताधिक्याने निवडून देण्याचे आवाहन खा.धैर्यशील मोहिते पाटील यांनी यावेळी केले.

# वराती मागून घोडं अशी भालके आणि अभिजित पाटलांची अवस्था


## जागा वाटप, उमेदवार माघारी घेणार याची माहिती नाही

## पत्रकार परिषद घेवून आघाडीची करण्यात आली घोषणा

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.३१ जानेवारी-**

पंढरपूर तालुक्यातील पंचायत समिती आणि जिल्हा परिषद निवडणुकीच्या मतदानाला अवघा आठवडाभराचा कालावधी शिल्लक राहिलेला असताना आमदार अभिजीत पाटील आणि भगीरथ भालके यांच्या आघाडीची घोषणा झाली. यावेळी ना जागा वाटपाची माहिती, ना कोणते उमेदवार माघारी घेणार याची माहिती केवळ आमची आघाडी झाल्याची घोषणा पत्रकार परिषदेत करण्यात आली. या दोघांच्या आघाडीच्या घोषणेमुळे वराती मागून घोडं ही म्हण प्रत्ययास येत असल्याची तालुक्याच्या राजकीय वर्तुळात चर्चा रंगू लागली आहे.

अत्यंत गोंधळालेल्या स्थितीत झालेल्या पत्रकार परिषदेमध्ये आमदार अभिजीत पाटील आणि भगीरथ



भालके यांनी आघाडीमध्ये जागावाटप कसे झाले? अर्ज माघारी घेण्याची मुदत संपली, प्रचाराला सुरुवात झाल्याने कोणत्या जागेवर कुठल्या आघाडीचा किंवा पक्षाचा उमेदवार कोणाला पाठिंबा देणार? याबाबतची कुठलीही स्पष्टता जाहीर केली नाही. या सर्व विषयावर पत्रकार परिषदेमध्ये पत्रकारांनी विचारलेल्या प्रश्नांना आमदार अभिजीत पाटील किंवा तीर्थक्षेत्र विकास आघाडीचे प्रमुख भगीरथ भालके यांना समर्पक उत्तर देता आले नाही.

जागा वाटपात अद्याप आमची चर्चा सुरु आहे. जागावाटप झाले की आपल्याला कळविण्यात येईल, असे थातूरमातूर उत्तर देऊन पत्रकार परिषद गुंडाळण्याचा

### स्व.अजितदादांना हीच खरी श्रध्दांजली

आपण आणि भगिरथ भालके दोघे एकत्र आल्याने पंचायत समितीवर आघाडीचा झेंडा फडकवू. हीच खरी उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांना श्रध्दांजली असणार आहे. समोरच्या उमेदवारांचा सुफाडा साफ करु, असे आमदार अभिजीत पाटील यांनी सांगितले.

### आमचाच खरा विठ्ठल परिवार

आमचाच खरा विठ्ठल परिवार आहे. जे आम्हाला किंवा विठ्ठल परिवाराला सोडून गेले त्यांनी विचारधारा बदलली आहे आम्ही आमच्या विचारधारेवर ठाम आहोत. दोन दिवसांमध्ये जागावाटप निश्‍चित होईल. जनतेच्या विकासासाठी आम्ही एकत्र आलो, असे तीर्थक्षेत्र विकास आघाडीचे प्रमुख भगीरथ भालके यांनी सांगितले.

### राजकारणाचा अक्षरश: पोरखेळ केला

वसंतनाना देशमुख यांच्याशी संपर्क केला असता ते म्हणाले, आमदार अभिजीत पाटील, भगीरथ भालके यांनी तालुक्याच्या राजकारणाचं अक्षरशः पोरखेळ केला आहे. आम्ही आमच्या कासेगाव जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या दोन्ही जागा पक्ष म्हणून लढणार आहोत.

दोघांकडून प्रयत्न केला गेला. या पत्रकार परिषदेला आमदार अभिजीत पाटील, मनसे नेते दिलीप धोत्रे, नगरसेवक नागेश काका भोसले आणि तीर्थक्षेत्र विकास आघाडीचे प्रमुख भगीरथ भालके उपस्थित होते.

पंढरपूर तालुक्यात जिल्हा परिषदेच्या आठ गटासाठी तर पंचायत समितीच्या सोळा गणांसाठी निवडणूक होत आहे. निवडणूक जाहीर झाल्यापासून आमदार अभिजीत पाटील आणि भगीरथ भालके एकत्र येणार अशी चर्चा सुरु होती. मात्र अर्ज मागे घेण्याच्या शेवटच्या दिवसापर्यंत चर्चा यशस्वी झाली नाही. अखेर उमेदवारांनी प्रचाराला सुरुवात केल्यानंतर शनिवारी पत्रकार परिषद घेवून पाटील आणि भालके यांनी आपल्या आघाडीची घोषणा केली.

वास्तविक दोघांच्याही उमेदवारांकडून प्रचार यंत्रणा राबवून प्रचार सुरु करण्यात आलेला आहे. अशातच आघाडीची घोषणा झाल्याने दोन्ही बाजूचे उमेदवार, पदाधिकारी आणि कार्यकर्ते संभ्रमात आहेत. विशेष म्हणजे, आजच्या पत्रकार परिषदेच्या वेळी दोघांकडील जिल्हा परिषद गटातील किंवा पंचायत समिती गणातील एकही उमेदवार हजर नव्हता. या बरोबरच दोन्हीं प्रमुख नेत्यांनी पत्रकार परिषदेमध्ये आपसात ठरविल्याप्रमाणे जागावाटपाची माहिती देखील दिली नाही. त्यामुळे निवडणूकीच्या रिंगणात लढत असलेले उमेदवार, पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांना वाऱ्यावर सोडून केवळ नेतेमंडळींच एकत्र आलेत का? असा सवाल उपस्थित केला जात आहे.

आजच्या पत्रकार परिषदेला राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष वसंत देशमुख यांची अनुपस्थिती नजरेआड करण्यासारखी नव्हती. पत्रकारांनी आमदार अभिजीत पाटील आणि भालके यांच्याकडे याबाबत विचारणा करण्यात आली. त्यावेळी जिल्हाध्यक्ष वसंतनाना देशमुख यांच्या कुटुंबामध्ये कार्यक्रम असल्याने ते गैरहजर असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तरुण भारत कार्यालय, स्वेतसागर निवास, राजमाता जिजामाता महाविद्यालयजवळ, पत्रकार रोड, शिवनगर, जि. लातूर - ४१३५१२. कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. दूरध्वनी : ८८८८८४७२३९ ● मुख्य समुह संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक : **प्रशांत वसंतराव माने** (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दैनिक सोलापूर तरुण भारत. **RNI No. MAHMAR/2023/86477. E-mail starunbharatgmail.com.** ● **Websate:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.

**Owned by, SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LTD. Printed by, Published by** DILIP SHIVMURTI DULANGE **Printed at** SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LT. 19,20 INDUSTRIAL ESTATE, HOTGI ROAD, SOLAPUR, Dist. SOLAPUR, 413003. **Publised at** TARUN BHARAT OFFICE, SwetSagar Niwas, Near Rajmata Jijamata College, Patrakar Road, Shivnagar, Dist. Latur Pin 413512, **RNI No. MAHMAR/2023/86477**

● **CHIEF GROUP EDITOR :** DILIP YASHWANT PETHE ● **CHIEF EDITOR :** PRASHANT VASANTRAO MANE

लातूर
दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष शिबिर

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ३१ जानेवारी :** स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड, ग्रामपंचायत साखरा आणि दयानंद शिक्षण प्रसारक मंडळ, बाभळगाव द्वारा संचलित कै. व्यंकटराव देशमुख महाविद्यालय, बाभळगाव यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राष्ट्रीय सेवा योजना विशेष युवक शिबिर सांगता समारंभ साखरा ता. जि. लातूर येथे आयोजित करण्यात आले होते. ध्यक्षस्थानी दयानंद शिक्षण प्रसारक मंडळ, बाभळगाव उपाध्यक्ष नरसिंह देशमुख होते तर मंचावर प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे सदस्य भीमराव शिंदे, डॉ. दशरथ भिसे, प्राचार्य डॉ. दुष्यंत कटारे, मुख्याध्यापक स्वामी, गायकवाड यांची उपस्थिती होती.

डॉ. दशरथ भिसे यांनी राष्ट्रीय सेवा योजनेचे सामाजिक महत्त्व अधोरेखित केले. युवकांनी समाजाशी जोडलेले राहून राष्ट्रनिर्मितीत सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन केले. सेवा, शिस्त आणि समर्पण या मूल्यांचा अंगीकार केल्यास विद्यार्थी खऱ्या अर्थाने जबाबदार नागरिक घडू शकतात, असे ते म्हणाले. प्राचार्य डॉ. दुष्यंत कटारे म्हणाले, विशेष शिबिराच्या यशस्वी आयोजनात गावकऱ्यांचे मोलाचे सहकार्य लाभले. निवास, भोजन तसेच उपक्रमांच्या अंमलबजावणीसाठी गावकऱ्यांनी दिलेल्या सहकार्याबद्दल मी कृतज्ञता व्यक्त करतो.

प्रास्ताविक कार्यक्रमाधिकारी डॉ. सुरेशकुमार कांबळे यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. माना गायकवाड यांनी केले.



# जि. प. च्या शाळा- विद्यार्थ्यांचे आता होणार सोशल ऑडिट

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ३१ जानेवारी :**

जिल्हा परिषद शाळांतील विद्यार्थ्यांचे आणि शाळांचे सोशल ऑडिट करण्याचा निर्णय घेण्यात आला असून, समग्र शिक्षा अभियानांतर्गत केंद्राद्वारे शाळांना मोफत पुस्तके, गणवेश व विद्यार्थ्यांचा शैक्षणिक दर्जा उंचावण्यासाठी साहित्य खरेदीस दरवर्षी मोठी रक्कम दिली जाते. एवढा खर्च करूनही शैक्षणिक गुणवत्ता वाढत नसल्याचा सरकारला संशय आहे. त्यामुळे हा निर्णय घेण्यात आल्याचे बोलले जात आहे.

दरवर्षी नव्या शैक्षणिक वर्ष प्रारंभाच्या पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांना मोफत पुस्तके, गणवेश दिली जातात. शिक्षणाचा दर्जा, गणवेशाचा दर्जा, शिक्षक कसे शिकवतात, साहित्य-सामग्री आहे का, अशा अनेक मुद्दे सोशल ऑडिटमध्ये पाहिले जाणार आहेत. समग्र शिक्षा अभियानांतर्गत जिल्हा परिषद शाळांसह खाजगी शाळांनाही मोफत पुस्तके, गणवेश दिले जातात. दरवर्षी यावर मोठी रक्कम खर्च केली जाते. या रक्कमेचा योग्य विनियोग होतो का? हे राज्य सरकार पाहणार आहे. सोशल ऑडिट करण्याच्या पार्श्वभूमीवर सरकारने महाराष्ट्र राज्य सामाजिक अंकेक्षण व पारदर्शकता सोसायटीसोबत करार केल्याचे सांगण्यात येत आहे. या सोशल ऑडिटमध्ये नेमके काय बाहेर येते? याकडे आता शिक्षण क्षेत्रातील अनेक दिग्गजांचे लक्ष लागले आहे.

विद्यमान परिस्थितीत जिल्हा परिषद शाळांचे हाल आहेत. पटसंख्येत झपाट्याने कमी येत आहे. अनेक जिल्ह्यात शिक्षक अतिरिक्त होत आहेत. मोजक्या गुणवंत शिक्षकांच्या शाळा सोडल्या तर गुणवत्तेबाबतही ऐसीतैसीच आहे. त्यामुळे सरकारला चिंता व्यक्त वाटत असून आता शाळा व विद्यार्थ्यांचे सोशल ऑडिट करून खर्च केलेल्या पैशातून नेमके काय साध्य झाले, याची शहनिशा करण्यात येणार आहे.



## विविध वृत्त...

### जिजाऊ इंग्लिश स्कूलमध्ये प्रजासत्ताक दिन साजरा

**लातूर:** चाकूर तालुक्यातील नळेगाव येथील जिजाऊ इंग्लिश स्कूलमध्ये प्रजासत्ताक दिनी भीवाजी गव्हाणे यांच्या हस्ते ध्वजारोहण झाले. अध्यक्षस्थानी सतीश येडले होते. प्रजासत्ताक दिनाच्या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून महाराष्ट्र राज्य शिक्षक संघाचे राज्य सरचिटणीस लायक पटेल, तुकाराम नरवाडे, बळीराम जाधव, दत्तात्रय बिराजदार, अमोल हुडगे, सोपान सूर्यवंशी, किशोर बिराजदार, संतोष तेलंगे उपस्थित होते. लायक पटेल यांनी आपल्या भाषणात जिजाऊ इंग्लिश स्कूलचा विस्तार पाहून कौतुक केले. पटेल यांच्या हस्ते दिनदर्शिकेचे प्रकाशन करण्यात आले. यावेळी स्कूलचे संचालक तुकाराम नरवाडे, कैलास रेड्डी, व्यवस्थापकीय संचालक पिंकू मुख्याध्यापिका रेश्मा घोरवाडे, उपमुख्याध्यापिका कोरे, सांस्कृतिक विभाग प्रमुख मुट्टे, परीक्षा विभाग प्रमुख रंजना हुडगे, क्रीडा विभाग प्रमुख दिपाली पारवे, भाग्यश्री कदम, प्रियंका काळे, प्रियंका शिंदे व विद्यार्थी, कर्मचारी उपस्थित होते.

### अजितदादांना शहर भाजपाची श्रद्धांजली

तभा वृत्तसेवा

**लातूर:** लातूर शहर भारतीय जनता पार्टीच्या वतीने दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहण्यात आली.महाराष्ट्राच्या मातीशी नाळ जोडलेले आणि कार्यकर्त्यांना सदैव उपलब्ध होणारे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी कायम राज्याच्या हिताचा आणि विकासाचा ध्यास घेतला होता. खऱ्या अर्थाने जनतेला समर्पित असणारे नेतृत्व आपण गमावले असल्याचे सांगून त्यांच्या सारखा नेता पुन्हा होणे नाही, अशा शब्दात लातूर भाजपचे शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर यांनी शोक सभेत श्रद्धांजली अर्पण केली. यावेळी भाजपचे नगरसेवक, पदाधिकारी, प्रमुख कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.

### अनधिकृत वृक्षतोड थांबविण्याची मागणी

**लातूर:** लातूर जिल्ह्यामध्ये मोठ्या प्रमाणात अनधिकृत वृक्षतोड सुरू असल्याचे प्रकार समोर येत असून, यामुळे पर्यावरणाचा समतोल धोक्यात येत आहे. या गंभीर बाबीकडे लक्ष वेधण्यासाठी व्ही. एस. पँथर्स युवा संघटनेच्या वतीने वनपरिक्षेत्र अधिकाऱ्यांची भेट घेऊन निवेदन देण्यात आले. वनपरिक्षेत्र अधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात असे नमूद करण्यात आले आहे की, जिल्ह्यात अनेक ठिकाणी बेकायदेशीर वृक्षतोड सुरू असून याबाबत वारंवार तक्रारी करूनही संबंधित अधिकारी ठोस कारवाई करत नसल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे यामागे काही आर्थिक व्यवहार होत असल्याची शंका निर्माण झाली आहे. वनपरिक्षेत्र अधिकाऱ्यांनी या प्रकरणाची सखोल चौकशी करून अनधिकृत वृक्षतोड करणाऱ्यांवर तातडीने कठोर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. याप्रकरणी लवकरात लवकर कारवाई न झाल्यास व्ही. एस. पँथर्सच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही यावेळी देण्यात आला. निवेदनावर जिल्हा कार्याध्यक्ष अकबर शेख, शाखा प्रमुख विनोद कांबळे, शहर उपाध्यक्ष युनूस शेख, महादेव शिंदे, तोफीक शेख, बाबा शेख, रोहन वाघमारे आदी पदाधिकाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

### परिमल विद्यालयात वार्षिक स्नेहसंमेलन

**लातूर:** परिमल माध्यमिक विद्यालय, लातूर येथे पाचवी ते दहावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात साजरे करण्यात आले. सुमारे ३०० विद्यार्थ्यांनी या वार्षिक स्नेहसंमेलनात सहभाग घेऊन कार्यक्रम मोठ्या उत्साहात साजरा केला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी लातूर शहर उपविभागीय पोलिस अधिकारी समीरसिंह साळवे हे होते.यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून प्राथमिक शिक्षणाधिकारी तृप्ती अंधारे, गोविंद घार, रामदास पवार, डि. एन. केंद्रे, निलेश राजमाने, परिमल शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव जाधव बी. एस., प्राचार्य श्रीनिवास जाधव पाटील, मुख्याध्यापक सुमन पवार उपस्थित होते. वार्षिक स्नेहसंमेलनाच्या कार्यक्रमाचे प्रास्ताविकबी. एस. जाधव यांनी केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष समीर साळवी आणि प्रमुख पाहुणे तृप्ती अंधारे यांनी विद्यार्थ्यांना उपयुक्त असे मार्गदर्शन केले. स्नेहसंमेलनात वार्षिक विद्यार्थ्यांमध्ये उत्साह आणि आनंदी वातावरण होते. अनेक विद्यार्थ्यांनी अप्रतिम कलांचे सादरीकरण या कार्यक्रमात सादर केले.

# निवडणुकीच्या कामावरील १ हजार २४६ शिक्षकांची मतदानाच्या दिवशीच परीक्षा; प्रशासनापुढे पेच

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ३१ जानेवारी :**

लातूर जिल्हा परिषदेच्या ५९ गटासाठी व १० पंचायत समित्यांच्या ११८ गणांच्या सदस्य पदाच्या निवडीसाठी दि. ५ फेब्रुवारी रोजी मतदान, ७ फेब्रुवारी रोजी मतमोजणी होणार होती. मात्र राज्यात उदभवलेल्या राजकीय परिस्थितीमुळे निवडणूक आयोगाने निवडणूकीच्या कार्यक्रमात बदल करून दि. ७ फेब्रुवारी रोजी मतदान व ९ फेब्रुवारी रोजी मतमोजणी घेण्याचा निर्णय घेतला. पण याच दिवशी निवडणुक जवळपास १ हजार २४६ शिक्षकांची सीटीईटी परीक्षा येत असल्याने निवडणूक विभाग प्रशासनासमोर नवा पेच निर्माण झाला आहे. सीटीईटी परीक्षेसाठी निवडणूक विभाग शिक्षकांना निवडणूकीच्या कामातून वगळणार का ? असा प्रश्न निर्माण झाला आहे.



जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या सार्वत्रिक निवडणूक २०२६ पार पाडणयासाठी जिल्हा परिषद शिक्षकांना निवडणूक आदेश प्राप्त झाले आहेत. परंतु निवडणूक आयोगाच्या फेरबदलामुळे ७ व ८ फेब्रुवारी शिक्षकांच्या सीटीईटी परीक्षा पार पडणार आहेत. त्या शिक्षकांची तांत्रीक आडचण निर्माण झाली आहे. शिक्षकांच्या तांत्रीक आडचणीचा विचार करून सीटीईटी परीक्षा देणाऱ्या शिक्षकांना निवडणूक कर्तव्यातून सुट द्यावी, अशी मागणी जिल्हाधिकारी यांच्याकडे अखिल महाराष्ट्र प्राथमिक शिक्षक संघाचे राज्य उपाध्यक्ष परमेश्रवर बालकुंदे व जिल्हाध्यक्ष तथा मराठवाडा विभागीय अध्यक्ष सुनीलकुमार हाके यांनी निवेदनाद्वारे केली आहे.

या १० पंचायत समित्यांचा सार्वत्रिक निवडणूक कार्यक्रम जाहीर केला आहे. या निवडणुकीसाठी १ हजार ७५३ मतदान केंद्रावर ५ फेब्रुवारी रोजी मतदान, ७ फेब्रुवारी रोजी मतमोजणी होणार होणार होती. त्यानुसार विविध पक्ष, त्यांचे उमेदवार, कार्यकर्ते प्रचाराच्या रणधुमाळीत रंगले असताना अचानक उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचे विमान अपघात अचानक निधन झाल्याने सर्वच यंत्रणावर त्याचा परिणाम झाला.लातूर तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या १० गट व २० गणासाठी दि. ७ फेब्रुवारी रोजी मतदान होणार आहे. याच दिवशी निवडणूक प्रक्रीयेत सहभागी असलेले ३४७ शिक्षक परीक्षा देणार आहेत.

लातूर तालुक्यात निवडणुकीसाठी अतिशय माफक मनुष्यबळ आहे. लातूर जिल्हा परिषदेच्या १० गट व २० गणासाठी ७ फेब्रुवारी रोजी मतदान व ९ फेब्रुवारी रोजी मतमोजणी होणार आहे. या निवडणूकीत १ हजार ७५३ मतदान केंद्रावर १४ लाख ९९ हजार १९० मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहेत. या निवडणूक प्रक्रियेसाठी एकूण १० हजार ५१८ अधिकारी व कर्मचा-यांची नियुक्ती करण्यात आले असून या कर्मचा-यांचे जवळपास दोन प्रशिक्षण पूर्ण झाले आहेत. तर तिसरे प्रशिक्षण हे मतदानाच्या एक दिवसापूर्वी आहे, त्यामुळे नविन कर्मचा-यांची नियुक्ती करतांना त्यांनाही दोन प्रशिक्षण निवडणूक विभागाला द्यावे लागणार आहेत. झाला. या निवडणूकीसाठी पुरेसा वेळ मिळावा म्हणून निवडणूक आयोगाने निवडणूक कार्यक्रमात बदल करत ५ फेब्रुवारी रोजी होणारे मतदान आता ७ फेब्रुवारी रोजी, तर ९ फेब्रुवारी रोजी मतमोजणी घेण्याचा निर्णय घेतला.

केंद्र शासनाच्यावतीने दि. ७फेब्रुवारी रोजी शिक्षकांची सीटीईटी परीक्षा घेतली जाणार आहे. या परीक्षेस जिल्हयातील ५ हजार शिक्षक पात्र असून त्यापैकी १ हजार २७३ प्राथमिक शिक्षकांनी परीक्षेसाठी अर्ज केलेला आहे. त्यापैकी १ हजार २७ प्राथमिक शिक्षक, तर १२२ माध्यमिक शिक्षक निवडणूकीच्या कामात आहेत. उदगीर तालुक्याची संख्या अंदाजे ९७ ग्रहीत धरून एकूण प्राथमिक व माध्यमिक जवळपास १ हजार २४६ शिक्षकांची दि. ७ फेब्रुवारी रोजी सीटीईटी परीक्षा नांदेड, सोलापूर, पुणे, छत्रपती संभाजीनगर आदी ठिकाणी होणार आहे.

ज्या शिक्षकांची परीक्षा आहे. त्यांना या कामातून वगळावे लागणार आहे. निवडणूक विभागाकडे राखीव कर्मचारी असतात. तसेच जळकोट, देवणी, औसा, उदगीर या तालुक्यांना पुरेसे कर्मचारी आहेत. उर्वरित लातूर, निलंगा, शिरूर अनंतपाळ, चाकूर, अहमदपूर आदी तालुक्यांना मनुष्यबळाची गरज भासणार आहे. त्यामुळे बाजूच्या तालुक्यातील कर्मचाऱ्यांना निवडणूकीव्या कामासाठी घेण्याचा विचार आहे. तशी माहिती जिल्हाधिकारी यांना दिली असून चर्चा करून निर्णय घेतला जाणार असल्याचे उपजिल्हाधिकारी सायली ठाकूर यांनी सांगीतले.

## ॲड. दीपक मठपती यांची भाजपच्या गटनेतेपदी निवड

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ३१ जानेवारी :** लातूर शहर महानगरपालिकेत भारतीय जनता पार्टीच्या वतीने गटनेतेपदी ॲड. दीपक मठपती यांची निवड करण्यात आली आहे.

प्रभाग क्रमांक १५ मधून दुसऱ्यांदा निवडून आलेले ॲड. मठपती यांच्या नावाच्या ठरावाला सूचक म्हणून याच प्रभागातील नगरसेवक प्रवीण कस्तुरे तर प्रभाग एकचे नगरसेवक ऋषिकेश राजे हे अनुमोदक आहेत. नुकत्याच झालेल्या महानगरपालिका निवडणुकीत भारतीय जनता पार्टीला २२ जागांवर यश मिळाले. मागील निवडणुकीत ७० पैकी ३६ जागा जिंकलेल्या भाजपाला यावेळी सत्तेपासून दूर ठेवत काँग्रेसने वंचित आघाडीच्या सोबतीने तब्बल ४७ जागा जिंकल्या.



काँग्रेसच्या मनपा गटनेतेपदी विजयकुमार साबदे यांची निवड करण्यात आली आहे. दरम्यान, शुक्रवारी (दि. ३०) छत्रपती संभाजीनगर येथील विभागीय आयुक्तांकडे भाजप शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर यांनी मनपातील पक्षाचे गटनेते म्हणून ॲड. दीपक मठपती यांच्या निवडीच्या ठरावाचे पत्र सादर केले. यावेळी भाजपचे नवनिर्वाचित सर्व सदस्य उपस्थित होते. २०११ ते २०१७ या काळात ॲड. मठपती यांनी मनपाचे विधी सल्लागार म्हणून काम पाहिले. त्यानंतर २०१७साली झालेल्या निवडणुकीत ते प्रभाग क्रमांक १५ मधून भाजपाच्या तिकीटावर नगरसेवक झाले. या कालावधीत शेवटचे तीन वर्षे त्यांनी स्थायी समितीचे सभापती म्हणूनही जबाबदारी पार पाडली. नुकत्याच झालेल्या निवडणुकीत ॲड. मठपती पूर्वीच्याच प्रभागातून विजयी झाले आहेत.

मागील निवडणुकीत सत्ता स्थापन केलेल्या भारतीय जनता पार्टीने सुरुवातीच्या अडीच वर्षात जनहिताची अनेक कामे केली. शहर विकासासाठी विविध योजना राबविल्या. दुर्दैवाने पुढील अडीच वर्षात सत्तासमीकरणे बदलून फोडाफोडीचे राजकारण करुन काँग्रेसने पुन्हा सत्ता हस्तगत केली. पंचवार्षिक निवडणुकीच्या मुदतीनंतर बराच कालावधी मनपाचा कारभार निवडणुकीअभावी प्रशासकाकडे राहिला. नुकत्याच झालेल्या निवडणुकीत भारतीय जनता पार्टीला अपेक्षित यश मिळाले नसले तरी, सत्ताधारी काँग्रेसच्या कारभारावर अंकुश ठेवत भाजपचे २२ सदस्य सक्षम विरोधकांची भमिका पार पाइत शहर विकासासाठी केंद्र व राज्य सरकारच्या मदतीने काम करतील, असा विश्वास भाजप, शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर यांनी व्यक्त केला आहे.

## दयानंदमध्ये मतदान अधिकारी, कर्मचाऱ्यांचे दुसरे प्रशिक्षण पूर्ण

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ३१ जानेवारी :** जिल्हा परिषद व पंचायत समितीसाठी लातूर तालुक्यात ३०० मतदान केंद्र व २ लाख ५९ हजार ७५९ मतदार आहेत. क्षेत्रीय अधिकारी यांचे मार्फत सर्व मतदान केंद्राची तपासणी करण्यात आली असून मूलभूत सुविधांची पाहणी करण्यात आली आहे. मतदानासाठी नियुक्त करण्यात आलेल्या अधिकारी कर्मचारी यांचे द्वितीय प्रशिक्षण दयानंद सभागृह लातूर या ठिकाणी पार पडले.

लातूर जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांच्या मार्गदर्शनाखाली उपविभागीय अधिकारी तथा लातूर निवडणूक निर्णय अधिकारी रोहिणी नऱ्हे -विरोळे, तहसीलदार तथा सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी सौदागर तांदळे, निवासी नायब तहसीलदार गणेश सरोदे यांनी उपस्थित कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण दिले. सदर प्रशिक्षणामध्ये मतदान अधिकारी कर्मचारी यांचे कर्तव्य व जबाबदाऱ्या ईव्हीएम मशीन ची माहिती मतदानाच्या दिवशी करावयाची रिपोर्टिंग मतदान केंद्राची रचना इत्यादी बाबींचे सविस्तर प्रशिक्षण देण्यात आले. निवडणूक प्रक्रियेत सहभाग असणाऱ्या अधिकारी - कर्मचारी या सर्वांसाठी ईव्हीएम मशीन ची जोडणी व सिलिंग बाबतचे प्रात्यक्षिक दयानंद कला महाविद्यालयातील पहिल्या मजल्यावर मास्टर ट्रेनर क्षेत्रीय अधिकारी यांच्या उपस्थितीत देण्यात आले. ईव्हीएम मशीन ची प्रत्यक्ष हाताळणी करण्यामध्ये अधिकारी कर्मचारी यांचा उत्साह दिसून आला. तसेच प्रशिक्षणास मोठ्या प्रमाणात अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

## ४०८ ग्रामपंचायतींवर येणार प्रशासकराज

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ३१ जानेवारी :** लातूर जिल्ह्यातील ४०८ ग्रामपंचायतींवर प्रशासक येणार असून, त्याची सुरूवात फेब्रुवारीच्या पहिल्या आठवड्यापासून होणार आहे. २०२६ पासून होणार आहे. मुंबई खंडपीठाच्या निर्देशानुसार मुदत संपलेल्या ग्रामपंचायतींवर प्रशासक म्हणून सरकारी अधिकाऱ्यांच्या नियुक्त्या केल्या जाणार आहेत.

सद्यस्थितीत जिल्हा परिषद, पंचायत समित्यांच्या निवडणुकांची रणधुमाळी सुरू आहे. या काळात ग्रामपंचायतींच्या निवडणुका घेणे शक्य नाही. या पार्श्वभूमीवर, आहे त्या सरपंचांना मुदतवाढ द्यावी, अशी मागणी पुढे आली होती. प्रस्तूत मागणीचा तिढा मुंबई खंडपीठात गेला. खंडपीठाने सरपंचांना मुदतवाढ न देता सरकारी अधिकारीच प्रशासक म्हणून नेमावा, असे निर्देश दिल्याने मुदतवाढीचा विषय कालबाह्य ठरला.




लातूर जिल्ह्यातील ४०८ ग्रामपंचायतींच्या सरपंचांची मुदत अनुक्रमे दि. ४, ६, ८, १० फेब्रुवारी २०२६ या चार टप्प्यांत संपुष्टात येत आहे. एवढ्या ग्रामपंचायतींवर प्रशासक नियुक्त करण्यास अधिकारी उपलब्ध असणे देखील महत्त्वाचे आहे. जिल्हा परिषद एका अधिकाऱ्याकडे किमान तीन ग्रामपंचायतींच्या प्रशासकाचा भार टाकण्याच्या विचारात आहे. प्रशासक म्हणून नियुक्त होणाऱ्या अधिकाऱ्यास स्वतःचे मूळ काम करून प्रशासकाची धुरा सांभाळायची असल्याने मोठी कसरत होणार.मुदत संपलेल्या ग्रामपंचायतींच्या निवडणुका कधी जाहीर होणार, हेयाबद्दल आताच कोणालाही माहिती नाही. राज्य निवडणूक आयोगाच्या निर्णयानंतर ग्रामपंचायतींच्या निवडणुका जाहीर होतील. आयोगाच्या निवडणूक कार्यक्रमाबद्दल लातूर जिल्हा परिषद प्रशासन किमान या क्षणाला तरी अनभिज्ञ असल्याचे दिसत आहे.

जिल्हा परिषदेंतर्गत कृषी, शिक्षण, पंचायत विभागात कार्यरत विस्तार अधिकारी, अन्य विभागांचे विस्तार अधिकारी किंवा शाखा अभियंता, आरोग्य अधिकारी-कर्मचाऱ्यांना मुदत संपलेल्या ग्रामपंचायतींवर प्रशासक म्हणून नियुक्त करण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. प्रशासकासाठी अधिकारी-कर्मचारी कमी पडले तर इतर विभागातील अधिकारी - कर्मचाऱ्यांचा विचार होणार आहे. ग्रामविकास अधिकारी, ग्रामसेवक संबंधित ग्रामपंचायतीचे सचिव म्हणून काम पाहतात. त्यांना प्रशासक म्हणून नियुक्त करता येत नाही. प्रशासक म्हणून नियुक्त होणारा अधिकारी-कर्मचारी ग्रामसेवकापेक्षा वरिष्ठ असला पाहिजे.

जि. प. अंतर्गत १४ विभागांसह अन्य सहा-सात उपविभाग आहेत. या सर्व विभागांतील अधिकारी-कर्मचारी प्रशासक म्हणून नियुक्त करण्यात येतील, सरपंचांची मुदत फेब्रुवारी महिन्यात चार टप्प्यांत संपणार असल्याने मुंबई खंडपीठाच्या निर्देशानुसार प्रशासक नियुक्त करणे क्रमप्राप्त आहे.

### ३७८ हज यात्रेकरूंची आरोग्य तपासणीतभा

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ३१ जानेवारी :** हज यात्रेकरूंच्या आरोग्य सुरक्षिततेसाठी डीईआयसी केंद्र, स्त्री रुग्णालय लातूर येथे २७ ते ३० जानेवारीदरम्यान आरोग्य तपासणी व लसीकरण शिबीर घेण्यात आले. हज कमिटी ऑफ इंडिया आणि हज कमिटी ऑफ महाराष्ट्र राज्य यांच्या सूचनेनूसार जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. प्रदीप ढेले यांच्या मार्गदर्शनात घेण्यात आलेल्या शिबिरात ३७८ जणांची आरोग्य तपासणी व लसीकरण करण्यात आले. या शिबिरात वैद्यकीय अधीक्षक डॉ. रवींद्र भालेराव, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. अशोक सारडा, डॉ.आनंद कलमे, डॉ. मुक्तदिर शत्तारी आदी वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत हज यात्रेकरूंची तपासणी व आवश्यक लसीकरण करण्यात आले.शिबिरामध्ये लातूर, औसा, रेणापूर, चाकूर, नळेगाव, निलंगा आदी भागातील एकूण ३७८ हज यात्रेकरूंनी आरोग्य सेवांचा लाभ घेतला. शिबिराच्या यशस्वीतेसाठी लातूर जिल्ह्याचे हज प्रशिक्षक अमीरपाशा मणियार, गयास शेख, इस्माईल शेख, डीआयसीचे व्यवस्थापक अलीम नदाफ, आरबीएसके टीम, महानगरपालिका आरोग्य कर्मचारी, स्त्री रुग्णालय व डीईआयसी केंद्रातील कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# २० रुपयांच्या विम्यातून वारसांना २ लाखांचा दिलासा

## ▶▶ प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजनेचा ग्रामीण कुटुंबाला मोठा आधार

## ▶▶ महाराष्ट्र ग्रामीण बँक वलांडी शाखेचा उल्लेखनीय उपक्रम

**तभा वृत्तसेवा**

**वलांडी, दि. ३१ जानेवारी :** देवणी तालुक्यातील बोंबळी (खुर्द) येथील मयत खातेदार ज्योतिराम विठ्ठल भोसले यांनी महाराष्ट्र ग्रामीण बँकेत प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना (झचडइध) कार्यान्वित केली होती. त्यांच्या दुर्दैवी अपघाती मृत्यूनंतर या योजनेअंतर्गत त्यांच्या पत्नी गीता ज्योतिराम भोसले यांच्या खात्यावर २ लाख रुपयांची विमा रक्कम जमा करण्यात आली आहे.



अत्यल्प म्हणजेच फक्त २० रुपयांच्या वार्षिक प्रीमियमवर मिळणाऱ्या या विमा योजनेमुळे मृत व्यक्तीच्या कुटुंबाला मोठा आर्थिक दिलासा मिळाला असून, संकटाच्या काळात ही रक्कम आधार ठरली आहे. ग्रामीण भागातील सामान्य कुटुंबांसाठी प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना किती उपयुक्त आहे, हे या उदाहरणातून स्पष्ट झाले आहे. महाराष्ट्र ग्रामीण बँक, वलांडी शाखेचे व्यवस्थापक भगवान संवडकर यांनी माहिती देताना सांगितले की, अचानक अपघात, कायमस्वरूपी अपंगत्व किंवा अपघाती मृत्यूच्या परिस्थितीत कुटुंब आर्थिक अडचणीत सापडू नये यासाठी प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना अत्यंत महत्त्वाची आहे. सर्व खातेदारांनी ही योजना नक्की कार्यान्वित करावी, असे आवाहन त्यांनी केले.

अल्प प्रीमियम - मोठा लाभ हे या योजनेचे वैशिष्ट्य असून अपघाती मृत्यू व अपंगत्वासाठी आर्थिक संरक्षण देणारी ही योजना ग्रामीण कुटुंबांसाठी प्रभावी सुरक्षा कवच ठरत आहे.

संवडकर यांनी पुढे सांगितले की, बँकेमार्फत ४३६ रुपयांत प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजना, अटल पेन्शन योजना तसेच इतर सामाजिक सुरक्षा योजना देखील उपलब्ध आहेत. खातेदारांनी या सर्व योजनांचा लाभ घेऊन आपल्या कुटुंबाचे आर्थिक भविष्य सुरक्षित करावे, असेही त्यांनी सांगितले.

विमा रकमेचे वाटप करताना बँकेतील कर्मचारी मस्तान शेख तसेच बँक सखी अंजली सगर उपस्थित होते. महाराष्ट्र ग्रामीण बँक वलांडी शाखेच्या या उपक्रमामुळे ग्रामीण भागात विमा योजनांचे महत्त्व आणि त्यातून मिळणारे संरक्षण पुन्हा एकदा ठळकपणे समोर आले आहे.

## साहित्यिक डॉ.नरसिंग कदम यांना नाशिकचा भाग्यविधाता राष्ट्रीय उत्कृष्टता पुरस्कार जाहीर

**तभा वृत्तसेवा**

**उदगीर, दि. ३१ जानेवारी :** छत्रपती शिवाजीराजे महाविद्यालयातील साहित्यिक डॉ.नरसिंग कदम यांना नाशिक येथील भाग्यविधाता राष्ट्रीय उत्कृष्टता पुरस्कार २०२६ नुकताच जाहीर झाला. तशा निवडीचे पत्र संचालक बी. सुदर्शन यांचे, अविनाश कदम यांच्याकडून त्यांना प्राप्त झाले.त्यांनी केलेल्या शैक्षणिक, साहित्यिक, समीक्षक आणि संपादनातील उत्कृष्टतेची दखल घेत त्यांना शिक्षण आणि युवा मार्गदर्शन उत्कृष्टता पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे.



ते मराठी विश्र्वकोश निर्मिती मंडळ महाराष्ट्र राज्य,मुंबई, मसाप संभाजीनगर,तिफण त्रैमासिक संभाजीनगरचे सदस्य आहेत.उस्मानिया विद्यापीठ हैदराबाद येथील एम ए च्या अभ्यासक्रमात त्यांच्या दोन संपादित पुस्तकांची संदर्भ ग्रंथ म्हणून निवड झालेली आहे.ते पीएच.डीचे संशोधन मार्गदर्शक आहेत. त्यांचे २० पुस्तके प्रकाशित झालेली आहेत.त्यांनी महाराष्ट्रातील साहित्यिकांच्या ३० पेक्षा जास्त पुस्तकांना प्रस्तावना दिल्या तर महाराष्ट्रातील साहित्यिकांच्या १५ पेक्षा जास्त पुस्तकांना ब्लर्बलेखन दिलेले आहे.महाराष्ट्रातील १०० पेक्षा जास्त साहित्यिकांच्या पुस्तकांवर विविध वर्तमानपत्रातून समीक्षा प्रकाशित झाल्या व प्रत्येक आठवड्याला प्रकाशित होत आहेत.विविध वांड्मयीन नियतकालिकांतून, मासिकांतून ६० पेक्षा जास्त लेख प्रकाशित, ३० पेक्षा जास्त पुरस्कार प्राप्त झालेले आहेत.

या निवडीबद्दल त्यांचे किसान शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष श्रीरंगराव पाटील एकंबेकर, सचिव पी.टी. शिंदे, उपाध्यक्ष माधवराव पाटील, सहसचिव हिरागीर गिरी, कोषाध्यक्ष गुंडेराव पाटील, सदस्य ज्ञानदेव झोडगे, रामराव एकंबे,काकासाहेब पाटील, भिमराव पाटील तसेच पृथ्वीराज पाटील, पुंडलिकराव पाटील,महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर.एम.मांजरे,पत्रकार बांधव, प्राध्यापक, कार्यालयीन कर्मचारी, शिक्षकेत्तर कर्मचारी, मित्रपरिवार, नातलग यांनी अभिनंदन केले व पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.



## डॉ. सौरभ लाळे नीट सुपरस्पेशालिटी परीक्षेत यश

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ३१ जानेवारी :** राष्ट्रीय पातळीवरील नीट सुपरस्पेशालिटी परीक्षेत लातूरच्या डॉ. सौरभ मारुती लाळे नी उल्लेखनीय यश संपादन करत देशात ४४ वा क्रमांक पटकावला आहे. या यशामुळे लातूरच्या गौरवशाली शैक्षणिक परंपरेत मानाचा तुरा रोवला गेला आहे. देशपातळीवरील अत्यंत स्पर्धात्मक परीक्षेत मिळालेल्या या यशामुळे वैद्यकीय क्षेत्रातून कौतुक होत आहे. कठोर परिश्रम, सातत्यपूर्ण अभ्यास आणि जिद्दीच्या जोरावर डॉ. सौरभ ने हे यश मिळवले आहे. सध्या त्याने लोकमान्य टिळक वैद्यकीय महाविद्यालय (सायन), मुंबई येथून एम.डी. मेडिसिन पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केले आहे. डॉ. सौरभचे शालेय शिक्षण श्री देशीकेंद्र विद्यालय, लातूर येथे झाले. इयत्ता अकरावी व बारावीचे शिक्षण त्याने दयानंद कॉलेज, लातूर येथून पूर्ण केले. त्यानंतर त्याने शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, संभाजीनगर येथून एमबीबीएस पदवी प्राप्त केली. या यशामुळे कुटुंबीय, नातेवाईक, मित्रपरिवार, शिक्षक व वैद्यकीय क्षेत्रातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. त्याच्या या यशामागे वडील मारुती लाळे, दयानंद कॉलेज, लातूर येथील भौतिकशास्त्राचे प्राध्यापक, यांचे मार्गदर्शन तसेच कुटुंबीयांचा मोलाचा पाठिंबा लाभला.

## शहरातील कॅप्टन चौकात भारत माता पूजन व संविधान पूजन संपन्न

**तभा वृत्तसेवा**

**उदगीर, दि. ३१ जानेवारी :** भारतीय प्रजासत्ताक दिनानिमित्त शहरातील मुख्य चौक कॅप्टन चौकामध्ये भारत माता पूजन व संविधान पूजन करण्यात आले. समाज संपर्क करणे, जीवनमूल्ये वाढवणे, नागरिक कर्तव्यांची जाणीव करून देणे, संविधानाचे महत्त्व विशद करणे या उद्देशाने हा उपक्रम हाती घेण्यात आलेला आहे. याप्रसंगी कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे श्री.मोतीलाल डोईजोडे सचिव रेल्वे संघर्ष समिती उदगीर, दिलीपकुमार गायकवाड लिंकन इंटरनॅशनल स्कूलचे संस्थापक , कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉक्टर संजय कुलकर्णी, केंद्रीय कार्यकारिणी सदस्य तथा स्थानिक समन्वय समितीचे कार्यवाह शंकरराव लासुणे,अध्यक्ष मधुकरराव वट्टमवार,अतुल गुरमे,माजी मुख्याध्यापक लक्ष्मीकांत नेलवाडकर ,विद्यालयाचे सन्माननीय मुख्याध्यापक संजयराव कुलकर्णी,उपमुख्याध्यापक ज्ञानेशजी मातेकर,पर्यवेक्षक कृष्णा मारावार,किरण नेमट,माधव मठवाले, या उपक्रमाचे प्रमुख तथा विस्तार सेवा कार्यसमीती प्रमुख किरण नरसिंगे,सहप्रमुख नीता मोरे,आशा मोरे,दिलीप पाटील, संदीप चाटे, मयूर कुलकर्णी, संदीप जाधव, प्रशांत चव्हाण आणि परिसरातील नागरिक तरुण तसेच शिक्षक बंधू भगिनी उपस्थित होतो.



## काँग्रेसच्या वतीने रेणापुरात अजितदादांना श्रद्धांजली



**तभा वृत्तसेवा**

**रेणापूर, दि. ३१ जानेवारी :** रेणापूर तालुका व शहर काँग्रेसच्या वतीने महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली .

उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचे विमान अपघातात नुकतेच अकाली निधन झाले. भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या शहर आणि रेणापूर तालुका शाखेच्या वतीने त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून श्रद्धांजली वाहण्यात आली. याप्रसंगी रेणापूर तालुका काँग्रेसचे अध्यक्ष प्रमोद कापसे, महिला काँग्रेस अध्यक्ष पूजा विशाल इंगे, इंदुबाई इगे, विजय राजेमाने, खरोळ्याचे सरपंच धनजंय देशमुख, नगरसेवक सचिन मोटेगावकर, पदम पाटील,रुपेश चक्रे, गजेंद्र चव्हाण, गणेश सौदागर, संतोष शिंदे व अजय चक्रे, सचीन इंगे, हालकुडे, प्रदीप काळे, शिवाजी अकणगिरे, भीमाशंकर कोरे,पाशा फरीद, पाशा भाई जनार्दन माने, बबलू वंगाटे, शहाजी पवार यांच्यासह कॉग्रेस पक्षाचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## राज्यस्तरीय फोटोग्राफी स्पर्धेत दीपक हलकंचे यांचे भरीव यश

**तभा वृत्तसेवा**

**अहमदपूर, दि. ३१ जानेवारी :** सरस्वती विद्यालय कुमठा(बु) येथील कला शिक्षक दीपक हलकंचे यांची जळगाव येथे संपन्न झालेल्या राज्यस्तरीय फोटोग्राफी स्पर्धेत राज्यस्तरावर भारतीय संस्कृती यांचा सुरेख मिलाप हा विषय फोटोग्राफीत उत्तम पद्धतीने टिपल्या बद्द्ल त्यांचा सहावा क्रमांकाने निवड झाली.

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र राज्य पुणे यांच्या वतीने घेण्यात आलेल्या शिक्षक व अधिकारी कर्मचारी यांच्यासाठीचे विविध स्पर्धा २०२५-२६ यात फोटोग्राफी स्पर्धा तालुकास्तर व विभास्तर स्पर्धेत यश संपादन करत राज्यस्तरावर संधी प्राप्त झाली. या स्पर्धेत राज्यावर सहावा क्रमांक येऊन लातूर जिल्ह्याचे नाव महाराष्ट्र पोहोचण्याचे कार्य उत्कृष्ट फोटोग्राफर दीपक हालकंचे यांनी केले.

जळगाव डाएटचे अधिव्याख्याता डॉक्टर जगन्नाथ दरंदले, डॉक्टर चंद्रकांत साळुंखे डॉक्टर अनिल झोपे यांच्या हस्ते प्रशस्तीपत्र व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. यांच्या या भरीव यशाबद्दल जिल्ह्यात सर्व स्तरावर कौतुक होत आहे.

वरील यशाबद्दल डायटचे प्राचार्य मारोती सलगर, माध्यमिक शिक्षणाधिकारी दत्तात्रय मठपती, प्राथमिक शिक्षणाधिकारी तृप्ती अंधारे, गटशिक्षणाधिकारी रामलिंग काळे, गटशिक्षणाधिकारी बबनराव ढाकाडे, टागोर शिक्षण समितीचे अध्यक्ष डॉ.अशोकराव सांगवीकर, सचिव शिक्षण महर्षी डी.बी.लोहारे गुरुजी, सहसचिव डॉ. सौ. सुनीता ताई चवळे, विद्यालयाचे प्राचार्य मुज्जमिल सय्यद,वरिष्ठ लिपिक जयप्रकाश माने, पर्यवेक्षक अरुण राठोड,व्यकंट पुठ्ठेवाड, ज्ञानेश्वर जवळे, सुरेश आडे, सुरेश पाटील, उमाकांत कांबळे, संतोष मुंढे यांच्यासह डॉ. बालाजी कारामुंगीकर, कलाशिक्षक महादेव खळुरे, जयप्रकाश हाराळे, तुकाराम देवकत्ते,सतिश बैकरे, शिवकुमार गुळवे, मोहन तेलंगे,विवेकानंद मठपती, दिपक जगताप, सलिम आतार, हाणमंत हेळगीरे, चंद्रशेखर भालेराव, चंद्रदीप नादरगे, बसवेश्वर थोटे यांनी अभिनंदन व कौतुक केले.

## महात्मा गांधी महाविद्यालयात हुतात्मा दिवस साजरा

**तभा वृत्तसेवा**

**अहमदपूर, दि. ३१ जानेवारी :** केंद्र व राज्य शासनाच्या परिपत्रकानुसार देशाच्या स्वातंत्र्यासाठी प्राणार्पण केलेल्या हुतात्म्यांच्या स्मरणार्थ आदर व्यक्त करण्यासाठी ३० जानेवारी संपूर्ण देशभर दोन मिनिटे मौन (स्तब्धता) पाळून त्यांना आदरांजली वाहण्यात येते त्याच दिवशी जगाला सत्य, अहिंसा, मानवता आणि शांततेचा संदेश देणारे राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची पुण्यतिथी अर्थात ३० जानेवारी हा दिवस दरवर्षी हुतात्मा दिन म्हणून साजरा केला जातो. त्यानुसार येथील महात्मा गांधी महाविद्यालयात ३० जानेवारी रोजी सकाळी ठिक ११.०० वाजता दोन मिनिटे मौन (स्तब्धता) पाळून हा दिवस हुतात्मा दिन म्हणून पाळण्यात आला.

विचार विकास मंडळ संस्थेचे अध्यक्ष अँड किशनराव बेंडकुळे यांच्या हस्ते प्रथम राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले. त्यानंतर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. पी. पवार, संस्थेचे प्राध्यापक प्रतिनिधी प्रा. हेमंत पाटील, उपप्राचार्य डॉ. जे. पी. कुलकर्णी, पर्यवेक्षक प्रा. एस. के. गायकवाड, पर्यवेक्षक प्रा अशोक शिंदे, सिनेट सदस्य डॉ. विनोद माने यांनी राष्ट्रपिता महात्मा गांधी यांना विनम्र आदरांजली वाहिली. याप्रसंगी महाविद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.



**- शोकसंदेश -**

## असा नेता पुन्हा होणे नाही

महाराष्ट्र राज्याचे अर्थकुशल उपमुख्यमंत्री तथा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष, मा. श्री अजित दादा पवार यांचा भीषण अपघातात दुः खद निधन झाले. ही घटना काळजाला चटका लावून जाणारी आहे. हा केवळ एक अपघात नाही, तर लाखो कार्यकर्ते, सामान्य नागरिक आणि राज्याच्या राजकारणावर कोसळलेला आघात आहे. ही घटना मन हेलावून टाकणारी असून शब्द अपुरे पडावेत अशी वेदना प्रत्येकाच्या मनात घर करून बसली आहे. राजकारणात स्पष्ट भूमिका, निर्भीड निर्णयक्षमता आणि जनसामान्यांच्या प्रश्र्नांसाठी कायम उभं राहणारं एक हक्काचं नेतृत्व आज आपल्यातून निघून गेलं आहे. मा. अजित दादा पवार यांच्या जाण्याने महाराष्ट्राच्या राजकीय, सामाजिक आणि वैचारिक पातळीवर जी प्रचंड पोकळी निर्माण झाली आहे. त्यांच्या जाण्याने महाराष्ट्राने एक कणखर, प्रामाणिक आणि लढवय्या नेतृत्व गमावलं आहे. ही हानी केवळ एका कुटुंबाची किंवा एका पक्षाची नसून संपूर्ण महाराष्ट्राची आहे. मा. अजित दादा पवार यांची आठवण, त्यांचे विचार आणि त्यांनी दिलेले मार्गदर्शन कायम आमच्या हृदयात जिवंत राहील. दादांना आमच्याकडून भावपूर्ण श्रद्धांजली



**-प्राध्यापक सांगवे सर,**
**ग्रामीण जीवन विकास समीती अध्यक्ष**
**दैठणा ता शिरूर अनंतपाळ**

सोलापूर तरुण भारत Solapur Tarun Bharat

**छोट्या जाहिराती/जाहीर प्रगटन / इतर जाहिराती योग्य दरात छापल्या जातील संपर्क -७३८५५६७०३१**

## जाहीर प्रगटन

लातूर जिल्हा परिसरातील तमाम जनतेस या जाहिर प्रगटना द्वारे सुचीत करण्यात येते की, माझे पक्षकार अतुल लिंबाजीराव सिरसाट, रा. रामवाडी, ता.रेणापूर जि.लातूर यांनी मला दिलेल्या माहिती व कागदपत्रावरून व वकिल म्हणून अधिकृत केले वरुन सर्व जनतेस खालील प्रमाणे जाहीर प्रगटन देत आहे.

माझे पक्षकार यांना धनराज धोंडीराम गिरी, रा. कामखेडा, ता. रेणापूर जि.लातूर यांनी खरेदी मालकीची व कब्जेवहिवाटीची शेतजमीनवर प्लॉटींग केलेल्या पैकीचा प्लॉट मौ.आर्वी, ता.जि.लातूर येथील गट क्रं.५७ पैकीचा याचा एन.ए मंजूरी क्रं.RPLAT/LT/2025/-PL/00758, दि.१०/११/२०२५ अन्वये मे. तहसील आफीस, लातूर यांनी मंजूर केलेल्या पैकीचा प्लॉट क्रं.०६ पुर्ण असून याची लांबी पुर्व पश्चिम १२ मी व रूंदी दक्षिण उत्तर पु. बा. ६.५३१ व प.बा. ७.०४४ मी असून याचे एकूण क्षेत्रफळ ८१.४५ चौ.मी (८७६.४०२ चौ. फुट) आहे. याची चतु:सीमा पुर्वेस प्लॉट क्रं.०५, पश्चिमेस ९ मी. रुंदीचा रस्ता, दक्षिणेस सदर गटातील उर्वरीत जमीन, उत्तरेस प्लॉट क्रं.०७.

येणे प्रमाणे वरील चतु:सीमेच्या आतील मिळकत विद्यमान मालकाकडुन लेखी करार करुन घेऊण, इस्सारापोटी काही रक्कम माझे पक्षकाराकडुन स्विकारुन सदरची मिळकत ही निर्विवाद व निर्जोखीम असल्याची हमी माझे पक्षकारास दिली आहे. तरी सदर मिळकती बाबत जर कोणाचा उजर, आक्षेप, हितसंबंध, हक्कसंबंध, कर्जबोजा, गहाणखत, बक्षीसपत्र, कोर्टडिग्री, मृत्युपत्र, तारण, लीज, शेत जमिनीचा वाद, शासकिय अथवा निमशासकिय कर्ज, न्यायालयीन वाद असतील तर त्यांनी सदरचे प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून सात (०७) दिवसाच्या आत माझे खालील कार्यालयीन पत्यावर योग्य त्या कागदपत्रांसह लेखी उजर / आक्षेप नोंदवावा मुदतीत जर कोणाचा उजर / आक्षेप नाही आल्यास सदरची मिळकत ही निर्विवाद व निर्जाखीम आहे असे गृहीत धरुन माझे पक्षकार सदर मिळकतीचे नोंदणीकृत खरेदीखत मूळ मालकाकडून आपल्या हक्कात करुन घेतील व त्यानंतर येणारे आक्षेप माझे पक्षकारावर बंधणकारक राहणार नाहीत याची सर्व जनतेने नोंद घ्यावी.


दिनांक ३०/०१/२०२६

**तर्फे अॅड. अशोक ज्ञा. लोखंडे**
**नोटरी भारत सरकार.**
**शाहू चौक, लातूर मो नं.९४२१९८६४९५**
**जाहीर प्रगटन देणार**
**अतुल लिंबाजीराव सिरसाट, रा.रामवाडी,**
**ता.रेणापूर जि. लातूर मो नं. ८८०५६ ८६८१९**

## जळकोट तालुक्यात रस्त्याची कामे दर्जाहिन ?

**तभा वृत्तसेवा**

**जळकोट, दि. ३१ जानेवारी :** लातूर जिल्ह्याला जळकोट तालुक्याशी जोडणाऱ्या चाकूर-अतनूर राज्य महामार्ग क्रमांक २३८ च्या कामावर तब्बल २०० कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला असला, तरी प्रत्यक्षात मात्र या रस्त्याचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे होत असल्याचे चित्र सध्या घोणसी-अतनूर परिसरात दिसून येत आहे. या दर्जाहिन कामाबाबत नागरिकातूनही आता दबक्या आवाजात चर्चा होत असल्याचे ऐकायला मिळत आहे.



उदगीर-जळकोट विधानसभा मतदारसंघाचे आमदार माजी मंत्री संजय बनसोडे यांच्या पुढाकारातून मंजूर झालेला हा ४३ किलोमीटर लांबीचा रस्ता चाकूर-शेळगाव-किनी यल्लादेवी-वाढवणा-गुडसुर-घोणसी-गुत्ती अतनूर असा आहे. या रस्त्यामुळे शेतकरी व नागरिकांना लातूर जिल्ह्याच्या ठिकाणी जाण्यासाठी मोठा दिलासा मिळणार होता. मात्र, सध्या सुरू असलेल्या दर्जाहिन कामामुळे नागरिकांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे. या रस्त्याचे खोदकाम योग्य पद्धतीने न करता काळ्या मातीवरच जुना रस्ता उखडून त्याच मातीमिश्रित मुरुमाचा पुन्हा वापर केला जात असल्याचा आरोप नागरिकांकडून होत आहे.

नवीन मुरुमाचा मुलामा देण्यात येत असला तरी तोही मातीमिश्रित असल्याने रस्त्याचा पाया कमकुवत बनत आहे.प्रदीर्घ कालावधीनंतर मंजूर झालेला हा महत्त्वाचा रस्ता सुरुवातीलाच निकृष्ट दर्जाचा होत असल्याने भविष्यात हा रस्ता पावसाळ्यात टिकेल का ? असा प्रश्न नागरिकांना पडला आहे. संबंधित विभाग व सार्वजनिक बांधकाम खात्याचे अधिकारी या गंभीर बाबीकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असल्याचा आरोप परिसरातील वाहनधारक व नागरिक करत आहेत. तरी या रस्त्याच्या कामाची तातडीने गुणवत्ता तपासणी करून दोषींवर कारवाई करावी व रस्त्याचे काम नियमानुसार, दर्जेदार साहित्य वापरून पूर्ण करावे, अशी मागणी परिसरातील नागरिकांकडून केली जात आहे.

# धाराशिव जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## मुक्तांग २ फेब्रुवारीचा जिल्हास्तरीय लोकशाही दिन रद्द

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३१ जानेवारी -**

जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली दर महिन्याच्या पहिल्या सोमवारी जिल्हास्तरीय लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येते.त्यानुसार सर्व कार्यालय विभाग प्रमुख तसेच सर्व नागरिकांना कळविण्यात येते.मात्र जिल्हा परिषद सार्वत्रिक निवडणुक - २०२६ ची आदर्श आचारसंहिता दिनांक १३ जानेवारी २०२६ पासून लागू झाली आहे. जिल्हा परिषद सार्वत्रिक निवडणूक २०२६ ची



आदर्श आचारसंहिता ९ फेब्रुवारी २०२६ पर्यंत लागू राहणार आहे.

त्याअनुषंगाने आदर्श आचारसंहिता लागू कालावधीत येत असल्यामुळे दि.२ फेब्रुवारी रोजी जिल्हास्तरीय लोकशाही दिन आयोजित करण्यात येणार नाही, याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.




https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com
सोलापूर तरुण भारत


## संक्षिप्त वृत्त...



### जिल्हा माहिती कार्यालयात हुतात्म्यांना आदरांजली

**धाराशिव, दि.३१ जानेवारी -**

देशाच्या स्वातंत्र्यासाठी प्राणार्पण केलेल्या हुतात्म्यांच्या स्मरणार्थ आदर व्यक्त करण्यासाठी आज हुतात्मा दिनी जिल्हा माहिती कार्यालय येथे ११ वाजता दोन मिनिटे मौन पाळून हुतात्म्यांना आदरांजली वाहण्यात आली. यावेळी जिल्हा माहिती अधिकारी विवेक खडसे, वरिष्ठ लिपिक नंदू पवार, कनिष्ठ लिपिक दिलीप वाठोरे, चित्रा घोडके, मोहन कोळी, अनिल वाघमारे, माध्यम कक्षातील प्रा.बी. एस. उडचण, प्रा. संतोष भांडेकर, युसुफ मोमीन, अमोल कस्तुरे, अतुल पवार, शैलेश खारगे व विनोद जानराव यांची उपस्थिती होती.

### घरासमोरून बोकड, शेळी व पिल्लू चोरीस; गुन्हा दाखल

**धाराशिव, दि.३१ जानेवारी -**

ढोकी पोलीस ठाण्याच्या हद्दीत घरासमोरून बोकड, शेळी व पिल्लू चोरीस गेल्याची घटना घडली आहे.




या प्रकरणी अज्ञात व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादी दत्तात्रय देविदास मुळे (वय ५३, रा. मुळेवाडी, ता. जि. धाराशिव) यांच्या मालकीचा अंदाजे २२ हजार रुपये किमतीचा एक बोकड, एक शेळी व एक पिल्लू हे दि.२९ जानेवारी रोजी पहाटे सुमारे ४ वाजण्याच्या सुमारास त्यांच्या राहत्या घरासमोरून अज्ञात व्यक्तीने चोरी करून नेले. या घटनेबाबत दत्तात्रय मुळे यांनी दि.२९ जानेवारी रोजी दिलेल्या प्रथम खबरीवरून ढोकी पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला असून पुढील तपास ढोकी पोलीस करीत आहेत.

### शेतातील बोअर मोटारची केबल व ऑटोस्विच चोरीस

**धाराशिव, दि.३१ जानेवारी -**

लोहारा पोलीस ठाण्याच्या हद्दीत शेतातील बोअरवेल मोटारची केबल व ऑटोस्विच चोरीस गेल्याची घटना घडली आहे. या प्रकरणी अज्ञात व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादी संभाजी वागंबर मुसांडे



(वय ४६, रा. धानुरी, ता. लोहारा, जि. धाराशिव) यांच्या शेत गट क्रमांक ५५१ मधील बोअरवेल मोटारची १४३ मीटर लांबीची केबल तसेच ऑटोस्विच असा एकूण २१ हजार ९५० रुपये किमतीचा माल अज्ञात व्यक्तीने चोरी करून नेल्याचे निदर्शनास आले. या घटनेबाबत संभाजी मुसांडे यांनी दि.२९ जानेवारी रोजी दिलेल्या प्रथम खबरीवरून लोहारा पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला असून पुढील तपास लोहारा पोलीस करीत आहेत.

### प्रतिबंधित गुटख्याची विक्री

**धाराशिव, दि.३१ जानेवारी -**

उळुप (ता. भुम) येथे प्रतिबंधित गुटखा व तंबाखूजन्य पदार्थ विक्रीसाठी साठवून ठेवल्याप्रकरणी भुम पोलिसांनी कारवाई केली आहे. आरोपी गौतम महादेव वरळे (वय ६६) यांच्या त्रिमूर्ती किराणा अँड जनरल स्टोअर्स या दुकानातून विमल, राजनिवास, आरएमडी. पान मसाला व व्ही-१ तंबाखू असा ४,२९८ रुपये किमतीचा प्रतिबंधित माल जप्त करण्यात आला. या प्रकरणी आरोपीविरुद्ध गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

## समन्वयातूनच प्रभावी भूजल व्यवस्थापन शक्य : जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३१ जानेवारी -**

भूजल व्यवस्थापन हे केवळ एका विभागापुरते मर्यादित न राहता सर्व संबंधित यंत्रणांच्या समन्वयातून राबविले गेले पाहिजे. केंद्रीय भूजल विभाग व भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा (GSD) यांच्या डेटाबेसचा समन्वित व व्यापक वापर केल्यास जिल्हास्तरीय नियोजन अधिक परिणामकारक ठरू शकते. गावपातळीवरील जलसुरक्षा आराखडे, पाणी पुनर्भरण प्रकल्प व दीर्घकालीन जलधोरणे आखताना ही माहिती अत्यंत उपयुक्त ठरेल, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार यांनी केले.



केंद्रीय जलशक्ती मंत्रालयाअंतर्गत केंद्रीय भूजल विभाग, पुणे यांच्या वतीने शासकीय कार्यालयांमध्ये उपलब्ध असलेल्या मौल्यवान भूजल माहितीचा स्थानिक भूजल व्यवस्थापन प्रकल्पांमध्ये प्रभावी वापर व्हावा, या उद्देशाने एक अभिनव उपक्रम हाती घेण्यात आला आहे. या उपक्रमांतर्गत आज दि.३० जानेवारी २०२६ रोजी जिल्हाधिकारी कार्यालय, धाराशिव येथे केंद्रीय भूजल विभागाच्या भूजल माहिती भंडार तसेच जलधर नकाशाकरण अभ्यास प्रकल्पांचे उपयोग या विषयावर जिल्हास्तरीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.

या कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानावरून जिल्हाधिकारी पुजार बोलत होते. कार्यक्रमास विशेष अतिथी म्हणून जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. मैनाक घोष व अतिरिक्त पोलीस अधीक्षक शफकत आमना उपस्थित होते. डॉ. मैनाक घोष यांनी भूजलविषयक अद्ययावत व विश्वासार्ह डेटाच्या उपलब्धतेचे महत्त्व अधोरेखित करत, अंतिम वापरकर्ते व विविध अंमलबजावणी यंत्रणांनी या माहितीचा प्रभावी वापर करण्याचे आवाहन केले.

विशेषतः ग्रामस्तरीय जलसुरक्षा योजना तयार करताना या संसाधनांचा सक्रिय वापर करण्याचा सल्ला त्यांनी दिला. कार्यशाळेत डॉ. उपेंद्र धोंडे, वरिष्ठ भूजल वैज्ञानिक, केंद्रीय भूजल विभाग, पुणे यांनी केंद्रीय भूजल विभागांतर्गत निर्माण होणारी माहिती-संसाधनांचा प्रसार व उपयोग या विषयावर सविस्तर तांत्रिक सादरीकरण केले. त्यांनी धाराशिव जिल्ह्यासाठी राष्ट्रीय जलधर नकाशाकरण (NQUIM) अभ्यासाचे निष्कर्ष मांडत CGWB डेटा पोर्टल, INGRES व WRIS प्रणालींच्या माध्यमातून क्षेत्रीय पातळीवरील नियोजन व निर्णय प्रक्रिया अधिक शास्त्रीय कशी करता येईल, याचे प्रात्यक्षिक सादर केले.

या प्रसंगी कृत्रिम पुनर्भरण संरचनांच्या यशोगाथा या कॉफी टेबल पुस्तकाचे मान्यवरांच्या हस्ते औपचारिक प्रकाशन करण्यात आले व ते उपस्थित अधिकारी व प्रतिनिधींना वितरित करण्यात आले. तसेच केंद्रीय भूजल विभागाच्या विविध उपक्रमांबाबत व राष्ट्रीय जलधर नकाशाकरण कार्यक्रमाविषयी माहिती देणाऱ्या पुस्तिकाही वितरित करण्यात आल्या. कार्यशाळेस भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, जलसंपदा विभाग, मृदा व जलसंधारण विभाग, जलसंधारण विभाग (WCD), लघु सिंचन, वन, कृषी विभाग तसेच इतर संबंधित शासकीय व निमशासकीय विभागांचे अधिकारी व प्रतिनिधी उपस्थित होते.

ही कार्यशाळा सध्या काही निवडक जिल्ह्यांमध्ये राबविण्यात येत असून, पुढील टप्प्यात राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये ती घेण्याचा मानस केंद्रीय भूजल विभागाच्या वतीने व्यक्त करण्यात आला. या उपक्रमामुळे जलसंवर्धन व शाश्वत जलव्यवस्थापनाला नवी दिशा मिळेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

कार्यशाळेचा समारोप संवादात्मक अभिप्राय सत्राने झाला. कार्यक्रमास विविध विभागांतील एकूण ५५ अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. आभार व्ही. हेमलता, भूजल वैज्ञानिक यांनी मानले.

## दरोड्याच्या तयारीत असलेला टोळका पोलिसांच्या ताब्यात; सव्वा दोन लाखांचा मुद्देमाल जप्त

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३१ जानेवारी -**

परंडा पोलीस ठाण्याच्या हद्दीत दरोड्याच्या उद्देशाने गट करून दबा धरून बसलेल्या टोळक्याला परंडा पोलिसांनी रंगेहाथ पकडले असून त्यांच्याकडून सुमारे २ लाख १५ हजार ३०० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.




याप्रकरणी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे सुरज कृष्णा काळे (वय २४, रा. इंदिरानगर वस्ती, भूम), आप्पा आज्या काळे (वय ६५, रा. साकत (खु)), नवनाथ रामा भोसले (वय ७६, रा. त्रिंत्रज ता. भूम), अभिमान कल्याण पवार (वय ५४, रा. इंदिरानगर, भूम), नरहरी नवनाथ भोसले (वय ३५, रा. त्रिंत्रज), गणेश मच्छिंद्र काळे (वय ३३), शोभा गणेश काळे (वय ३५, रा. इंदिरानगर वस्ती, भूम) व चिमू दशरथ काळे (वय १९, रा. वालवड ता. भूम) अशी आहेत.

दि.२९ जानेवारी रोजी दुपारी सुमारे २.२० वाजता परंडा-पाचपिंपळा रोडवरील उजव्या बाजूस असलेल्या गायरान जमिनीत, पाझर तलावाच्या खड्ड्यात हे आरोपी संगनमत करून दरोडा टाकण्याच्या उद्देशाने दबा धरून बसले असल्याची माहिती परंडा पोलिसांना मिळाली. त्यानुसार पोलिसांनी तत्काळ कारवाई करत संबंधित टोळक्याला ताब्यात घेतले.

पोलिसांनी घटनास्थळावरून चार मोटारसायकली, एक कटावणी, कोयता, लोखंडी कटर, लाल रंगाच्या टिकटची पुडी, सुतारी दोरी तसेच पाच मोबाईल फोन असा एकूण २,१५,३०० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे.

या प्रकरणी आरोपींविरुद्ध परंडा पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला असून पुढील तपास परंडा पोलीस करीत आहेत.

## वाशी तालुक्यातील अजित पवार यांना श्रद्धांजली

**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.३१ जानेवारी -**

कै. उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या अपघाती निधनाच्या दुःखद वृत्ताने संपूर्ण वाशी तालुक्यात शोककळा पसरली आहे. या घटनेच्या पार्श्वभूमीवर वाशी तालुक्यात कडकडीत बंद पाळण्यात आला.

वाशी येथे सर्वपक्षीय श्रद्धांजली सभेचे आयोजन करण्यात आले होते. या सभेला विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी, नेते तसेच नागरिक उपस्थित होते. यावेळी सुरेश कवडे, नितीन चेडे, मच्छिंद्र कवडे, ॲड. सूर्यकांत सांडशे, राजगुरू कुकडे, मोळवने, संतोष कवडे, दिलीप क्षीरसागर, प्रा. समाधान माने, रामभाऊ लगाडे, पांडुरंग कवडे उपस्थित होते.

## धाराशिव जिल्ह्यात महिलांवरील लैंगिक अत्याचाराचे तीन गंभीर गुन्हे दाखल

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३१ जानेवारी -**

जिल्ह्यातील विविध पोलीस ठाण्यांच्या हद्दीत महिलांवर व तरुणीवर लैंगिक अत्याचार, धमकी व छायाचित्रांचा गैरवापर केल्याच्या तीन वेगवेगळ्या गंभीर घटना उघडकीस आल्या असून या प्रकरणी संबंधित पोलीस ठाण्यांत गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

धाराशिव ग्रामीण पोलीस ठाणे एका गावातील ३६ वर्षीय विवाहित महिला (नाव गावगोपनीय) हिच्यावर जुलै २०२४ ते दि. २५ जानेवारी २०२६ या कालावधीत गावातील एका तरुणाने आर्थिक व्यवहाराच्या कारणावरून वारंवार लैंगिक अत्याचार केल्याचा आरोप आहे. आरोपीने तिची छायाचित्रे व्हायरल करण्याची तसेच पतीला ठार मारण्याची धमकी देत अत्याचार केला. त्यानंतर पीडितेच्या मुलीच्या इंस्टाग्राम अकाउंटचा वापर करून सदर छायाचित्रे सोशल मीडियावर प्रसारित करण्यात आली. पीडितेच्या दि.२९ जानेवारी रोजी दिलेल्या प्रथम खबरीवरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

परंडा तालुक्यातील एका गावातील ३९ वर्षीय महिला (नाव गावगोपनीय) हिने दिलेल्या तक्रारीनुसार, दि.१२ डिसेंबर २०२२ ते दि. ८ नोव्हेंबर २०२५ या कालावधीत गावातील एका तरुणाने तिच्या घरी जाऊन शिवीगाळ, मारहाण करत तिच्यावर लैंगिक अत्याचार केला. तसेच जिवे ठार मारण्याची धमकी दिली. या प्रकरणी पीडितेने दि.२९ जानेवारी रोजी दिलेल्या प्रथम खबरीवरून



गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तसेच नळदुर्ग परिसरातील एका गावातील २३ वर्षीय तरुणी (नाव गावगोपनीय) हिच्यावर दि.२५ ते २६ नोव्हेंबर २०२५ रोजी गावातील एका तरुणाने अंघोळ करत असतानाची छायाचित्रे काढून ती व्हायरल करण्याची धमकी दिली. त्यानंतर तिला शेतातील शेडमध्ये डांबून ठेवून लैंगिक अत्याचार केल्याचा आरोप आहे. या प्रकरणी पीडितेने दि.२९ जानेवारी रोजी दिलेल्या प्रथम खबरीवरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या तिन्ही प्रकरणांचा तपास संबंधित पोलीस ठाण्यांकडून सुरू असून आरोपींच्या अटकेसाठी पुढील कारवाई केली जात आहे.

## निवडणूक मतदान व सीटीईटी एकाच दिवशी; शिक्षकांसमोर मोठा पेच

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३१ जानेवारी -**

महाराष्ट्र राज्य निवडणूक आयोगामार्फत राज्यातील बारा जिल्हा परिषद व संबंधित पंचायत समिती निवडणुकांसाठी दि. ७ फेब्रुवारी रोजी मतदान घेण्यात येणार आहे. याच दिवशी केंद्र शासनाच्या वतीने शिक्षकांसाठी केंद्रीय शिक्षक पात्रता परीक्षा (CTET) आयोजित करण्यात आली आहे. त्यामुळे शिक्षकांसमोर गंभीर अडचण निर्माण झाली आहे.

या संदर्भात शिक्षक संघटनेच्या वतीने शुक्रवारी (ता.३०) जिल्हाधिकाऱ्यांमार्फत निवडणूक आयोगाला निवेदन सादर करण्यात आले आहे. त्या पार्श्वभूमीवर दि.७ फेब्रुवारी २०२६ रोजी होणारी सीटीईटी परीक्षा शिक्षकांसाठी नोकरी टिकविण्यासाठी व पदोन्नतीसाठी अत्यंत महत्त्वाची व निर्णायक ठरणार आहे. मात्र याच दिवशी जि.प. व पं.स. निवडणुकांचे मतदान असल्याने निवडणूक ड्युटीवर नियुक्त शिक्षकांना सीटीईटी परीक्षा देणे शक्य होणार नाही. यामुळे शिक्षकांचे शैक्षणिक व व्यावसायिक नुकसान होण्याची शक्यता आहे. तसेच बी.एल.ओ. म्हणून काम पाहणाऱ्या ज्या शिक्षकांनी सीटीईटीचा अर्ज भरलेला आहे, अशा शिक्षकांनाही संबंधित निवडणूक व मतदान कामातून वगळण्यात यावे, अशी मागणी करण्यात आली आहे. मतदानाची तारीख बदलल्याने निवडणूक कामावर असलेल्या शिक्षकांसमोर मोठा पेच निर्माण झाला आहे. शिक्षकांच्या या गंभीर अडचणीची तातडीने दखल घेऊन सीटीईटी परीक्षा देणाऱ्या शिक्षकांना निवडणूक आयोगाने दिलासा द्यावा, अशी मागणी शिक्षक परिषदेच्या वतीने करण्यात आली आहे. या मागणीसाठी महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेचे राज्य कार्याध्यक्ष उमाकांत कुलकर्णी, रमेश गटकळ, सुनील काळे, कुमार निकम, सुरज येवले, अभिमान पेठे, अमोल गायकवाड, अण्णासाहेब धावारे, आप्पासाहेब गाडेकर, एस. जी. भोगील आदींनी निवेदनाद्वारे पाठपुरावा केला आहे.

दरम्यान, या संदर्भात एससीईआरटीचे राज्य संचालक राहुल रेखावार व राज्य परीक्षा परिषदेचे आयुक्त नंदकुमार बेडसे यांच्याशी संपर्क साधण्यात आला. सीटीईटी परीक्षा केंद्र सरकारच्या अखत्यारीत असून देशभरातील शेकडो शहरांमध्ये ही परीक्षा होत आहे. त्यासाठी आवश्यक यंत्रणा व खर्च मोठ्या प्रमाणावर असल्याने परीक्षा पुढे ढकलणे शक्य नसल्याचे स्पष्ट झाले आहे.

## गावखेड्यातील दोन कलावंतांचा राज्यभर डंका; कृष्णाई उळेकर आणि ज्ञानेश्वरी पौळ यांची महाराष्ट्रभर धूम

### आरळी बुद्रुक गावाचा अभिमान - महाराष्ट्राचा सन्मान...

कृष्णाई उळेकर आणि ज्ञानेश्वरी पौळ यांच्या सततच्या यशामुळे आरळी बु. गावाचे नाव राज्यभर उज्वल झाले आहे. त्यांच्या कलेने प्रेरणा मिळालेल्या अनेक तरुण मुलामुलींना आज नवीन दिशा मिळत आहे. गावातून उगवलेल्या या दोन युवा कलावंतांनी सिद्ध केले आहे की खऱ्या मेहनतीला आणि गुणाला सीमा नसते; गावचे दार पार केले की संपूर्ण महाराष्ट्र आपली वाट बघत असतो. गावातील साध्या घरातून उभ्या राहिलेल्या या दोन कलावंतांनी सिद्ध केले आहे की प्रतिभेला गाव नसते, माती नसते. मेहनतीची ज्योत पेटली की प्रकाश महाराष्ट्रभर पसरतो. कृष्णाई उळेकर आणि ज्ञानेश्वरी पौळ यांचा प्रवास हा केवळ यशकथा नाही, तर ग्रामीण कलेचा अभिमान आहे.

### ज्ञानेश्वरीची वयाच्या सहाव्या वर्षापासून कीर्तन सेवेत

दुसरीकडे, अवघे सहा वर्षांचे कोवळे वय असताना कीर्तनाच्या रंगमंचावर उभ्या राहिलेली ज्ञानेश्वरी पौळ ही आज महाराष्ट्रातील ओळखलेली बाल कीर्तनकार बनली आहे. तिच्या आवाजातील निर्मळता, कथनातील सहजता आणि भक्तिरसाने ओथंबलेली शैली यामुळे तिच्या किर्तनाला महिलांसह लहान-थोर सर्वच मंडळी दाद देतात.अहिल्यानगर येथील जय मृदंग वारकरी संस्थेत तयार झालेली ज्ञानेश्वरी आपल्या कीर्तनात संत साहित्य, वारकरी परंपरा, संस्कार कथा, तसेच सध्याच्या सामाजिक प्रश्नांचाही उत्तम वेध घेते. लहान वयातही तिचा आवाज प्रगल्भ आणि तिचे चिंतन परिपक्व असल्याची प्रशंसा अनेक ठिकाणी ऐकू येते.वारकरी संप्रदाय, संत परंपरा, समाजातील मूल्ये आणि संस्कार यांचा अल्हाददायक संगम तिच्या सादरीकरणात दिसून येतो. बाल किर्तनकार ज्ञानेश्वरी तर युट्युबवर धुमाकूळ घालताना दिसून येते आहे. गावोगावी विविध सांस्कृतीक कार्यक्रमासाठी तिच्या तारखा मिळवण्यासाठी आयोजकांना कसरत करावी लागतं असते. वडील मृदंगाचार्य एकनाथ पौळ आणि आई क्रांती व मोठा भाऊ शिवम महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली गावखेड्यातील कीर्तनापासून राज्यभरातील धार्मिक-सांस्कृतिक कार्यक्रमांपर्यंत तिने आपली स्वतंत्र छाप निर्माण केली आहे.

### कृष्णाई शालेय जीवनापासून भारूडावर स्वार...

आरळी बुद्रुकमध्ये शेतकरी कुटुंबात वाढलेली कृष्णाई उळेकर ही शालेय जीवनापासून भारूड या लोककलाप्रकाराशी अतूट नातं जपताना दिसते. ग्रामीण भागातील सामाजिक प्रश्न, नशाबंदी, पर्यावरण, शिक्षण, स्त्री-सक्षमीकरण, संस्कार आदी विषयांवर ती भारूडाच्या माध्यमातून प्रभावी संदेश देते. कृष्णाईच्या सादरीकरणाची भुरळ घालणारी शैली, आवाजातील ताकद आणि अभिनयातील नेमकेपणा यामुळे तिच्या भारुडांना ठिकठिकाणी तुफान प्रतिसाद मिळतो. कृष्णाई उळेकरचा कलाप्रवास आता गावापुरता मर्यादित नसून राज्यातील विविध टीव्ही चॅनेल्सवर तिने भारूड सादर करून आपल्या कलेची जोरदार चमक दाखवली आहे.ग्रामदैवताच्या जत्रा-मोहोट्यांपासून ते शहरातील सांस्कृतिक कार्यक्रमांपर्यंत तिने आपली मेहनत आणि कलाविष्कार सिद्ध केला आहे.आज ती महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यांत कार्यक्रम करत असून, गावातील मुलगीही आपल्या कलेच्या जोरावर मोठं नाव कमावू शकते याचं उदाहरण बनली आहे.वडील प्रगतशील शेतकरी प्रभाकर उळेकर आई आणि भाऊ यांचे मार्गदर्शन साथ कृष्णाईला सतत लाभते. कृष्णाई उळेकर केवळ कलाकार म्हणूनच नव्हे, तर महाविद्यालयांमध्ये जाऊन युवा वर्गाला प्रेरणा देणारी मार्गदर्शक म्हणूनही ओळख निर्माण करत आहे.





**अनिल आगलावे**
**धाराशिव, दि.३१ जानेवारी -**

तुळजापूर तालुक्यातील आरळी बु. या छोट्याशा खेड्यातील दोन मुली आज संपूर्ण महाराष्ट्राच्या कलाक्षेत्रात झळकत आहेत. युवा भारूडकार कृष्णाई प्रभाकर उळेकर आणि बाल कीर्तनकार ज्ञानेश्वरी एकनाथ पौळ या दोन कलावंतांनी आपल्या कलेच्या जोरावर गावातून राज्याच्या उंबरठ्यापर्यंत भक्कम वाटचाल केली आहे.

सामाजिक भान, कलाविष्कारातील प्रगल्भता आणि मनाचा ठाव घेणारे सादरीकरण यांच्या जोरावर या दोन्ही कलाकारांनी राज्यभरातील रसिकांना वेड लावले आहे.

शेतकरी कुटुंबातील कृष्णाई उळेकर आणि ज्ञानेश्वरी पौळ या दोघींचाही प्रवास साधा-सुबक आणि संघर्षांनी भरलेला आहे.

शहरातील सुविधा नसतानाही त्यांनी गावातील संस्कार, कुटुंबाचे पाठबळ आणि स्वतःचा चिकाटीवर कलाध्यक्षता साधली.

आज दोघींचा आरळी बु. ते महाराष्ट्र असा प्रवास हजारो ग्रामीण कलाकारांसाठी प्रेरणादायी ठरत आहे. जिथे हौस, मेहनत आणि कला एकत्र येते तिथे गावातील मुलींनाही राज्यभर नाव कमावणे शक्य होते, ही ठाम जाणीव त्यांच्या यशाने पुन्हा एकदा पटवून दिली आहे.

कृष्णाई आणि ज्ञानेश्वरी या दोघींचाही प्रवास हे ग्रामीण महाराष्ट्रातील प्रतिभेला मिळालेली नवी दिशा आहे. शेतकरी कुटुंबातील कृष्णाईने मेहनत, अभ्यास आणि सामाजिक भानातून भारूडाला नवी उंची दिली.

वारकरी संप्रदायातील संस्कारात वाढलेल्या ज्ञानेश्वरीने भक्तीपर कीर्तनाची अनोखी छटा महाराष्ट्राला दाखवली.

या दोघींची कला, निष्ठा आणि कष्ट आज संपूर्ण राज्यासाठी प्रेरणा ठरत आहेत.

# धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## धाराशिवच्या विकासाला नवे बळ मिळण्याची अपेक्षा

सुनेत्राताई पवार या धाराशिव जिल्ह्याच्या कन्या असल्यामुळे, त्यांच्या माध्यमातून आकांक्षित जिल्हा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या धाराशिवच्या विकासाला नवे बळ मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. मागासलेपण, पाणीटंचाई, कृषी प्रश्न, रोजगार आणि पायाभूत सुविधांचा अभाव अशा दीर्घकालीन समस्या असलेल्या या जिल्ह्याकडे राज्याच्या सर्वोच्च सत्ताकेंद्राचे लक्ष वेधले जाण्याची शक्यता निमर्णि झाली आहे. स्थानिक पातळीवरील नागरिक, सामाजिक कार्यकर्ते आणि राजकीय निरीक्षकांच्या मते, धाराशिवशी थेट भावनिक नाते असलेल्या नेतृत्वामुळे जिल्ह्याच्या विकास योजनांना गती, तसेच निधी आणि प्रशासकीय पाठबळ अधिक प्रभावीपणे मिळू शकते. विशेषतः रस्ते, सिंचन, आरोग्य व शिक्षण क्षेत्रातील प्रलंबित प्रकल्पांना प्राधान्य मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

सुनेत्राताई पवार यांच्या नेतृत्वामुळे धाराशिव जिल्हा केवळ राजकीयदृष्ट्या नव्हे तर विकासाच्या दृष्टिकोनातूनही राज्याच्या नकाशावर अधिक ठळकपणे पुढे येईल, असा आशावाद व्यक्त केला जात आहे.



### संक्षिप्त वृत्त...



## गांधी पुण्यतिथीनिमित्त घनकचरा व्यवस्थापन कार्यशाळा

**तुळजापूर, दि.३१ जानेवारी -**

येथील नगर परिषद प्राथमिक शाळा क्रमांक २ येथे राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या पुण्यतिथीनिमित्त राज्य अभियान संचालनालय, स्वच्छ महाराष्ट्र अभियान व नगरपरिषद कार्यालय तुळजापूर यांच्या संयुक्त विद्यमाने स्वच्छ महाराष्ट्र मिशन (नागरी) २.० अंतर्गत घनकचरा व्यवस्थापन विषयावर कार्यशाळा आयोजित करण्यात आली. यावेळी मुख्याध्यापक गणेश रोचकरी यांनी स्वच्छतेचे महत्त्व, आरोग्य व पर्यावरण संरक्षण याविषयी विद्यार्थ्यांना माहिती दिली. कार्यशाळेदरम्यान आदमाने यांनी विद्यार्थ्यांना घनकचऱ्याविषयी विविध प्रश्न विचारले. योग्य उत्तरे देणाऱ्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य स्वरूपात पारितोषिके देऊन गौरविण्यात आले. तसेच विद्यार्थ्यांकडून स्वच्छतेची शपथ घेण्यात आली. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन सुज्ञानी गिराम यांनी केले. यावेळी महेंद्र पाटील, महेंद्र कावरे यांच्यासह शाळेतील शिक्षकवर्ग व विद्यार्थी उपस्थित होते.



## श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानमध्ये हुतात्मा दिनानिमित्त आदरांजली अर्पण

**तुळजापूर, दि.३१ जानेवारी -**

देशाच्या स्वातंत्र्यासाठी आपल्या प्राणांची आहुती दिलेल्या हुतात्म्यांच्या स्मरणार्थ दरवर्षी ३० जानेवारी हा दिवस हुतात्मा दिन म्हणून पाळण्यात येतो. या दिनाचे औचित्य साधून आज सकाळी श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानच्या प्रशासकीय कार्यालयात हुतात्म्यांना भावपूर्ण आदरांजली अर्पण करण्यात आली. मंदिर संस्थानच्या वतीने हुतात्म्यांना विनम्र अभिवादन करून त्यांच्या स्मृतींना उजाळा देण्यात आला. प्रशासकीय कार्यालयात दोन मिनिटे मौन (स्तब्धता) पाळण्यात आले. यावेळी उपस्थित सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी उभे राहून देशासाठी बलिदान दिलेल्या हुतात्म्यांच्या स्मृतींना नमन केले. कार्यक्रमास तहसीलदार तथा व्यवस्थापक (प्रशासन) माया माने यांच्यासह श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानचे सर्व अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# धाराशिव कन्या : पहिल्या महिला उपमुख्यमंत्री

## सुनेत्राताईंच्या रूपाने प्रथमच धाराशिव जिल्ह्याला उपमुख्यमंत्री पदाचा सन्मान...



**अनिल आगलावे**
**धाराशिव, दि.३१ जानेवारी -**

महाराष्ट्राच्या राजकारणात ऐतिहासिक घडामोड घडली असून धाराशिव कन्या आणि राज्यसभा खासदार सुनेत्राताई पवार यांना महाराष्ट्राच्या पहिल्या महिला उपमुख्यमंत्री पदाची जबाबदारी स्वीकारली असून राज्याच्या इतिहासात पहिल्यांदाच एका महिलेला उपमुख्यमंत्रीपदाचा मान मिळाला, तसेच धाराशिव कन्या म्हणून जिल्ह्याला प्रथमच उपमुख्यमंत्री पदाचा सन्मान प्राप्त झालाय.

इतिहासात एक नवा अध्याय जोडला जात असून १९६० मध्ये महाराष्ट्र राज्य स्थापल्यापासून अजूनपर्यंत कोणतीही महिला उपमुख्यमंत्री किंवा मुख्यमंत्री म्हणून कार्यरत राहिली नाहीये. त्यामुळे सुनेत्रा पवार यांची नियुक्ती ही एक ऐतिहासिक क्षण ठरला आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अकाली निधनानंतर सुनेत्रा ताई पवार राज्याच्या उपमुख्यमंत्री पदी विराजमान झाल्या आहेत.

सुनेत्राताई पवार या माजी गृहमंत्री डॉ. पद्मसिंह पाटील यांच्या भगिणी असून, पाटील पवार कुटुंबाचा राज्याच्या राजकारणात दीर्घकाळ प्रभाव राहिला आहे. डॉ. पद्मसिंह पाटील हे देशाचे जेष्ठ नेते शरद पवार यांचे निकटवर्तीय आणि विश्वासू सहकारी मानले जातात. वयोमानामुळे ते सध्या सक्रिय राजकारणात नसले, तरी त्यांच्या राजकीय वारशाचा प्रभाव आजही धाराशिव जिल्ह्यात आजही दिसून येतो.

सुनेत्राताई पवार यांच्या उपमुख्यमंत्री पदावरील नियुक्तीमुळे महिला नेतृत्वाला बळ, तसेच मराठवाड्यातील धाराशिव जिल्ह्याला राजकीयदृष्ट्या नवे महत्त्व प्राप्त होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. सामाजिक काम, संयमी राजकीय भूमिका आणि कौटुंबिक पार्श्वभूमी या बाबी त्यांच्या नावाच्या चर्चेला बळ देत आहेत. राज्याच्या राजकारणात माजी गृहमंत्री डॉ. पद्मसिंह पाटील कुटुंबाचे वर्चस्व पुन्हा एकदा अधोरेखित होताना दिसत आहे. धाराशिव जिल्ह्याच्या राजकीय इतिहासात महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या या कुटुंबाचा प्रभाव आजही राज्यपातळीवर जाणवत आहे. पाटील कुटुंबाची पुढील पिढी म्हणून आमदार राणाजगजितसिंह पाटील सध्या राज्याच्या राजकारणात सक्रिय आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी त्यांचे घनिष्ठ संबंध असून, सत्ताधारी गटात त्यांनी आपले स्थान भक्कम ठेवले आहे. त्यामुळे पाटील-पवार कुटुंबाचा प्रभाव सत्ताधारी व्यवस्थेतही जाणवतो.

एका बाजूला सत्ताधारी व्यवस्थेशी जवळीक असलेले आमदार राणाजगजितसिंह पाटील आणि दुसऱ्या बाजूला राज्यपातळीवर महत्त्वाची भूमिका मिळण्याची शक्यता असलेल्या सुनेत्राताई पवार - या दोघांमुळे डॉ.पद्मसिंह पाटील कुटुंबाचा राजकीय प्रभाव बहुआयामी स्वरूपात दिसून येत आहे.

स्थानिक स्वराज्य संस्था, सहकारी संस्था, शिक्षण संस्था आणि जिल्हास्तरीय राजकारणात पाटील-पवार कुटुंबाचा प्रभाव आजही दिसून येतो.वेगवेगळ्या पक्षांत असतानाही कुटुंबीयांचे राजकीय हितसंबंध एकमेकांना पूरक ठरले आहेत, हेच त्यांच्या यशाचे प्रमुख गमक मानले जाते.

या पार्श्वभूमीवर धाराशिव जिल्हा पुन्हा एकदा राज्याच्या राजकारणात केंद्रस्थानी येत असल्याचे चित्र स्पष्ट होत असून, पाटील-पवार कुटुंबाचे वर्चस्व केवळ जिल्हापुरते न राहता राज्यपातळीवर अधिक ठळक होत आहे.

### आ. राणाजगजितसिंह पाटील : बदलत्या राजकारणातील समतोल...



डॉ. पद्मसिंह पाटील यांचे पुत्र तुळजापूर विधानसभा क्षेत्राचे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी काळानुसार राजकीय भूमिका बदलत आपले स्थान टिकवले. भाजपमध्ये प्रवेश केल्यानंतर त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या विश्वासू गटात आपले स्थान निर्माण केले. यामुळे पाटील कुटुंबाने सत्ताधारी व्यवस्थेशी थेट नाळ जोडत धाराशिवमधील पकड मजबूत ठेवली.

### डॉ. पद्मसिंह पाटील : वर्चस्वाची मुहूर्तमेढ

धाराशिव जिल्ह्यातील राजकीय वर्चस्वाची सुरुवात माजी गृहमंत्री डॉ.पद्मसिंह पाटील यांच्यापासून झाली. काँग्रेस व नंतर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात त्यांनी राज्यपातळीवर मोठे वजन निर्माण केले. गृहमंत्री, विविध खात्यांचे मंत्री, संघटक अशी विविध पदे भूषवताना त्यांनी धाराशिव जिल्हा हा आपला बालेकिल्ला म्हणून उभा केला.शरद पवार यांचे अत्यंत विश्वासू सहकारी म्हणून डॉ. पद्मसिंह पाटील यांची ओळख. वयोमानामुळे ते सध्या सक्रिय राजकारणात नसले तरी, त्यांची राजकीय सावली आजही जिल्ह्यात प्रभावी आहे.

## काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी घेतले श्री तुळजाभवानीचे दर्शन



**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.३१ जानेवारी -**

तालुक्यामध्ये कडगाव येथील जिल्हा परिषद गटांमध्ये प्रचारावेळेस महाराष्ट्र राज्याचे काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ हे दिन.३० जानेवारी रोजी सभेला संबोधित करण्यासाठी आले असताना त्यांनी तुळजाभवानी मातेचे दर्शन घेतले.

यावेळी तुळजाभवानी देवीचे महंत वाकोजी बुवा, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष धीरज पाटील, महाराष्ट्र काँग्रेस सचिव अमर खानापुरे, नगरसेवक अमोल कुतवळ हे उपस्थित होते.

## कळंबमध्ये तरुण पिढी व्यसनांच्या विळख्यात

### पोलीस प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह




**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.३१ जानेवारी -**

कोण कधी आणि कशाच्या व्यसनाधीन होईल, याचा नेम नसतो. आजवर तंबाखू, दारू, सिगारेट, ड्रग्ज तसेच कोरॅक्ससारख्या औषधांच्या गैरवापराच्या घटना समोर आल्या आहेत. मात्र आता कळंब शहरात एक धक्कादायक वास्तव उघडकीस आले असून, विशेषतः १२ ते ३० वयोगटातील तरुण पिढी सुलोचन ओढण्याच्या व्यसनाच्या आहारी गेली आहे.

शहरातील चौकाचौकांत व सार्वजनिक ठिकाणी खुलेआम सुरू असलेले हे व्यसन कळंब पोलीस प्रशासनाच्या संशयास्पद दुर्लक्षामुळे अधिकच बळावत असल्याचा आरोप नागरिकांकडून होत आहे. व्यसनाचे प्रमाण वाढत असल्याने शहरात हाणामाऱ्या, वादविवाद, दहशतीचे प्रकार तसेच किरकोळ गुन्ह्यांमध्ये लक्षणीय वाढ झाली आहे.

यामुळे कळंबची शांत व सुरक्षित शहराची ओळख पुसली जात असून, महिला, विद्यार्थी आणि ज्येष्ठ नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. स्थानिक नागरिक व सामाजिक कार्यकर्त्यांनी वारंवार तक्रारी करूनही पोलीस यंत्रणा केवळ बघ्याची भूमिका घेत असल्याचा संताप व्यक्त केला जात आहे.

वेळीच ठोस व कठोर कारवाई करण्यात आली नाही, तर ही व्यसनांची लाट तरुणांचे भविष्य उद्ध्वस्त करेल, असा गंभीर इशारा जाणकार व्यक्तींनी दिला आहे. वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी तात्काळ लक्ष घालून शहरात विशेष मोहीम राबवावी, व्यसन विक्रेत्यांवर कठोर कारवाई करावी आणि तरुण पिढीला या दलदलीतून बाहेर काढावे, अशी जोरदार मागणी नागरिकांतून होत आहे.

## डोंजा गटात शिवसेना उमेदवारांच्या प्रचाराचा नारळ फोडून शुभारंभ

**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.३१ जानेवारी -**

### आमदार तानाजीराव सावंतांचे कडवे आव्हान

भूम-परंडा-वाशी मतदारसंघाचे आमदार तथा माजी मंत्री प्रा. डॉ. तानाजीराव सावंत यांनी आज शुक्रवार दि. ३१ जानेवारी रोजी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर डोंजा जिल्हा परिषद गट व पंचायत समिती गणातील शिवसेना पक्षाच्या उमेदवारांच्या प्रचाराचा शुभारंभ केला. डोंजा येथे भैरवनाथ मंदिरात नारळ फोडून व साकडे घालत प्रचाराची सुरुवात करण्यात आली.

यावेळी डोंजा गटातील शिवसेनेच्या उमेदवार अविदाबाई जगताप तसेच पंचायत समिती गणातील उमेदवार शशीकांत पाटील, समाधान नलवडे उपस्थित होते. याशिवाय शिवसेना जिल्हाप्रमुख दत्ता अण्णा साळुंके, उमेदवारांचे प्रतिनिधी नवनाथ आप्पा जगताप, परंडा नगरपरिषदेचे नगराध्यक्ष जाकीर भाई सौदागर, आरपीआयचे संजय बनसोडे, नगरसेवक वाजीद दखनी, संजय घाडगे, सचिन सोनारीकर यांची उपस्थिती होती. आमदार तानाजीराव सावंत यांच्या हस्ते भैरवनाथ मंदिरात पुजाऱ्यांच्या उपस्थितीत आरती करून प्रचाराचा नारळ फोडण्यात आला. यापूर्वी सोनारी नगरीत आमदार सावंत यांचे वाजत-गाजत जंगी स्वागत करण्यात आले. यावेळी नागरिकांचा मोठा प्रतिसाद मिळाला असून, सावंत यांनी उपस्थित मतदारांशी संवाद साधला. यावेळी बोलताना आमदार सावंत म्हणाले, मी भैरवनाथाकडे साकडे घातले आहे ते केवळ डोंजा गटासाठी किंवा भूम-परंडा-वाशीपुरते मर्यादित नाही, तर संपूर्ण जिल्ह्यात माझा भगवा फडकू दे. जिल्हा परिषदेवर माझ्या धनुष्यबाणाचे राज्य येऊ दे आणि माझ्या जनतेचे जीवन सुखदायक होऊ दे. एक संधी द्या, माझ्या कार्यकर्त्यांना व प्रतिनिधींना निवडून द्या. पुढे बोलताना त्यांनी कडवे आव्हान देत सांगितले, धनुष्यबाणाची व भैरवनाथाची शपथ घेऊन सांगतो, जो कोणी मतभेद निर्माण करेल त्याला खड्यासारखा बाजूला करा. ज्या-ज्या ठिकाणी धनुष्यबाण आहे, तेथे पुढील बटन दाबून माझ्या उमेदवारांना विजयी करा. माझ्या पक्षाशी, धनुष्यबाणाशी किंवा भगव्याशी गद्दारी करणाऱ्यांना खड्यासारखे बाजूला करण्याचे हे कळकळीचे आव्हान आहे.

निवडणुकीचा निकाल जाहीर होणाऱ्या दिवशी धाराशिव जिल्हा परिषदेवर भगवा फडकताना दिसेल, असा विश्वासही आमदार तानाजीराव सावंत यांनी व्यक्त केला.

## तुळजापूर तालुक्यात 'लाडक्या बहिणी' ठरवणार निवडणूक निकाल?



**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.३१ जानेवारी -**

तुळजापूर तालुक्यात होत असलेल्या जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीत हजारो 'लाडक्या बहिणी' कोणाच्या बाजूने मतदान करणार, यावरच उमेदवारांचे भवितव्य अवलंबून असल्याचे चित्र सध्या दिसून येत आहे. नगरपालिका निवडणुकांप्रमाणेच यावेळीही लाडक्या बहिणींनी महायुतीच्या उमेदवारांना साथ दिल्यास, तालुक्यात महायुतीला मोठा विजय मिळण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

महाराष्ट्र सरकारने विधानसभा निवडणुकांपूर्वी मध्यप्रदेशच्या धर्तीवर राज्यात 'मुख्यमंत्री लाडकी बहीण' योजना सुरू केली होती. या योजनेचा मोठा लाभ विधानसभा निवडणुकीत महायुतीला मिळाला. त्यानंतर झालेल्या नगरपालिका व महानगरपालिका निवडणुकांमध्येही लाडक्या बहिणींची मोठ्या प्रमाणावर साथ मिळाल्याने महायुतीला दणदणीत यश मिळाले, हे वास्तव आहे.

सध्या जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुका अंतिम टप्प्यात असून मतदानास अवघे सहा दिवस उरले आहेत. दि. ७ फेब्रुवारी रोजी या निवडणुकांसाठी मतदान होणार आहे. दरम्यान, राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनामुळे प्रचार सभांना काहीसा ब्रेक लागला आहे.

मोठ्या नेत्यांच्या सभा अद्याप झालेल्या नसल्याने उमेदवारांनी पदयात्रा, कॉर्नर बैठका, तसेच घरोघरी जाऊन मतदारांच्या गाठीभेटी घेण्यावर भर दिला आहे.

तुळजापूर तालुक्यात लाडक्या बहिणींची संख्या अंदाजे ३० ते ४० हजारांच्या दरम्यान असल्याची शक्यता आहे. राज्य सरकारकडून दरमहा त्यांच्या खात्यावर १५०० रुपये जमा केले जात असल्याने ग्रामीण भागासह शहरी भागातील महिलांमध्ये या योजनेबाबत समाधान व्यक्त होत आहे.

शहरी भागाप्रमाणेच ग्रामीण भागातील लाडक्या बहिणींची साथ जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीत महायुतीला मिळणार का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. याचे उत्तर दि. ९ फेब्रुवारी रोजी होणाऱ्या मतमोजणीनंतर स्पष्ट होणार आहे.

जर तुळजापूर तालुक्यातील लाडक्या बहिणींनी महायुतीला साथ दिली, तर या निवडणुकीत महायुतीचा मोठा विजय होण्याची दाट शक्यता राजकीय जाणकार व्यक्त करत आहेत.

## जलशुद्धीकरण केंद्राची स्वच्छता; नगराध्यक्ष धरणेंची तात्काळ दखल

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.३१ जानेवारी -**

शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या जलशुद्धीकरण केंद्राची नगराध्यक्ष बसवराज धरणे व पाणीपुरवठा समितीचे सभापती तानाजी जाधव यांनी पाहणी करून घाणीने भरलेल्या टाक्यांची तात्काळ स्वच्छता करून घेतली. गेल्या काही महिन्यांपासून स्वच्छता न झाल्याने टाक्यांत मोठ्या प्रमाणात घाण साचली असून पाण्याला दुर्गंधी येत होती.

जलशुद्धीकरण केंद्राच्या स्वच्छतेनंतर आता शहरातील विविध ठिकाणी असलेल्या नगरपालिका बोअरवरील पाण्याच्या टाक्यांचीही अनेक वर्षांपासून स्वच्छता झालेली नसल्याने त्या टाक्यांची तातडीने स्वच्छता करण्याची मागणी होत आहे. याबाबत सर्व पाण्याच्या टाक्यांची स्वच्छता करण्याचे आदेश पाणीपुरवठा विभागाला द्यावेत, अशी अपेक्षा नागरिकांनी व्यक्त केली आहे.

नगराध्यक्ष बसवराज धरणे यांच्यासह सर्व नगरसेवक शहराच्या विकासासाठी सक्रियपणे काम करत असल्याचे चित्र सध्या दिसून येत आहे.


# डॉल्बी-डीजेवर कडक कारवाई; ७४ हजारांचा दंड वसुल

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३१ जानेवारी -**

सार्वजनिक व खासगी कार्यक्रमांमध्ये डॉल्बी व डीजे वाद्यांच्या कर्णकर्कश वापरामुळे वाढणाऱ्या ध्वनी व पर्यावरण प्रदूषणाविरोधात धाराशिव शहरात कडक कारवाई करण्यात आली आहे. नियमबाह्य आवाजाच्या वापरप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आलेल्या चार डॉल्बी-डीजे वाहनांना प्रत्येकी १० लाख रुपये अशा एकूण ४० लाख रुपयांच्या हमी रक्षण बंदपत्रावर व कडक अटी-शर्तींवर तात्पुरते ताब्यात देण्याचे आदेश प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी न्यायालयाचे न्यायाधीश आर. डी. गायकवाड यांनी दि. ३० जानेवारी रोजी दिले आहेत. तसेच उपप्रादेशिक परिवहन अधिकारी (ठढज) कार्यालयाने संबंधित वाहनांवर एकूण ७४ हजार रुपयांचा दंड ठोठावला आहे.

या कारवाईमुळे डॉल्बी व डीजे चालक व मालकांमध्ये मोठी खळबळ उडाली आहे. ही कारवाई धाराशिव शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक कुमार दराडे यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली.

पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, दि. ६ जानेवारी २०२६ रोजी धाराशिव शहरातील हजरत ख्वाजा शमशोद्दीन गाजी (रहे.) यांच्या उरूसानिमित्त डॉल्बी-डीजे लावण्यात आले होते. मात्र संबंधित चालकांनी निर्धारित ध्वनी मर्यादेपेक्षा जास्त आवाज केल्याने




संपूर्ण शहरात प्रचंड दणदणाट होत होता. यामुळे ध्वनी व पर्यावरण प्रदूषण झाल्याने पोलिसांनी तत्काळ कारवाई करत डॉल्बी, साऊंड सिस्टिम व वाहने ताब्यात घेतली.

ताब्यात घेण्यात आलेल्या वाहनांमध्ये प्रणव राजेंद्र तांबे (रा. सातारा) यांचा टाटा ४०७ टेम्पो (एम.एच. ११ टी-५५२५), सौरभ सुरेश खामकर (रा. शिरूर, पुणे) यांचा टाटा ट्रक (एम.एच. ११ ए.एल.-०७१९), गणेश रामदास मिरगी (रा. सातारा) यांचा टाटा ट्रक (एम.एच. ११ बी.एल.-७४७५) व संतोष किसन मेघावत (रा. पुणे) यांचा टाटा ट्रक (एम.एच. ४६ ई-१४८४) तसेच साऊंड सिस्टम चालक सागर संभाजी शिंदे (रा. कोल्हापूर) यांचा समावेश आहे. ही वाहने दि. ६, ७ व ८ जानेवारी रोजी जप्त करण्यात आली होती.

या प्रकरणी धाराशिव शहर पोलीस ठाण्यात ध्वनी प्रदूषण नियम कलम ३, ४, ५ व ६, पर्यावरण संरक्षण अधिनियम कलम ३ व ४ तसेच भारतीय न्याय संहिता कलम २९३, २८९, २९२ व २२३ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. संबंधित वाहन चालक व मालकांविरोधात प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी न्यायालयात दोषारोपपत्र (चार्जशीट) दाखल करण्यात आली आहे.

न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार संबंधित डॉल्बी, डीजे व साऊंड सिस्टिम तसेच वाहने कोणत्याही प्रकारच्या बेकायदेशीर वाहतुकीस किंवा वापरास कायम स्वरूपी प्रतिबंधित करण्यात आली आहेत. तसेच ही वाहने विक्री करता येणार नाहीत, त्यामध्ये कोणताही बदल करता येणार नाही, न्यायालयाने आदेश दिल्यास ती तात्काळ हजर करावी लागतील व कोणत्याही बेकायदेशीर कृत्यासाठी वापरता येणार नाहीत. वाहनांची सर्व जबाबदारी संबंधित अर्जदारांवरच राहणार आहे.

दरम्यान, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालयाने अनुक्रमे १४,५००, १९,५००, १७,५०० व २२,५०० रुपये असा एकूण ७४ हजार रुपयांचा दंड ठोठावला आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक रितू खोखर, अप्पर पोलीस अधीक्षक शफकत आमना यांच्या मार्गदर्शनाखाली व धाराशिव उपविभागीय पोलीस अधिकारी सुरेशकुमार राऊत यांच्या नेतृत्वाखाली पोलीस निरीक्षक कुमार दराडे व त्यांच्या पथकाने केली. या पथकात पोलीस उपनिरीक्षक संदीप ओहाळ, अक्षय दिघोळे, पोलीस अंमलदार ज्ञानेश्वर माळी व राम कनामे यांचा समावेश होता.